(ज्ञानप्रकाशांत छापून प्रसिद्ध झालेलें

विक्षिसराव

न प्रसिद्ध झालेलें)

(तीन अंकी प्रहसन.

लेखक

प्रो. वामन गोविंद काळे, एम्. ए.

पुणें येथें
ज्ञानप्रकाश छापखान्यांत हरि नारायण गोखले यांनीं
छापून प्रसिद्ध केलें.

(सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनें राखून ठेविले आहेत.)

१९०८.

किंमत चार आणे.

२५/३/१९०४
२५/३/१९०४

प्रस्तावना.

प्रतिवर्षी शाळा व कॉलेजें यांमध्यें संमेलनें करण्याचा प्रघात अलीकडे विशेष रूढ झाला असून, त्या प्रसंगीं एखाद्या नाटकाचा प्रयोग करण्याचा प्रचार पडून गेला आहे. विद्यार्थ्यांची प्रवृत्ति बहुतकरून लांबलचक, स्त्रियांचीं पुष्कळ पात्रें असलेलीं, बरेंच अभिनयकौशल्य लागणारीं व धंदेवाल्या नाटकमंडळ्या करीत असलेलीं नाटकें करण्याकडे असते. असलीं नाटकें बसविण्यांत विद्यार्थ्यांच्या महत्त्वाच्या काळाचा अपव्यय होऊन, विद्यार्थीदशेस अननुरूप असे आविर्भाव, आचकटविचकट भाषा आणि विचार यांचा अनिष्ट संस्कार तरुण वयांत त्यांचे मनावर होतो. हे दोष टाळण्यासाठीं स्त्रीपात्ररहित, छोटेखानी, पण चटकदार असें एखादें नाटक बसवा, असा उपदेश गेल्या सालीं ' न्यू इंग्लिश स्कूल ' च्या संमेलनाचे वेळीं सदरहू शाळेच्या विद्यार्थ्यांस मीं केला व लागलीच त्यांच्यासाठीं बेन् जॉन्सन्च्या ' सायलेंट वूमन ' ह्या नाटकांतील मुख्य कल्पना घेऊन ' विक्षिप्तराव ' हें त्र्यंकी प्रहसन तयार करून दिलें. त्याचा प्रयोग अत्यंत मनोरंजक व यशस्वी झाल्यामुळें हें प्रहसन छापून काढण्याविषयीं कित्येक मित्रांनीं मला सूचना केल्या. ' ज्ञानप्रकाश ' च्या व्यवस्थापकांनीं तें हप्त्याहप्त्यांनीं आपल्या पत्रांत प्रसिद्ध करून सदरहू सूचना अंमलांत आणण्यास मला सहाय्य केलें, ह्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

वा. गो का.

अ/3/908

विक्षिप्तराव.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

(स्थळ-रस्ता. **चिटकंभट** प्रवेश करितो.)

चिटकंभटः-रामदासांनीं का कुणीसं ह्मटलं आहे तें अक्षरशः खरं आहे. " नकोरे नको जन्म हा भिक्षुकाचा । सदा दीनवाणी सदा दीनवाचा ॥ ". ह्या भिक्षुकीचा तर आतां अगदीं कंटाळा येऊन गेला बुवा. आह्मां भिक्षुकांना लग्न काय, किंवा तेरावा काय, सारखंच. पण अलीकडे लोक काय खुळे होत चालले आहेत ! लग्नंही करीत नाहींत अन् बेटे मरतही नाहींत. एखादी जबर सांथ जरी सुरू झाली असती तरी बरं झालं असतं. कांहीं ह्मणा, पूर्वींचे लोकच चांगले. नऊ दहा वर्षांचा मुलगा झाला कीं, त्याचे दोहोंचे चारं हात केव्हां करूं असं त्याच्या आईबापांस होत असे. मुलगी सात आठ वर्षांची झाली कीं, तिच्या गळ्यांत मंगळसूत्र हें पडलंच. पूर्वींच्या लोकांची ताकदही दांडगी. पन्नास साठ वर्षांचा जरी ह्मातारा असला तरी त्याचं पांचवं, सहावं लग्न कसं तेव्हांच होत असे;पण अलीकडच्या लोकांत कांहीं पाणीच नाहीं. चाळीस पंचेचाळीस वर्षांचा जरी कोंवळा नवरा मुलगा असला तरी ह्मणे मी नाहीं आतां लग्न करीत. बरं, लग्न करतात तीं तरी काय ? एखाद्या घोड नवरीच्या हातांत हात घातला, आन् चार वेडेवांकडे मंत्र ह्मटले कीं झाला लग्नसोहळा. जशीं कांहीं बाहुलाबाहुलींचींच लग्नं. का दक्षणा आहे, का ब्राह्मणभोजनं आहेत, का वरात आहे ? राम शिव गोविंदा ! जो उठतो तो ह्मणे मी ब्रह्मचारी रहाणार,मी यंव् करणार, मी त्यंव् करणार, जशी कांहीं पूर्वींच्या लोकांना कांहीं अक्कलच नव्हती. बरं, आह्मांला यजमान तरी काय भेटले आहेत ! नुसता कर्णाचा अवतार. बिचाऱ्याच्या घरीं सहासहा महिन्यांत हात भिजेल तर शपथ. आमच्या **विक्षिप्तरावां**ना आतां चाळिशी आली तरी बिचारे अजूनही अविवाहित. घरांत कांहीं पैशाला कमी का आहे ? लोक विक्षिप्त ह्मणतात ते असे. असो. त्यांच्याकडेच जावं आतां, आन् पहावं कांहीं लग्गा लागला तर. अलीकडे लग्न करण्याचं त्यांच्या मनांत येऊं लागलं आहे. पण एक का लचांड आहे ? त्या लेकाला दुसऱ्यानं बोललेलं कसं तें मुळींच खपत नाहीं. आपलं तर बुवा अघळपघळ बोलल्याशिवाय मुळींच चालायचं नाहीं. आह्मी आमचं पोट नुसत्या बडबडीवर भरणार. आह्मी जर मुखस्तंभासारखे बसलों तर आह्मांला विचारतो कोण ? मला जर कुणीं सांगितलं, कीं भटजीबुवा,

मुलगी असून कांहीं विशेष कारणामुळें नेहमीं मुलाच्या वेषांत असतो अशी विक्षिप्तरावाला द्यावी थाप ठोकून ! त्याला तरी आपलं लग्न चोरूनच करायचं असलं पाहिजे तेव्हां तो ह्या गोष्टीस सहजच कबूल होईल. आपण आतां त्या ह्मातार्‍याकडेसच जावं, आन् बघावं त्याला खूप जरब देऊन काम झालं तर. तेवढयानं नाहींच भागत असं दिसलं, तर आपली ही दुसरी युक्ति आहेच ! (जातो. पडदा पडतो.)

प्रवेश पहिला समाप्त.

प्रवेश दुसरा.

(स्थळः—दिवाणखाना. **विक्षिप्तराव** प्रवेश करितो.)

विक्षि०:–(हातांत एक नळी घेऊन येतो व त्या मागून **मुक्या** येतो.) चाकरांना बोलण्याचा त्रास व माझ्या कानांला ऐकण्याची कटकट नाहींशी करण्याची ह्या नळीवाचून दुसरी एखादी युक्ति काढली पाहिजे. माझ्या स्वतःच्या बोलण्यावांचून इतरांचे आवाज मला कसे ते मुळींच सहन होत नाहींत. (चाकरास) ए मुक्या ! आजपासून मीं तुला कांहीं विचारलं ह्मणजे नुसतीं खुणांनीं उत्तरं देत जा. मीं तुला सांगितल्याप्रमाणं आपल्या थोरल्या दरवाजाला असलेली बाहेरची कडी काढून टाकलीस कीं नाहीं ? हं ! बोलूं नको. काय तें खुणांनीं उत्तर दे. (मुक्या मान हालवतो.) ठीक. बरं, दरवाजाला बाहेरून एक जाड गाद्दी बांधायला सांगितली होती तुला; आठवतं आहे का ? ती बांधलीस का ? काय ? खूण कर; बोलूं नको. (मुक्या खूण करतो) उत्तम चाकराच्या जातीला अशी नम्रता पाहिजे, आन् धन्याचा अशामध्यें बोज राहतो आणि शहाणपणा दिसून येतो. आतां मुलामांना दारावर खुशाल थापा देऊं देत अथवा धक्के देऊं देत. कायरे मुक्या, तुला त्या चिटकंभटांना बोलाव म्हणून सांगितलं होतं, तो निरोप कळवलास का त्यांना ? सांग खुणेनं (मुक्या मानेनें होय ह्मणून सांगतो.) ठीक. ते आतां लागलीच येणार आहेत का ? होय का नाहीं तें मानेनें सांग. (मुक्या मान हालवतो.) शाबास. चिटकंभटांना यायला किती वेळ लागेल बरं ? हें पहा, त्यांना यायला जर एक तास अवकाश असला तर सबंध हात वर कर; अर्धा तास अवकाश असेल तर दोन बोटं वर कर, आणि पाव तास असेल तर एकच बोट वर कर. (मुक्या एक बोट वांकवितो.) ठीक आहे. साडेसात मिनिटांनीं येणार काय ? बरं, त्यांना मागल्या दाराची किल्ली देऊन ठेवली आहेस ना ? (मुक्या मान हालवितो) उत्तम. दरवाज्याच्या कुसवांतआन् कुलपांत तेल घातलं आहेस का मीं सांगितल्याप्रमाणं ? वाहवा. दारांचीं तरी काय थोडी कटकट असते ! तीं उघडलीं किंवा झांकलीं कीं सारखीं कर्र कर्र वाजत असतात ! कायरे मुक्या, जिन्याच्या पाहिऱ्यांवर आंथरलेल्या गाद्या नीट घड आहेत ना ? असं, मीं असं ऐकलं आहे कीं, तुर्कस्थानच्या बादशहाच्या पदरीं सगळे नोकर मुके आहेत आन् ते त्याची नोकरी कशी छान करतात. स्वारींत आणि लढाईंत सगळे हुकूम ह्मणे खुणांनींच दिले जातात तिथें. केवढी कला ही ! आमच्या आर्यभूमींतील राजेलोकांस एका यःकश्चित मुसलमान बादशहानें ह्या कलेंत मागें सारावं ना ! धिःकार असो त्या राजांना ! त्याची मला तर अगदीं लाज वाटूं लागली आहे. काय होईल तें होवो; आपण तर ही

कला उचलणार. (बाहेर एक शिंग वाजतें.) अरे बापरे ! हें काय लचांड ! हा बकासुर तर नव्हे ! मुक्या, बघरे कोण आहे तो ! (मुक्या जातो.) त्या चांडाळाला, त्या पाजी, हरामखोर राक्षसाला पकडून ठारच केला पाहिजे. (मुक्या येतो.)

मुक्याः–रावसाब, सरकाराकुड्नं जरूरीच्या कामापायीं एक जासूद आलाया, आन् तो शिंग फुकतुया.

विक्षिप्त०ः–पाजी, हरामखोर ! आन् तुला आपल्या तोंडाचं शिंग कुणी वाजवायला सांगितलं अगोदर ?

मुक्याः–रावसाब, सरकाराकुड्नं जरूरीच्या कामापाई जासूद आलाया, आन् तो म्हंतुया, आपली गांठ आक्षी जरूर घेयाला होवी. न्हाइ तर म्हंतुया आपल्या जिवावर परसंग यैल.

विक्षि०ः–तूं आपली जिभली बंद कर आधीं. नाहीं तर तुझ्याच जिवावर प्रसंग आणतों मी अगोदर. (**तिरशिंगराव** हातांत एक शिंग घेऊन प्रवेश करितो.)

तिरशिंगरावः–अहो वृद्ध गृहस्थ, तुम्हीच कां विक्षिप्तराव ? बोला तुमचंच का नांव विक्षिप्तराव ? काय चमत्कार आहे हो ! तुह्मीं तर कांहींच उत्तर देत नाहीं. तुह्मीं मौनव्रत का धारण केलं आहेत ? तुम्हीं जरी कांहीं उत्तर दिलं नाहीं तर मी तुम्हांलाच विक्षिप्तराव असें समजणार. या शहरांतील तुमच्या मित्रांनीं तुह्मांला नमस्कार सांगितला आहे.

विक्षि०ः–काय मनुष्य आहे पहा ! असला उद्धटपणा आपण नव्हता बुवा कधीं पाहिला.

तिर०ः–आणि त्यांना तुमच्याविषयीं अतिशय काळजी वाटते आहे.

विक्षि०ः–माझ्याविषयीं काळजी वाटण्याचं गांवांतील लोकांना काय कारण आहे ? पण अगोदर तूं कुणाचा नोकर आहेस ?

तिर०ः–मी आपला स्वतःचा.

विक्षि०ः–मुक्या, खोलींतली माझी तरवार आण पाहूं इकडे.

तिर०ः– (मुक्यास) हं, खबरदार इथून हलटास तर. या माझ्या कट्यारिनं तुलान् तुझ्या यजमानाला एकदम स्वर्गलोकाची वाट दाखवीन, समजलास ? मी सरकारांतून आलों आहे. माझं ह्मणणं तुम्हांला संथपणानं ऐकून घेतलंच पाहिजे. अहो विक्षिप्तराव, आपण लग्न करणार आहां अशी गांवांत बातमी आहे. ह्मणे लग्न करणार आहां लग्न; ऐकलंत का ?

विक्षि०ः–मी बहिरा नाहीं. जरा हळू बोललांत तरी चालेल. बरं मग तुमचं म्हणणं काय ?

तिर०ः–माझं कांहीं ह्मणणं नाहीं. गांवातल्या लोकांचं तुह्मांला असं सांगणं आहे कीं, लग्न करण्याच्या ऐवजीं आपल्या गांवाला नदी आहे, तींत द्यानात जीव ? त्या नदीवर पूल आहे, त्यावरून द्या अल्लाद उडी टाकून खालीं, आन् घ्या जलसमाध. किंवा आपल्या पेठेंतल्या रामेश्वराच्या शिखरावरून द्या एक खुबीदार उडी टाकून. त्यापेक्षां उंच जागा हवी असेल, तर सुवर्णगडाच्या उंच कड्यावरून अलगत खालीं या. इतकं लांब जायचं नसेल तर आपल्याच ह्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरून मारा हळूच उडी अंगणांत. किंवा तुमच्या मित्रांनीं ही काढणी दिली आहे, ती घेऊन, बायकोचा फांस मानेभोंवतीं अडकवून घेण्यापेक्षां ह्या दोरीनेंच गळफांस लावून घ्या कसा ? ह्याहीपेक्षां एक सोपी युक्ति तुह्मांला सांगतों. थोडासा सोमल खा, आणि एखाद्या उंदराप्रमाणें पट्कन मरून जा कसे ! तुह्मांला काय सांगावें ?

ह्या सुधारलेल्या काळांत तुह्मांला हवी आहे तशी बायको मिळेल असं तुह्मांला वाटलं तरी कसं ? हें पहा, तुह्मी जर कृतयुगांत, द्वापारयुगांत किंवा त्रेतायुगांत असतां तर तुह्मांला शेंबडीलेंबडी, लाजरी, अजागळ, अशी एखादी बायको सहज मिळाली असती. पण हा पडला सुधारणेचा काळ. ह्या काळांत तसं होणं नाहीं. म्हणून तुह्मांला बजावतों, लग्न कराल तर फसाल. आपल्या हातानं आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊं नका. काय मी म्हणतों तें आलं का ध्यानांत ?

विक्षि०:–अहो बृहस्पति,तुम्हीं माझ्यावर जो हा आपल्या मुलुखमैदानतोफेचा भडिमार केलांत, तो मीं तुमचा एवढा काय गुन्हा केला आहे ? तुमचे काय मी तीन चव्वल खाल्ले आहेत ? का तुमचं मीं नुकसान केलं आहे, का कुणाला लुबाडलं आहे? का–

तिर०:–तसं कांहीं केलं नाहीं खरं; पण तुह्मांला ही लग्नाची अक्काबाई आठवली आहेना ?

विक्षि०:–का मीं कुणाची चोरी केली आहे, का कुणाच्या वाटेला गेलों आहे, का कुणाचा खून केला आहे, का–

तिर०:–हात्याच्या ! तसं केलं असतंत तर तुमचा केव्हांच निकाल लावला असता.

विक्षि०:–इतका वेळ मोठमोठ्यानं ओरडून माझ्या कानांचा तर निकाल लावलाच आहेत; आतां आणखी काय राहिलं आहे ?

तिर०:–हें पहा, मी नुसता निरोपाचा धनी आहें. पण मी काय सांगतों तें तुम्हांला निमूटपणें ऐकून घेतलंच पाहिजे. तुमच्या ह्या गांवांतल्या मित्रांना तुमच्याविषयीं फार कळकळ वाटत आहे. ते म्हणतात, तुम्हीं लग्न केलत आन् तुमची बायको पळून गेली तर त्याचा सगळा दोष तुमच्यावर.

विक्षि०:–तुह्मांला दोष कधीं मी घायला आलों होतों ? आणि ही आमच्या लग्नाची उठाठेव तुह्मांला कोणीं सांगितली आहे ? काय जुलूम आहे हो !

तिर०:–लग्न केल्यानं तुमच्यावर काय काय संकटं येतील तीं सगळीं सोसायला तुह्मीं तयार झालं पाहिजे. तुमची बायको जर एखाद्या श्रीमंताची मुलगी असली तर तुम्हांला ती ताटाखालचं मांजर करून टाकील, आन् तुमच्या डोक्यावर मिरे वाटील. तिला जर का पोरं झालीं तर मग वैद्य, सुइणी, दाया ह्यांची तुमच्या घरांत सारखी गर्दी उडून राहील. ती जर शिकलेली असली, तर तिची पोपटपंची तुम्हांला ऐकून घ्यावी लागेल. तिच्या मैत्रिणी रात्रंदिवस तिला भेटायला येणार आणि तुम्हांला तिच्याशीं एखाद्या पंडितासारखं चतुरपणानं बोललं पाहिजे. ती जर धर्मभोळी असेल तर रोज ब्राह्मणभोजनं, अभिषेक आन् दक्षिणा वगैरे धर्माचीं सगळीं लचांडं मागं लागतील. घरांत कथापुराणं होतील, आणि जरी तुम्हांला तीं आवडलीं नाहींत तरी तुमच्या कानाची कटकट कधीं सुटायची नाहीं. (विक्षिप्तरावाकडे पाहून) अरे, हें काय ? तुम्हांला तर दरदरून घाम सुटायला लागला ! पण माझं अजून निम्मही सांगून झालं नाहीं. हें पहा; ह्याही उप्पर तुम्हांला लग्न करायचं असेल तर खुशाल करा. आम्ही कशाला उगीच मध्यें मोडतां घालूं ? (मुक्या जाऊं लागतो.) हं ! मुक्याजीराव, जाग्यावरून हाललांत तर हड्डीच नरम करून टाकीन, समजलांत ?

विक्षि०:–मीं असं कोणचं पाप केलं होतं ह्मणून ही साडेसाती माझ्या मागं लागली

आहे कोणास ठाऊक ! अहो सद्गृहस्थ, तुमचं झालं का नाहीं व्याख्यान पुरं ?

तिर०:–तुमची बायको कुरूप असो किंवा सुस्वरूप असो, तुम्हांला तिच्या तंत्रानं चालावं लागेल. आज नथ आण, उद्यां बुगडया कर, परवां नवी आंगठी घे हें रोजचं चालायचंच. ती सांगेल तितके नोकर तुम्हांला घरांत ठेवावे लागतील. तिच्या चैनीच्या पायीं तुमच्या घराचा लिलांव झाला तरी तिला काय त्याची पर्वा ?

विक्षि०:–हें आपलं चऱ्हाट आतां संपणार तरी कधीं ?

तिर०:–मी सांगतों ह्यांतलं एक अक्षर खोटं असेल तर शपथ. तिला कशिदा काढण्याकरितां जर, लोंकर, मखमल रोज नवी नवी विकत आणून द्यावी लागेल. देवाला जाण्यासाठीं किंवा मैत्रिणींस भेटण्याकरितां तिला गाड्या घोडे लागतील. रोंज नवीं उंचीं लुगडीं तिला नेसायला हवींत. हा शेला घ्या, तो शालू पाहिजे, ह्मणून तुमच्यामागें रोज तगादा लागेल.

विक्षि०:–बरं आहे मेहेरबान. आतां तरी आपलं चऱ्हाट संपलं का नाहीं? आतां तरी समाधान झालं का तुमचं ? तुह्मीं सांगितलेलं सगळं आमच्या ध्यानांत आलं आहे आन् आह्मी त्याचा नीट विचार करूं, समजलांत ?

तिर०:–लग्न करण्यापूर्वीं मुलीचं कुळ शीळ नीट पहा. नाहीं तर घ्याल एखादी घोरपड गळ्यांत बांधून. असो. मी जातों आतां. मीं सांगितलं आहे ह्याचा पुर्तेपणीं विचार करा. तुमच्या मित्रांना तुमच्याविषयीं फार काळजी वाटते, म्हणून त्यांच्यातर्फेनं एवढी मीं तसदी घेतली आहे. नाहीं तर तुह्मीं कांहीं का करांना ? आह्मांला काय करायचं आहे त्याच्याशीं ? ठीक आहे. एवढी काढणी असूं द्या तुमच्यापाशीं, तुमच्या मित्रांच्या उपदेशाची आठवण ह्मणून ! (जातो.)

विक्षि०:–ए मुक्या, चल मला माझ्या खोलींत घेऊन. पण अगोदर दरवाजा लाव पाहूं. (शिंग वाजतें.) अरे, लाव दरवाजा अगोदर. तो चांडाळ आला वाटतं पुन्हां. गद्धया ! बघतोस काय ?आला वाटतं तो !

मुक्याः–न्हव, धनीसाब, त्यो न्हव. ह्ये आपल सास्तरबुआ आल्याती. (चिटकंभट येतो.)

चिटकं०:–रावसाहेब, मी तो आपला चिटकंभट. हँ ! हँ !

विक्षि०:–बर, वेळेवर आलांत बुवा. आतां येथें तुमच्या अगोदर एक दरवडेखोर आला होता. मला एकदां अंथरुणावर पडूं द्या आन् मला कांहीं तरी औषध द्या.

चिटकं०:–असं झालं तरी काय आपल्याला ? त्या चोरानं तुम्हांला मारलं बिरलं तर नाहीं ना ?

विक्षि०:–मारलं नाहीं,पण लग्न करूं नका ह्मणून मला त्यानं चांगलीच धमकी दिलीन. माझं मन कसं अस्वस्थ होऊन मला कांपरं भरलं आहे. पण आपण लग्न हें करणारच. शास्त्रीबोवा, एखादं पाहिलंत कां स्थळ ? हें पहा, तुम्हांला काय सांगायचं असेल तें थोडक्यांत आन् हळूं सांगा. माझी प्रकृति अगदीं बिघडून गेली आहे.

चिट०:–(आपल्याशीं) त्याचं हें थोडक्यांतअन् हळूं आलं.(उघड) तुह्मांला थोडक्यांत आन् हळू सांगायचं पण आह्मां भिक्षुकांचं अघळपघळ बोलल्याशिवाय कसं चालावं बुवा? आणि त्यांतून बोलायचं लग्नाविषयीं. असो. अगदीं थोडक्यांत आणि हळूं सांगतों. ईश्वरानं मनुष्याला जी वाणी दिली आहे, तिचा मनुष्यानं अवश्य उपयोग केला पाहिजे. भर्तृहरीनं

एका ठिकाणीं म्हटलं आहे, " वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते। क्षीयन्ते खलु भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम्". शिवाय आम्हां ब्राम्हणांचं सगळं बळ पडलं वाणींत. भवभूती म्हणतो, ' वाचि वीर्यं द्विजानाम्. ' तुकारामबोवांचा अभिप्राय तोच. ' वाचेचा रसाळ. ' थोडक्यांत सांगायचं म्हणून म्हणतों, मनुष्याला अवळपघळ, लांबरुंद अशी एक वाणी पाहिजे.

विक्षि०:—हें पहा, तुमचा तो वाणीन् उदमी राहूंद्या बाजारांत; आणि जरा हळून थोडक्यांत बोला.

चिट०:—ठीक आहे. आमचं काय ! थोडक्यांत सांगायचं म्हणजे, तुम्हीं सांगितल्याप्रमाणें वधू शोधून काढण्याच्या मी सारखा खटपटींत आहें. आपल्यासारख्या श्रीमंतांना जी मुलगी पहावयाची ती अशी तशी का पहायची ? ती शकुंतला, उर्वशी, मेनका, द्रौपदी ह्यांच्यासारखी फक्कड बघूनच करायची. कारण म्हटलंच आहे, " अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा । प्रातः काले स्मरेन्नित्यं आयुःकामार्थसिद्धिदम् ॥ प्रथमं वक्रतुंडं च—"

विक्षि०:—अहो वक्रतुंड, तुह्मी बहकून चाललां कुठं ? मुख्य मुद्याचं कांहीं बोलाल का नाहीं ?

चिटकं०:— ठीक आहे. थोडक्यांत सांगायचं ह्मणजे आपल्यासारख्यांना जी वधू करावयाची ती आपल्याला साजेल अशीच पाहून करायची. मोरोपंतानींच ह्मटलं आहे कीं, शहाण्या मनुष्याला शहाणीच बायको पाहिजे. 'आर्या आर्यासि रुचे, ईच्याठायीं—'

विक्षि०:—आतां काय करावं ? तुह्मी लागलांत पुन्हां वहावायला ! तुह्माला मी एकदां सांगितलं आहेना कीं मला बायको कुरूप, काळी, नकटी वाटेल तसली चालेल, पण मुग्ध ह्मणजे फार न बोलणारी पाहिजे.

चिटकं०:—अगदीं रास्त अगदीं रास्त. जयदेव कवीनंच नाहीं का म्हटलंन् " मुग्ध वधू निकरे, हरिरिह मुग्ध वधूनिकरे. " हें पहा, तुह्मी ह्मणतां तें सगळं खरं. पण तुमच्यापुढें एखादी मुकी पण शूर्पणखा आणून उभी केली तर चालेल ? हें पहा, अशी असली तर ?

विक्षि०:—थोडक्यांत सांगा. कशी ?

चिटकं०:—अशी:" जाडा तो अधरोष्ठ्र, त्यावरि दिसे दंताचि ती पंगती। चपटें नासिक तें तया तदुपरी नथ्नी बरी शोभती ॥
डोळा एक असे, दुजांत विलसे
तिळ पुष्प तें साजिरें ।

तिळ् पुष्प बरं कां ! तिळ् पुष्प. तिळ् पुष्प म्हणजे वडस. ' तिळ् पुष्पं वडसः ' इत्यमरः.

ऐसें रूप नटोनि आलि सुभगा सर्वा
दिसें गोजिरें ।. "

माझं हो काय जातं ? उद्यां आणून उभी करतों असली मुलगी तुमच्यापुढं.पण पुढें मागें कांहीं बिघडलं तर माझ्याकडे नाहीं आं !

विक्षि०:—कोण आहे, तोंड आहे का तोबरा आहे कोणाला ठाऊक ! हें पहा शास्त्रीबुवा, मला तें लग्नही नको व तुमची ही वटवटही नको. तुम्हांला काय करायचं असेल तें करा. पण चालते व्हा इथून अगोदर. तुमच्या वडबडीनं, माझं डोकं कसं अगदीं पिकून गेलं आहे.

चिट०:—अहो, डोकं पिकलं ह्मणून तर तुमच्यामागं लागलों आहे, लवकर लग्न करून घ्या म्हणून ! " काकः काकः पिकः पिकः. " मनुष्य काका असला कीं, त्याचं डोकं आपलं पिकायचंच.

विक्षि०:—तुम्ही चालते व्हा इथून अगोदर अन् लागा आपल्या कामाला.

चिट०:— ठीक आहे, येतों तर. कालिदासानंच म्हटलं आहे, "साधयामो वयम्." आतां पुन्हां इथं येईन तो मुलगी दाखवायलाच घेऊन येईन. तसा मोकळ्या हातांनीं नाहीं यायचा. कारण म्हटलं आहे, " रिक्त हस्ते न गन्तव्यं यजमानं देवतां गुरुम्." काय, मी म्हणतों तें खरं आहे कीं नाहीं ?

विक्षि०:—आतां पाय करा आपले इकडे. खाकेपासून हात जोडतां येत नाहींत, नाइलाज आहे; कोंपरांपासून हात जोडतों तुम्हांला, एवढी टकळी बंद करा आणि आपल्या कामाला जा कसे. पण आमचं तेवढं काम करायला विसरूं नका हो ! काम हें झालंच पाहिजे.

चिट०:—तुमच्या कामाचं मला चांगलं स्मरण आहे. कारण म्हटलंच आहे, " कामः पंच शरःस्मरः. "बरं आहे, येतों तर आतां.

प्रवेश ३ रा.

स्थळः— रस्ता. **साळसुदरा** व **मुक्या** प्रवेश करितात.

साळः- मुक्या, तुझ्याकडे माझं एक मोठं काम आहे. करतों ह्मणशील तर सांगतों. तुझं माझ्यावर अगदीं लहानपणापासून प्रेम म्हणून तुझ्याकडे मुद्दाम आलों आहें. काम कांहीं विशेष नाहीं. मनांत आणलंस तर तेव्हांच होईल.

मुक्याः— पन इचीभन तुमी वराडतां कशापाई? मी किंवडा बिंवडा हाये व्हय ?

साळ०:— (आपल्याशीं) आमच्या काकासाहेबांची सावली पडली वाटतं ह्याच्यावर. (उघड) बरं बुवा; तुझ्या कानांत सांगतों. आतांशा विक्षिप्तरावांकडे कोण कोण येत असतं आन् त्यांचीं काय खलबतं चालतातरे ?

मुक्याः— खलबत्त ? खलबत्त कस चालत्याती ? आन् इक्शिप्तरावाच्या वाड्यांत खलबत्त ? तुमासनी न्हाई ठाव वाटतं हत खलबत्त बिलबत्त कायचीं वाजायचं न्हाइ म्हून ? आन् मास्नी कशापाई पुस्ता ?

साळ०:— (आपल्याशीं) काय गुलाम आहे ! मुद्दाम आड रानांत शिरतो आहे ! (उघड) असं नव्हेरे. आतांशा काकासाहेब घरांत कुणाशी बोलत असतात ?

मुक्याः— हाय कोन हात बोलाया ? मीन् यजमान, यजमान न् मी. तिसरा कोनबी न्हाई हात. मी मस्त बोलाया बघतों पन् मास्नी गवस्तय कुठं बोलाया ? त्यांड अक्शी शिवलय। जस. जरा एक सबूद् ह्ये तोंडावाट काढला कीं, 'मुक्या गप, खून कर, बोलू नग' ह्ये हैच त्या थेरड्याच. अक्शी तुरुंगखाना झालाया पघा. दुसरी कुठं नोकरी बी गवसना.

साळ०:— (स्वगत) रुपेरी मात्रेचा एक वळसा उगाळून पहावं आपलं काम होतं का. (मुक्याच्या हातावर एक रुपाया ठेवतो.)

मुक्याः— (खिशांत रुपाया टाकून) साळसुदराव, अन् ह्ये काय? ही कोन पिडा इचिभन. नको ह्यो जुलूम.

साळ०:- विक्षिप्तरावांकडे बाहेरचं कुणी येतं जातं का आतांशा ?

मु०:—हां:हां: येत्याती. कुनीबी आल तर आत येऊनशान् जात्यातीबी परत.

साळ०:—कोण येतात त्यांचं नांव सांग पाहूं. हें पहा, तुला काय ठाऊक असेल तें मला मन मोकळं करून सांग. माझ्यावर तुझे उपकार होतील.

मु०:—(स्वगत) ह्या बामनाकुंड आ-

णिक रुपये उपटले पाहिजेती. (उघड) काय त्येंचं नांव पवा त्ये—चेटुकं—चुटकी—

साळ०:—चिटकंभट ?

मु०:—हां: हां:. त्येच त्येच. काय ल्येकाच वंगाळ नांव! ध्येनांतबी राहीना.

साळ०:—मग ते आमच्या काकासाहेबांस काय सांगत असतात ?

मु०:—कुणा ल्येकाला ठाव काय बोलत्यातीन काय न्हाई त्ये ! आपुन कशापाई करा चौकशी ? आपुन पडलो चाकुर. आपल्यासनी काय करायच हाये त्येंचं बोलनन बिलनं. मास्नी न्हाई ठाव काईबी.

साळ०:—(स्वगत) आणखी एक वळसा उगाळला पाहिजेसं दिसतं. (दुसरा रुपाया मुक्याच्या हातावर ठेवतो). चिटकंभट म्हणजे आहे मोठा अवळपवळ आन मोठ्यानं बोलणारा ब्राम्हण. तुला थोडं बहुत तरी ऐकूं आलं असेल कीं नाहीं त्याचं बोलणं ?

मु०:—ऐकलया वाईच तस.

साळ०:— (स्वगत) मात्रा लागू पडलीसं दिसतं. काय, काय ऐकलंस सांग पाहूं ?

मु०—तो बामन यजमानासनी म्हंतो लगीन करा, आन आमच यजमान म्हंत्यार्त येक आवा बगा, आवा. ह्येच चालतय साऱ्या दीसभर, आन हूं काय राव ?

साळ०:—हं. तेंच नीट सांगरे काय ह्मणतात तें. तेंच मला हवं आहे. (आणखी दोन रुपये हातावर ठेवतो.)

मुक्या:—(रुपये घेऊन घरांतून हांक ऐकलेंसें करतो.) जी ! जीअ ! ह्यो आलो न्हवंका ? कोन इची भन तरास थेरड्याचा ? वाइचबी इसावा न्हाइ घेत गवसून शिनी. साऱ्या इळभर मुक्या, मुक्या, करून शान जीव बेजार केलाया जसा ! (पळत जातो.)

साळ०:—काय चोर आहे ! रुपये घेऊन पळाला गुलाम घरांत. असो. ह्याच्या सांगण्यावरून एवढं तरी बाहेर पडलं कीं आमच्या काकासाहेबांनीं चिटकंभटाला आपल्यासाठीं मुलगी शोधून काढायला सांगितलं आहे. आन् पैशाच्या आशेनं तो भट आतां त्या कामाला बहुधा लागलाही असेल. (विचार करून) आपली ही युक्ति जर का साधली तर काय बहार होणार आहे! त्या नाटकी गुलाबाला गांठून आणि त्याला आपली मसलत सांगून अगोदर त्याचं मन पुरतं वळविलं पाहिजे. तें झालं कीं मग चिटकंभटाला वश करण्याचा यत्न. जर का गुलाब नाहीं ह्मणाला, तर मात्र आपलं सगळं ओम् फस् होणार. कांहीं झालं तरी शेवटपर्यंत प्रयत्न हा केलाच पाहिजे. (पडद्याकडे पाहून) बरं पण, तिकडून हें कोण येत आहे ? अरे हा तर गुलाब. एक काम आयतंच झालं. काय बेट्याची ऐट पहा ! तो अंगांत पातळ मुंडेछाट सदरा, डोक्याला जरीची टोपी, पायांत चढाव, हातांत बारीक वेताची छडी. केंस ठेऊन त्यांचा लेंकानं भांग काय पाडला आहेन् ! सदऱ्यावर नुसतंच जाकीट दिलं आहेन चढवून. त्याच्या खिशांत तें घड्याळ, आन् झोंकदार हातरुमाल त्यांतून बाहेर डोकावतो आहे. त्याला वाटतं मी जसा कांहीं नाटकांतला एक राजपुत्र रंगभूमीवर इकडून तिकडे आणि तिकडून इकडे फिरतों आहें. विडा खाऊन चोंचही रंगविली आहे बेट्यानं (गुलाब येतो.).

साळ०:—कां गुलाब, कुठं निघाली स्वारी ?

गुला०:–आमच्या त्या मंडळींतून निघाल्यापासून माझे काय हाल होत आहेत त्याची तुह्मांला कल्पनाही यावयाची नाहीं. तुह्मांला ठाऊकच आहे कीं, माझ्या आवाजाचं मडकं झाल्यामुळं मला मंडळींतून अर्धचंद्र मिळाला. माझी कांहींच विद्या झालेली नसल्यामुळं व मला अभिनयही मुळींच येत नसल्याकारणानं नुसता सुंदर मुखडा आणि बेताबाताचा आवाज हेच कायते माझे दोन गुण. पैकीं आवाज तर गेलाच. नुसत्या देखणेपणाला कोण पुसतो? गोरागोमटा आणि कपाळकरंटा, अशी माझी स्थिति झाली आहे. लहानपणीं आईबापांचें न ऐकतां कांहीं फाजील मित्रांच्या नादानं अभ्यास सोडून नाटक पहाण्यांत वेळ घालविला. विडया फुंकाव्या, गप्पा माराव्या, पत्ते झोडावे, हा रात्रंदिवस क्रम चालला होता. वडील रागें भरूं लागले म्हणून घरांतून पळून गेलों व नाटकांत शिरलों. पहिल्यापहिल्यानं माझी जिकडे तिकडे वाहवा झाली. माझें सोंग पाहण्यासाठीं लोकांच्या उडयावर उडया पडूं लागल्या. पण तेथून आतां अर्धचंद्र मिळाल्यामुळें धड ना विद्या, धड ना नाटक, अशी स्थिति होऊन आज हातामध्यें मधुकरीचं फडकं आलं आहे. परंतु त्याबद्दल पश्चात्ताप करून काय उपयोग?

साळ०:–हें पहा, तुझं लग्न करायचं आहे का? फार नामी संधि आली आहे. होय ह्मणत असलास तर देतों दोहोंचे चार हात करून.

गुला०:–वा भाई! मी माझ्या पोटाला मिळेना ह्मणून रडतों आहें आणि मला चतुर्भुज ते कशाला करतां आणखी?

साळ०:– अरे, तुला त्यांत काडीचाही खर्च नाहीं यायचा. उलट तुलाच पैसे मिळतील रगड.

गुला०:– असा कोण हरीचा लाल माझ्यावर फिदा होणार आहे बुवा? माझं काय पाहून मला आपली मुलगी देणार तो? माझ्या ह्या बाहेरच्या ऐटीवर भुलला आहे वाटतं कुणी?

साळ०:–तुला काय त्याचं? तुझं लग्न जुळवून दिलं ह्मणजे झालंना?

गुला०:–मला वाटतं, मुलगी आंधळी किंवा पांगळी असेल. आणि ती माझ्या गळ्यांत बांधणार आपण. भाई, माफ करा.

साळ०:–असं नव्हे रे. मी तुला विचारतों त्याप्रश्नाचं उत्तर दे.

गुला०:–काय तुमचा प्रश्न? बोला.

साळ०:–तुला बायको करायची ना?

गुला०:– बरं मग, पुढें काय?

साळ०:– पुढें काय? तुला बायको करून देतों. म्हणजे तुला करतों बायको आन् देतों दुसऱ्याला.

गुला०:–हें तुमचं एक मोठं कोडंच आहे म्हणायचं. मला नाहीं समजत तुम्ही काय म्हणतां तें.

साळ०:–अरे, माझे चुलते आहेतना विक्षिप्तराव तुला माहीत?

गुला०:–आहेत. मग त्यांचं काय?

साळ०:–त्यांना करायचं आहे लग्न, ह्मणून ते आहेत एका मुलीच्या शोधांत, आणि आह्मी त्यांना फसवून त्यांची फजीती करायचा केला आहे बेत. त्यांची तुला मी करणार बायको.

गुला०:–हां, आलं ध्यानांत. एकूण तुह्मी मला पुन्हां स्त्रीवेष देणार वाटतं? पण मी तुह्माला निक्षून सांगतों, एकदां मीं शपथ घेतली आहे कीं, काय होईल तें होवो, स्त्रीवेष ह्मणून इतःपर घ्यायचा नाहीं.

एवढेंच नव्हे तर नाटकगृहाचें पुन्हां तोंड दिखील नाहीं पहायचं. तेव्हां ह्या दोन गोष्टींशिवाय तिसरी कांहीं असेल तर बोला.

साळ०:–(स्वगत) आतां आली पंचाईत. सगळंच फिसकटतं कीं काय ? (उघड) तुझं काय बिघडतं त्यांत ? स्त्रीविष घेऊन हजारों वेळां रंगभूमीवर नटून सजून ताईसाहेब, माईसाहेब, करीत हिंडला असशील आणि आतांच तुला त्याची एवढी कसली लाज आली आहे कुणाला ठाऊक ! त्यांतून तुला कोणी नाटकांत जायला सांगत नाहीं किंवा रंगभूमीवर लोकांपुढें नाचायला सांगत नाहीं. हें सगळं गुप्तपणानं व्हायचं आहे. तिसऱ्या कुणाला कळायचं देखील नाहीं !

गुला०:–हा लाजेचा किंवा लोकांना कळण्याचा प्रश्न नाहीं. बस्स. एकदां शपथ घेतली ती घेतली. झालेला निश्चय कालत्रयींही ढळायाचा नाहीं.

साळ०:–बरं बुवा, तसंका होईना ? स्त्रीविष राहिला. बाकीतर तुला कबूल आहे ?

गुला०:–स्त्रीविष जर नाहीं तर बाकी राहिलं काय कबूल असायला ? शिवाय मला असं सांगा, स्त्रिवेषाशिवाय तुमचे काकासाहेब फसणार तरी कसे ? त्यावांचून जर ते फसत असले तर माझी कांहीं ना नाहीं तुह्मी सांगाल त्याला. पण मला नाहीं वाटत ते असे फसतीलसें.

साळ०:–त्याला मीं एक सुंदर युक्ति काढली आहे. विक्षिप्तरावांच्या कानांस आवाज सहन होत नाहीं, हें तुला ठाऊक आहेच. त्यांतून आतां त्यांना लग्न करण्याची आली आहे हुक्की. त्यांना एक मुखस्तंभ अशी बायको हवी आहे आणि तशी जर त्यांना मिळाली, तर ते बाकीच्या वाटेल त्या गोष्टी कबूल करतील. मी त्यांना सांगून देणार तूं आहेस मूळची मुलगी. परंतु कांहीं विशेष कारणासाठीं लहानपणापासून मुलाच्या वेषांत वाढली आहेस, आणि हा वेष मरेपर्यंत कांहीं झालं तरी असाच कायम ठेवण्याविषयीं देवासमोर तुझ्या बापाच्या व तुझ्या पूर्वींच आणाशपथा झाल्या आहेत. तुला त्यांच्याकडे दाखवायला नेला ह्मणजे असा मर्यादशीलपणा, लाजरेपणा व बोलण्याचा तिटकारा दाखविशील कीं यंव ! कां आहे कीं, नाहीं तोड पण तोड ? इतकं झाल्यावर तो काय लागलीच हुरळून जाऊन उद्यांचाच मुहूर्त बघायला लागेल. हें जर आपलें काम फत्ते झालं तर तुझं जन्माचं कल्याण होईल.

गुला०:– मी असें विचारतों,समजा तुमचे विक्षिप्तराव फसले तर त्यांत तुम्हांला काय फायदा होणार आहे ? मला वाटतं तुमच्यावरचा त्यांचा रोष तर अधिकच भडकेल !

साळ०:--पुढचं माझं काय धोरण आहे तें तुला पुढें आपोआप समजेल. आज त्याचा विचार नको.

गुला०:--पण हें अंगाबिंगावर तर नाहींना यायचं लचांड ? हो, अगोदर पूर्ण विचार केलेला असावा.

साळ०:--अरे, त्यावद्दल जबाबदार मी. त्याची सगळी तजवीज करून ठेविली आहे. तूं अगदीं बेफिकीर ऐस. (पडद्याकडे पाहून) अरे वा ! हे पहा तिरशिंगराव इकडेच येत आहेत. त्यांना आपला हा बेत कळवून, आमच्या काकासाहेबांच्या विश्वासांतले ते चिटकंभट, त्यांना आपल्या कारस्थानांत ओढून घेण्याची अगोदर तजवीज केली पाहिजे. तिरशिंगराव मोठा वस्ताद माणूस असून माझा अत्यंत जिवलग स्नेही आहे.तो

तें काम व्यवस्थित आणि ताबडतोब करील.

(तिरशिंगराव शिंग घेऊन प्रवेश करतो.)

साळ०:—बरी वेळेवर गांठ पडली. अरे पण तूं हें शिंग घेऊन कुणीकडे गेला होतास?

तिर०:—अशा ठिकाणीं गेलों होतों कीं, तिथें जर तूं या शिंगाचा आवाज ऐकायला व त्यानें बजाविलेली कामगिरी पहायला असतास तर तुला हर्षवायूच झाला असता. मीं तुझं काम असं कांहीं फत्ते केलं आहे कीं, ज्याचं नांव तें! तुझ्या काकासाहेबांकडे गेलों होतों; मी आतां हा तिकडूनच येतों आहें. त्यांचे लग्नासंबंधीं सगळे विचार उडवून टाकले!

साळ०:—अरे हें काय केलंस वेड्यासारखं?

तिर०:—कां बरं? काय झालं काय?

गुला०:—मला बोलायला वास्तविक कांहीं अधिकार नाहीं; पण मला वाटतं हें तुमचं कृत्य अत्यंत अविचाराचं आणि वाईचं असं झालं.

साळ०:—माझ्या वैऱ्यानं देखील माझं इतकं नुकसान केलं नसतं.

तिर०:— ह्मणजे असं केलं तरी काय मीं? जरा शुद्धीवर येऊन बोलाल कीं नाहीं कांहीं?

साळ०:—मला वाटलंच तूं असा कांहीं तरी घोंटाळा करशील म्हणून!

गुला०:—पण मी ह्मणतों ही तुह्मांला नसती उठाठेव सांगितली होती कोणीं? मला खरोखर कांहीं विचारायची जरूर नाहीं, पण विचारतों.

तिर०:—हें पहा, स्पष्ट काय असेल तें बोला. असं वेड घेऊन पेडगांवाला जाऊं नका.

साळ०:—तुम्हीच सांगा तिथं जाऊन काय पराक्रम केलात तो सविस्तर अगोदर; मग मी दाखवितों तुमचा अजागळपणा.

तिर०:—आपण असं केलं. या शिंगाचा घरांत शिरायला मीं उपयोग करून घेतला. मी सरकारांतून कांहीं महत्त्वाच्या कामाकरितां आलों आहे असें सांगून घुसलों आंत न् काय? एकदां आंत घुसल्यावर माझ्या या मुलुखमैदान तोफेला दिली सरबत्ती. मग काय, धुडुम्धाड! त्याला खूप दम भरला. आन् सांगितलं लग्न करशील तर फसशील. घेशील एखादी हेडंबा नाहीं तर शूर्पणखा गळ्यांत आडकवून. बहुतेक निम्मं काम झाल्यासारखं दिसतं आहे. तो तर अगदीं चळचळा कांपायलाच लागला. हं! चालूंद्या आतां तुमचा आमच्यावर भडीमार. थांबलांत कां?

साळ०:—माझा तूं पूर्ण नाश केलास.

गुला०:—आपल्याला कांहीं माहीत नसतां मध्यें उगीच लुडबुडणारांचं असंच व्हायचं!

तिर०:—ह्मणजे स्पष्ट आणि दुसऱ्याला कांहीं कळेल असं बोलायचंच नाहीं असा बेत केला आहेत कीं काय आज तुम्हीं?

साळ०:—आम्हीं एक उत्तमसा व्यूह रचला होता, तो तुझ्या या कृत्यानं सर्व ढांसळला. हा पाहिलास का माझा मित्र गुलाब? हा पूर्वी ' हेडंबा प्रासादिक ललित कलोद्धारक ' मंडळींत स्त्रीचं काम करीत असे. अलीकडे तो तेथून निघाला आहे. त्यानं माझ्यासाठीं आमच्या काकांच्या बायकोची बतावणी करण्याचं कबूल केलं आहे. त्यांच्या गळ्यांत ही बृहन्नडा बांधून व त्यांची फटफजिती करून मीं आपलं काम साधून घेण्याचा बेत केला होता. पण आतां काय?

गुला०:—पण मी म्हणतों आपल्या मित्राचं हित करायचं आतांच काय एवढं तुमचं नडलं होतं?

साळ०:—बरं, झालं तें झालं. आपण आतां आपल्या पुढल्या कामाला लागूं.

तिरशिंगराव, तूं आतां प्रथम असं कर कीं, ते चिटकंभट आहेतना तुला ठाऊक ? हां, त्यांच्याकडे जा आणि त्यांना घे आपलेसे करून; ते वळले कीं आपलं काम फत्ते झालंच म्हणून समज.

तिर०:-- हात्त्याच्या ! एवढंचना ! आन् बेटयांनो, माझ्यावर केवढा गहजब केलांत ! मला वाटलं, झालं तरी काय इतकं ? अरे, पहिल्यापासून माझा हा बेत होताच.ही मीं मध्यें उगीच मजा केली. आन् पाहिलं त्या विक्षिप्तरावाला दम भरून. लग्नासाठीं काय पण हावरा झाला आहे ! मीं बाकी त्याला खूपच तंबी दिली. आतां जाऊन आधीं त्या चिटकंभटाला गांठतों आणि सांगतों एक उत्कृष्ट स्थळ आहे म्हणून. त्या भटाला कायहो ? रुपेरी मात्रेचा थोडा उपयोग केला कीं तो वाटेल तें करायला तयार होईल.

साळ०:--गुलाब, तुझी मात्र अगदीं तयारी असूंदे अं ! तो चिटकंभट तुला त्या विक्षिप्तरावाकडे दाखवायला म्हणून घेऊन जाईल. तिथं अगदीं कसं तोळा मासा बोलायचं बरं का ? स्त्रियांचे आविर्भाव तुला शिकवायला नकोच ह्मणा. त्यांत तूं अगदीं तरबेज आहेसच. त्याच्यावर अशी छाप ठेऊन देतोस कीं परवांच्याच मुहूर्तांला 'शुभलग्न सावधान' झालं पाहिजे. (तिरशिंगरावास) गुलाबच्या पुरुषवेषाबद्दल त्या चिटकंभटाला मात्र चांगला पढवून ठेव बरं का ?

तिर०:-- त्याची नको तुला काळजी. त्याला असा तयार करतों कीं, तो विक्षिप्तरावाला अवळपघळ वाटेल तशा गप्पा देईल ठेवून. मी आतां त्याच्याचकडे जातों.

(जातात.)

प्रवेश ३ रा समाप्त.

प्रवेश ४ था.

(स्थळः-- **चिटकंभटाचें घर. चिटकंभट** संध्या करीत बसला आहे.)

चिटकं०:--ऊशतीरिव मातरः तस्मारंगमामवो यस्यक्षयाय जिन्वथा--केशा, अरे केशा ! साऱ्या दिवस कुठं भटकत असतो कोणाला ठाऊक ! --आपो जन्यथः चनः सूर्यश्चेति मंत्रस्य, --अग, तिकड केशा असला तर दे लावून त्याला इकडे.-- सूर्यश्च मामन्युश्च मन्युपतयश्च-- (केशा येतो) केशा, मगाशीं मी तुला सांगायचं विसरलों. तुला आज त्रिंबकराव उकिड्व्यांच्या घरीं श्राद्धाचं जेवायला जायचं आहे. मगाशीं त्यांचा मुलगा आला होता सांगायला. वाघाचा डोळा आहे दक्षणा. मला आलं आहे दुसरीकडचं आमंत्रण. तिथं आह्मांला दक्षणा काय चकारी नाहीं-तर पकारी.

केशा:--आपली आज नाहीं बोवा कुठं जेवायला जायची सोय.

चिटकं०:--हा गाढवा ! ह्मणजे अन्नाला माजलास वाटतं ? तिथं कांहीं भिकार अश्वखाद्य नाहीं ह्मटलं. श्रीखंड पुरी आहे; मीं चौकशी केली आहे. पृथ्वि त्वया धृता लोका देवि त्वं......

केशा:--तें कांहीं का असेना ? आज कांहीं आपलं जमायचं नाहीं.

चिट०:--ह्मणजे ?--त्वं च धारय मां देवि पवित्रं कुरु चासनम्--लोकांना अन्न मिळेनासं झालं आहे, आन् ह्या कारट्याला माजुरी आली आहे.--अपसर्पंतु ते भुता ये भूता भूमि......कारेर, न जायला काय झालं तुला ?

के०:--काल रात्रीं चतुर्थीचा ब्राह्मण गेलों होतों जेवायला. तिथं आग्रहानं दहापंधरा मोदक वाढले. अजून पोट फुगलं

आहे. नको, नको ह्मटलं तरी ऐकेनात. बरं पानांत अन्न टाकावं तरी पंचाईत ! (ढेंकर देतो.) ढेंकरेबरोबर मोदक बाहेर येताहेत. ह्यांत जर आज जेवायला गेलों तर मरायचीच वेळ यायची.

चिट०:--मेलास तर काय गांव ओस पडायचा आहे ? सुग्रास अन्न पुढं आलं असतां नाहीं ह्मणतोस, अन्न श्रापील तुला. ह्मटलंच आहे, " भोजनं प्राप्य दुर्बुद्धे दयां प्राणेषु मा कुरु । भोजनं दुर्लभं लोके प्राणा जन्मनि जन्मनि ॥ " मेलास तर फूंकून टाकीन. असलं सोन्यासारखं अन्न टाकायचं कीं काय ? आन् दक्षिणा ! एक रुपया आहे, आलं का ध्यानांत ?

के०:—एक सोडून दहा रुपये असले ह्मणून काय झालं ? जिवापेक्षां रुपया जास्त आहे कीं काय ?

चिट०:—अलीकडचीं पोरंच अशीं. आह्मी लहानपणीं एकाच दिवशीं दोन दोन ठिकाणीं जात होतों जेवायला. आह्मी नाहीं कोठें मेलों ते ? ये भूता विघ्नकर्तारस्ते नश्यन्तु शिवाज्ञया—(पडद्यांत चिटकंभट ह्मणून कोणी हांका मारितें.) कोण आहे ? पाटीलबोवा, असे बसा त्या हांतरीवर. का आज कुणीकड झुकली स्वारी ?

पाटील:—कांहीं विचारायचं होतं ह्मणून आलों होतों. आमच्या पोराच्या जिवाला आज सहा महिने झाले, बरं नाहीं. ताप जाळ, खोकला लागला आहे. कांहीं कुळधर्म राहिला असेल म्हणून गांवीं गेलों होतों घेऊन त्याला. पण अजून कांहीं गुण नाहीं.

चिट०:-- कांहीं वैद्याबिद्याचं औषध दिलं होतंत का त्याला?

पाटी०:-- आमच्या शेजारीं एक म्हातारा आहे, त्यानं कसलंसं चूर्ण दिलं होतंन. पण त्यानं अजून कांहीं कमी नाहीं. म्हणून म्हटलं, कांहीं ग्रहाबिहांची पीडा असली तर चौकशी करावी.

चिट०:--बरं केलंत वैद्याचं औषध दिलं नाहींत तें. अलीकडच्या वैद्यांना नाडीचं ज्ञान तर काडीइतकं दिखील नसतं. कांहीं तरी देऊन पैसे उकळायचा एक धंदाच झाला आहे तो झालं. आणि इंग्रजी डाक्तरांना तर कांहींच समजत नाहीं. कानांत नळ्या काय घालतात, आन् छातीवर ठोके काय मारतात !ह्यांचा बाप सांगायला आला आहे त्यांच्या कानांत, रोग्याला काय झालं आहे तें ! इथूनतिथून सगळा लुच्चेगिरीचा बाजार ! आहे काय आन् नाहीं काय ? असो; तुमच्या मुलाचं नांव काय बरं ? अगदीं तोंडासमोर आहे—

पा०:—गोविंदा.

चि०:— हां गोविंदा, गोविंदा. गो, गा, गे, गी. मकर लग्न येतं आहे. मकर लग्नाप्रमाणं पाहिलं तर—ज्योतिषसारांत ह्मटलं आहे, ' चापे च यक्षिणीपीडा, मकरे ग्रामदैवतात् । अपुत्रा द्विजः कुंभे मीने आकाशगामिनः'॥ ह्मणजे मकरलग्नीं ग्रामदेवतेचा दोष येतो आहे. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ—आठवा गुरु असून अकरावा चंद्र आहे. चंद्रबल बरं आहे. पण लेंकाचा गुरु जरा आडवा आला आहे. बाकी ठीक आहे.

पा०:—मग याला उपाय ?

चि०:—उपाय काय ? तुह्मी कराल तो. शास्त्रानं पुष्कळ सवलत ठेवली आहे. दानं आहेत, जप आहे, ब्राह्मणभोजन आहे. (स्वगत) शिंचीं ब्राह्मणभोजनं घालून माझ्या पदरांत काय पडायचं आहे ? (उघड) ग्रामदेवतेचा रोष असल्यामुळें अनुष्ठान बसवावं किंवा जप करावा हा उत्तम पक्ष. जप लाख, पन्नास हजार, करावा तितका आहे.

पा०:–त्याला खर्च काय येईल ?

चि०:–खर्चाचं पाहूं हो! तुमच्या मुलाला बरं वाटावं ही आमची इच्छा. खर्च काय पडेल तो तुम्ही द्याल. त्याबद्दल आम्हांला मुळींच काळजी नाहीं. तुम्ही जा आतां. मी करतों सगळं व्यवस्थित. रोज तीर्थ घरीं पोंचतं करीन म्हणजे झालें. पंधरा दिवसांनीं गुण ठेवलेला. आन् नाहींच आला तेवढ्या मुदतींत गुण तर पाहूं पुढें काय करायचं तें.

पा०:–पण खर्च––

चि०:–त्याची नका करूं तुम्ही चौकशी. मी करतों तें सगळं. पण हें पहा, त्या वैद्यांच्या आन् डाक्तरांच्या नका लागूं नादीं आं! हो! अनुष्ठानाला पैसे खर्च झाले तर ते देवाच्या कारणीं तरी लागतील. ह्या चोरांचीं कां उगीच धन? हें पहा, तेवढे पंधरा एक रुपये द्या लावून तावडतोब अगोदर. पुढं काय लागतील ते बघूं मागून. जा तुम्ही आतां बेफिकीर.

पा०:–ह्यांत कांहीं कमी......

चि०:–हें पहा, त्याची नको तुम्हांला काळजी. माझं हो काय, मी दहांत सोडून पांचांत देखील करीन. पण तुम्हांला गुण यायला पाहिजे ना? इतरांसारखा माझा लबाडीचा धंदा नाहीं समजलांत? जा तुम्ही आतां. पैसे तेवढे लवकर लावून द्या, म्हणजे आरंभच करतों!

पा०:–पण,...

चि०:–कांहीं नाहीं. जा तुम्ही बेफिकीर. (पाटील जातो.) आज भवानी तर चांगली झाली. अग, तुला सवाष्ण जायचं आहे, लक्षांत आहेना? म्हटलं मथीला जा बरोबर घेऊन. त्यांना कुवारीण पाहिजेच असेल. हो! त्यांच्या लक्षांत नसलं तरी व्यवस्था करण्याचं काम आपलं आहे. यजमानांचं कमी पडूं देतां कामा नये. संध्या कुठपर्यंत आली तें अगदींच विसरलों पण. धर्माच्या कामांत व्यत्यय ठेवलेले! स्नानसंध्या देखील निर्विघ्नपणें पार पडायची नाहीं. म्हटलंच आहे, ‘ यथा सांग तें कर्म कांहीं घडेना ’ असो. ‘ अंगुष्टाग्रे तु गोविंदं तर्जन्यां तु महीधरं ’...आपल्याला सध्यां ग्रह जरा बरे आल्यासारखे दिसतात. विक्षिप्तरावाला जर त्याच्या मनासारखी बायको मिळवून दिली तर आपल्याला चांगलाच लग्गा लागेल. पण त्याला हवी तशी मुलगी मिळावी कशी व कुठें? भेटेल त्याला विचारीत सुटलं पाहिजे. केशा, अरे केशा, बाहेर कोण हांका मारतं आहे पहा. आवाज त्या तिरशिंगरावाच्या आवाजासारखा दिसतो आहे. हा गृहस्थ म्हणजे मोठा पाताळयंत्री आहे. त्याचीं बेट्याचीं चोहोंकडे संधानें असतात. त्याला जर ही लग्नाची गोष्ट कळवली तर, तो कोठून नाहीं कोठून तरी मुलगी पैदा करून आणील. (तिरशिंगराव येतो.) नमस्कार, तिरशिंगराव, या असे.

तिर०:–नमस्कार! काय चाललें आहे? तुमच्या नित्य कृत्यांत मी एक विघ्नच आलों म्हणायचा!

चिट०:–छे! छे! बसा खालीं. ‘ कनिष्ठिक्यां वसेद्विष्णुः करमध्ये तु माधवम् ’

तिर०:–(मनांत) या स्वारीला प्रथम आपल्या कामाचा थांग लागूं देतां उपयोग नाहीं. त्याच्याचकडून अगोदर बातमी काढून घेतली पाहिजे. (उघड) काय शास्त्रीबोवा, काय झालं काल यजमानाकडे गेलां होतां तें? दुसऱ्या कोणाचं बोलणं खपलं नाहीं तरी तुम्हांला त्यांच्या वरीं वाटेल तितकं बोलायला मुभा असेलच! तुमच्यावर त्यांची फार श्रद्धा दिसते बुवा.

चिट०:—छे, हो! मला तिथं गेलं ह्मणजे मुखस्तंभासारखं बसावं लागतं. बाकी श्रद्धेविषयीं म्हणाल तर त्यांची माझ्यावर आहे श्रद्धा तशी. कारण ह्मटलंच आहे श्रुतीनं, 'यजमानः श्रद्धा पत्नी.'

तिर०:—अहो पण त्यांना पत्नी कुठ आहे?

चिट०:—आतां मीं म्हटलेल्या श्रुतिवाक्याचा अर्थ नाहीं ध्यानांत आला तुमच्या. 'यजमानः श्रद्धा पत्नी' याचा अर्थ, यजमानांची आमच्यावर श्रद्धा आहे ह्मणून त्यांनीं मला एक पत्नी शोधून काढायला सांगितली आहे. श्रुतींचे अर्थ फार खोल असतात. ते तुमच्यासारख्यांच्या लक्षांत नाहीं यायचे. त्याला अध्ययन करावं लागतं ह्मटलं बारा वर्षं. उगीच नाहीं.

तिर०:—तें काय विचारावं? बरं तुह्मी काढली का पत्नी शोधून?

चिट०:—हो, बरी आठवण झाली. आमचे यजमान सांगत होते कीं, मगाशीं त्यांचेकडे कोणी एक रानदांडगा, पाजी मनुष्य आला होता व त्यानं त्यांस अतिशय त्रास दिला न्. असा कोण हरामखोर आला होता कुणाला ठाऊक? त्यानं म्हणे लग्नाच्या बाबतींत त्यांना घाबरवून त्यांचं मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला. जगांत माणसं तरी काय गाढव असतात हो!

तिर०:—पण त्यांचा लग्नाचा निश्चय अजून कायम आहेना! बाकी तो मनुष्य गाढव खरा.

चिट०:—मी आयत्या वेळीं तिथं गेलों म्हणून बरं झालं. नाहीं तर सगळाच ग्रंथ आटोपला होता. तें असो. तुमच्या आहे का आढळांत एखादी उपवर वधू? हें पहा, काळीसांवळी असली तरी चालेल. परंतु अलीकडल्या चवचाल पोरींसारखी उत्तरास प्रत्युत्तर देणारी नसावी. ती कांहीं शिकलेली वगैरे नसावी. कारण, 'विभूषणं मौनमपंडितानाम्'

तिर०:—(विचार केल्यासारखें करून) एक आहे तुम्ही ह्मणतां त्याप्रमाणें मुलगा— आपलं मुलगी माझ्या आढळांत. पण—

चिट०:—काय सांगा असेल तें. गणगोत्र देऊं कसं तरी जुळवून. पण ती बडबडी नाहींना? हो! ही चौकशी आह्मांला अगोदर करायला पाहिजे.

तिर०:—त्या मुलीच्या बापाच्या दोन तीन अटी आहेत. त्या तुह्मांस कबूल केल्या पाहिजेत. त्या इतके दिवस कोणी कबूल करीना; ह्मणून तर ती मुलगी पंधरा वर्षांची घोडनवरी झाली आहे. हो! अगोदर स्पष्ट बोललेलं असावं; मागून भानगड नको मग.

चिट०:—काय अटी आहेत त्या सांगा तर खरे. पण मला वाटतं, तुह्मी माझी थट्टा करतां. (आपल्याशीं) आपणही याची चेष्टा करावी थोडी. (उघड) काल मी एका गृहस्थाकडे मंत्रजागराला गेलों होतों. तेथें त्यानं आह्मांस आटीव दूध दिलन् प्यायला. त्या तर अटी नाहींतना? त्या गृहस्थास एक मुलगी होती खरी. त्याच जर अटी असतील, तर त्या मी कालच प्यालों आहें.

तिर०:—वा! तुह्मींच माझी थट्टा मांडलीत! मी चेष्टा नाहीं करीत, खरंच सांगतों आहें. त्याचं जर हें तुह्मीं जुळवून दिलंत, तर तो तुम्हांला चांगलं इनाम देईल. मुलगी मात्र अगदीं पसंत आहे. देखणी, मर्यादशील, लाजरी, तुम्हांला हवी तश्शी आहे.

चिट०:—(स्वगत) एकंदरींत आमचं नशीब जोरावर दिसतं आहे आज. (उघड) पण मला मुलगी नजरेखालीं घातली पाहिजे एकदां.

तिर०:—एकदां सोडून शंभर वेळां पहा-

ना ? त्याची भीड कशाला हवी ? पण मघाशीं सांगितलेलं आहेना ध्यानांत ? मुलीच्या बापाच्या अटी मात्र तुह्मी कबूल केल्या पाहिजेत.

चिट०:—चला तर आपण त्या गृहस्थाकडेच जाऊं. शुभस्य शीघ्रं. तिथं मुलगी पाहूं आन् त्यांच्या तोंडूनच त्यांच्या काय अटी आहेत त्या ऐकूं. जमलं तर दिऊं ताबडतोब बार उडवून ! काय शिंची आज कांहीं संध्या शेवटाला जात नाहीं. बाकीची मग आल्यावरच करूं. चला व्हा पुढं. मी हा निघालोंच अंगरखा पागोटं घालून. (जातात.)

(अंक १ ला समाप्त.)

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(**विक्षिप्तराव** प्रवेश करतो.)

विक्षि०:—काल जो उपटसुंभ्या शहाण्याचा कांदा मला लग्न करूं नका म्हणून सांगायला आला होता, तो बहुतेक त्या पाजी साळसुद्यानंच माझ्याकडे पाठविला असला पाहिजे. बरं आहे बच्चमजी ! इतके दिवस माझ्या ज्या खोड्या केल्या आहेस, त्याबद्दल तुला चांगलाच इंगा दाखवतों आतां. आजपर्यंत आपला म्हणत होतों, लग्न करून काय करायचं आहे ? आहे आपला पुतण्या, त्याच्याच नांवानं सगळं करून टाकावं व स्वस्थ “ हरि, हरि ” म्हणत बसावं झालं. पण नाहीं. आतां त्या साळसुद्याच्या हातांत नारळाची आई देऊन त्याला देशोधडीला लावीन, तेव्हांच मला बरं वाटेल. ह्यासाठीं ताबडतोब लग्न हें झालंच पाहिजे. चिटकंभटाला मुलीविषयीं सुचवून ठेवलंचं आहे. त्याला जरा पैशाची लालूच दाखविली कीं, आपलं काम हां हां ह्मणतां करून देईल. एखादी फार न बोलणारी मुलगी मिळाली तर मग ती कुरूप असो कीं भिकारी असो, त्याची मला मुळींच पर्वा नाहीं. तिच्या बापाच्या कांहीं अटी असल्या तरी त्या पत्करीन. त्याला मागेल तितके पैसे देईन. तिच्याबरोबर पंधरा माणसं आलीं तरी त्यांना पोशीन. कांहीं अडचणी येवोत, लग्न हें झालंच पाहिजे. (जातो.)

(चिटकंभट प्रवेश करतो).

चिट०:—(हंसतो.) त्या तिरशिंगरावानं बेट्यानं, विक्षिप्तरावाला फसवण्याची काय पण युक्ति काढली आहेन् ! जर कां हें लग्नाचं जुळलं, तर काय आपली चंगळ उडणार. दोन्ही बाजूंनीं पैशाची लाट. विक्षिप्तरावाला मनासारखी मुलगी पाहून दिली म्हणून त्याच्याकडून बक्षीस उपटायचं. शिवाय दक्षणा वगैरे आहेच. इकडे तिरशिंगरावाचा आन् साळसुदरावाचा डाव साधला म्हणून बिदागी मिळणारच. पण, आपण तिरशिंगरावाच्या कटांत सामील होऊन आपल्या यजमानाला फसविल्याचा दोष मात्र पदरीं येणार. विक्षिप्तरावाचं व आपलं कायमचं वांकडं येणार. काय बरं करावं ? हो असंच. आलं वाकडं तर त्याचं बघतां येईल पुढं. ‘ तुरुत दान महापुण्य. ’ कोणचंही धाडस केल्यावांचून द्रव्यप्राप्ति होत नसते. कारण ह्मटलंच आहे, ‘ **यत्नं विना नैव मिळन्ति द्रव्यं.** ’ आणखी तिरशिंगरावाच्या सांगण्यानं आपणही फसलों असं दावं सांगून विक्षिप्तरावाला. हें काम जर फत्ते झालं, तर त्याची सगळी दौलत ह्मणे त्या साळसूदरावाला मिळायची आहे. ती कशी मिळणार तें ईश्वरासच ठाऊक. आपल्याला काय करायचं आहे

त्याच्याशीं ? नवरा मरो, नवरी मरो, आम्हांला पैसे मिळण्याशीं गांठ. ह्या लग्नाच्या कामांत मदत केल्याबद्दल तिरशिंगरावानं आपल्याला चांगलं मोठं बक्षिस द्यायचं कबूल केलं आहे. तो विक्षिप्तराव एकदां आपल्या पुतण्याच्या तावडींत सांपडला कीं मग कोण त्याला विचारतो ? त्याच्या अगोदर मात्र आपलं बक्षिस उपटलं पाहिजे. आतां अगोदर आपलं पहिलं काम गुलाबाला घेऊन विक्षिप्तरावाकडे जायचं. तिथं ठरल्याप्रमाणं गुलाबाबद्दल खोट्यानाट्या गप्पा झोंकून द्यायच्या, आन् लागलीच मुहूर्तच पहायचा. पण तो विक्षिप्त थेरडा गुलाबाच्या पुरुषवेषाबद्दल काय ह्मणेल कोणास ठाऊक ? तो लग्नाविषयीं अगदीं उतावळा झाला आहे ह्यांत कांहीं शंका नाहीं. त्याला सांगावं तुला ताबडतोब आणि बभ्रा न करतां लग्न करायचं असेल तर असली सोन्यासारखी संधि फिरून यायची नाहीं. आतां जर नाहीं होय करीत असाल तर मी पुन्हां ह्या फंदांत बिलकुल पडायचा नाहीं. असं निर्वाणीचं सांगितल्यावर मग काय ह्मणतो आहे नाहीं ! झालंच, विक्षिप्तरावाच्या घरीं कसं व किती बोलायचं, ह्याची गुलाबाला चांगली संथा दिली पाहिजे. हें रामेश्वराचं देऊळ आलंच. इथं मीं त्याला बोलावला होता. ह्मटलं, उद्याचं कांहीं वाणआमंत्रण पहावं आन् जावं विक्षिप्तरावाकडे. (देवळाचा पडदा उघडतो.) हा पहा गुलाब अगोदरच येऊन बसला आहे.

गुलाब०:—वा! शास्त्रीबुवा, काय उशीर केलांत हा !

चिट०:—आपण ज्या कामासाठीं चाललों आहों ,त्याला थोडीशी संध्याकाळच झालेली बरी. बाकी मला थोडा उशीर झाला खरा.मी निघालों होतों वेळेवर, पण मध्यें वाटेनं दहावीस गृहस्थ भेटले. एक शकून विचारतो तर दुसरा मुहूर्त सांगा म्हणतो. आपलं काय ? पैसे मिळतात म्हणून नाहीं म्हणवत नाहीं. शिवाय 'परोकारः पुण्याय.' लोकांच्या उपयोगी पडत असावं. असो; इथं एक क्षणभर बसून निघूंच आपण.

गुला०:—तुमच्यावर एवढ्या लोकांच्या उड्या पडतात,तर तुमचं धर्म, ज्योतिष वगैरे शास्त्राचं अध्ययन बरंच असलं पाहिजे. (स्वगत) ह्याला थोडासा चढवावा आतां. (उघड) ह्या गांवांतल्या शास्त्र्यांत तुमचा हात धरणारा कोणी नसेलच अर्थात्.

चिट०:—हें काय विचारतोस वेड्यासारखं ? ह्या गांवांत मी एक जाडा विद्वान आहें. इथें किरकोळ शास्त्री पैशाला पासरी आहेत; पण माझ्यासारखा मीच. गुरुजींच्या घरीं थोडीं थोडकीं नाहींत, बारा वर्षें वाळविलीं आहेत. तुझ्यासारखा नाटकांत शिरलों असतों तर आज जिकडे तिकडे 'या चिटकंभट, या चिटकंभट' असं कोणी म्हणता का ? नाहीं, तूंच सांग. संस्कृत म्हणजे माझ्या हाताचा नुसता मळ आहे.

गुला०:—(स्वगत) स्वारी चढली हरभऱ्याच्या झाडावर. वाटेल त्या थापा देतो आहे लेकाचा ! पुरा गप्पीदास आहे. पाहूं तर खरं आणखी काय गप्पा झोकतो आहे त्या. (उघड) एवढं तुम्हांला संस्कृत येत आहे, तर तुम्ही संस्कृतभाषा कधीं बोलत नाहीं ते ?

चिट०:—हा खुळ्या ! संस्कृत बोलत नाहीं ह्मणजे ती भाषा कुणाला समजत नाहीं म्हणून. संस्कृत बोलायचं नाहीं असा आपल्या मनाशीं मीं किती निश्चय केला तरी मी पडलों शास्त्री. यामुळं नाहीं म्हटलं तरी बेटी संस्कृत भाषा तोंडांत येतेच. कालचंच उदाहरण सांगतों तुला. इकडून यात्रा नेण्यासाठीं प्रयागकडचा एक ग-

यावळ इथं आला आहे. त्यानं मला एकदां सहज विचारलंन्, 'किदर जाते ?' मी चटदिशीं बोलून गेलों 'उत्तमे शिखरे जाते.' मग माझ्या ध्यानांत आलं कीं हा अडाणी गयावळ आन् ह्याला मी संस्कृतमध्यें उत्तर काय देतों आहें ? तसंच पुन्हां एकदां त्यानं विचारलंन, 'किदरसे आया ?' मीं म्हटलं, '**आयातु वरदा देवी.**' झालं. असं जिथं तिथं संस्कृत येतं. काय करावं याला ? इतकं आहे तरी वार्धक्यामुळें अलीकडे मला कमी दिसूं लागल्यानें पुष्कळ वेळां माझी फजिती होते. मला नीट दिसतच जर नाहीं तर मी तरी काय करणार ? एकदां एका यजमानाच्या घरीं कायसं कार्य चालवावयाला गेलों होतों. आमच्या जुन्या पोथ्या कशा असतात, त्या तुला माहीतच आहेत. त्यांमध्यें अक्षरं जीं कांहीं काढतात, **य** सारखा **प** आन् **प** सारखा **य**. त्यांत एके ठिकाणीं होतं "**पांडवानां युधिष्ठिरः**" आह्मीं वाचलं '**याण्डवानां पुधिष्ठिरः.**' झालं, मंडळी लागली खो खो हंसायला. माझ्या कांहीं चूक लक्षांत येईना. पण मी ह्मणतों, किती झालं तरी श्रुति आहे ती. कसंही वाचलं तरी श्रुतीचा अर्थ कां कोठें बदलत असतो ? पण नाहीं. आमच्या अलीकडच्या शिकलेल्या लोकांना हें कुठं अजून तत्त्व समजलं आहे ? त्यांना अगदीं ऱ्हस्व, दीर्घ, काना, मात्रा बरोबर वाचलं पाहिजे आणि ह्मटलं पाहिजे. आह्मी अडाणी लोकांशीं प्रसंग आला असतां वाटेल तें दडपून देतों. आम्हांला कोणी विचारीत नाहीं आणि सवरीत नाहीं. बरं तें असो. विक्षिप्तरावांकडे येतोसना आतां ? समज, त्यांनीं तुला नांव विचारलं. तर काय सांगशील ? अगदीं लहानसं नांव शोधून काढ. नाहीं तर सांगशील एखादं शकुंतला, अतिमुक्तलता, असलं लांबलचक नांव. त्यांनीं कांहीं प्रश्न विचारला तरी होय किंवा नाहीं, याशिवाय तिसरा शब्द नाहीं बोलायचा बरं का ? बाकीचं तुला सांगायला नकोच.

गुला०:– पण माझ्या ह्या पुरुषवेषाबद्दल तुम्ही त्यांना काय सांगणार ?

चिट०:– त्याची नको तुला काळजी. त्याला अशा थापा देतों कीं यंव.

गुला०:– (स्वगत) शास्त्रीबुवांचं अध्ययन तर अकटोपासून विकटोपर्यंत आहे. आतां यांची थोडी गम्मत करावी. (उघड) कायहो शास्त्रीबुवा, मला आज कित्येक दिवस एक शंका आहे. फलाणीची बंडी, फलाणीचा अंगरखा, म्हणतात, तो फलाणी हा शब्द काय आहे ? त्याला संस्कृताबिंस्कृताचा आधार आहे कीं काय ?

चिट०:–ह्यांतरे काय ? हा प्रश्न अगदींच पोरकट. तूं लहानपणीं थोडीशी रुपावळी, समासचक्र वगैरे कांहीं म्हटलं नाहींस वाटतं ! अरे, फलं, फले, फलाणी, **फलाणी** हा फलम् शब्दाचं प्रथमेचं अनेकवचन.

गुला०:– हां, हां. अगदींच विस्मरण झालं होतं मला.

चिट०:– बरं आतां उगीच उशीर कां ? तुझ्यासारख्या पोराला माझ्यासारख्या विद्वानानं आपल्या अमर्यादित ज्ञानभांडारांतली एक एक चीज काढून दाखवायची म्हणजे तुझे पांच जन्म देखील पुरायचे नाहींत. तेव्हां ह्यांत वेळ घालविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तर आतां विक्षिप्तरावांकडेच जाऊं कसे.

गुला०:–(स्वगत) काय आहे पण लब्धप्रतिष्ठित व्यक्ति ? आपल्याला विद्वान म्हणवून घेण्यांत लैंकाला लाज कशी वाटत नाहीं कोणास ठाऊक ? पण करतां काय ? ह्या-

च्याशीं आला आहे प्रसंग. काय म्हणतातें-ना त्यांतली अवस्था. ' हा गुलाब अडला, आणि चिटकूच्या पायीं पडला.' (उघड) बरं चला तर शास्त्रीबुवा. (जातात.)

प्रवेश २ रा.

(स्थळः— तिरशिंगरावाचें घर.)

तिर०:— (हुजऱ्यास) तुला सांगितलेलं गाणं केलंस का पाठ ?

बा०:— होय महाराज.

तिर०:— म्हण पाहूं. आज आवाजी बिवाजी ठीक आहेना ?

बा०:— आवाजी ठीक आहे आणि मी तें म्हणतोंही. पण तें गाणं दुसऱ्या कोणीं ऐकतां कामा नये.

तिर०:— तें कां बुवा ?

बा०:— तें लोकांनीं ऐकलं तर गांवांत तुम्हांला सर्वजण कवी म्हणून हांका मारूं लागतील. शिवाय त्यांतला विषय असा आहे कीं, पुष्कळ चैनी व ऐटबाज लोक तुमचा व त्याबरोबर माझा द्वेष करूं लागून त्यांच्या घरीं आपणांस मज्जाव होईल.

तिर०:— बरं म्हण तर खरं. (हुजऱ्या गाऊं लागतो.)

डोइभर घेरा, त्यावरि मारा तेलाचा
तुम्हि सदा करा

(**साळसूदराव** प्रवेश करतो)

साळ०:—काय बेटयाला काळजी म्हणजे काय पदार्थ आहे हें देखील माहीत नाहीं. ऐटबाज पोषाख, सतार, गाड्याघोडीं, गाणंबजावणं, ह्यांत सारा दिवस दंग. अहो रंगेल महाराज, तुम्हांला ह्या क्षणीं जर एखाद्या भयंकर रोगाचा झटका आला किंवा उद्यां फाशीची शिक्षा झाली, तर मात्र वेळेचं महत्व आणि किंमत तुम्हांला समजूं लागेल.

तिर०:—मग माणसानं काय करावं असं आपलं मत आहे ?

साळ०:—कांहीं करूं नये. झोंपा ताणाव्या, नाटकं तमाशे पहावे, मेजवान्या झोडाव्या, गाड्याघोडीं, उडवावीं व चैन करावी.

तिर०:—ह्या वयांत हेंच केलें पाहिजे. केंस पिकले, गात्रं शिथिल झाली, डोळ्यांस दिसेनासं व कानांना ऐकूं येईनासं झालं ह्मणजे बाकीच्या गोष्टींचा विचार करायला पुष्कळ वेळ आहे.

साळ०:—हें ठीक. ज्या वयांत शक्ति गेल्यामुळें कांहीं करतां येणें शक्य नाहीं तोच काल चांगलीं कृत्यं करण्यासाठीं राखून ठेवायचा एकूण ?

तिर०—आज आपण तुकारामाचा गाथा किंवा दासबोध वाचून आलां आहां वाटतं ? पांडित्य तर खूप चालवलं आहेत. पण मी सांगतों माझ्याशीं वेदांताच्या गोष्टी सांगत जाऊं नका. बोलायचं असेल तर पोषाख, गाणं, जेवणं ह्याविषयीं बोंलत जा. पण तें राहूं दे. अलीकडे समाजांत केव्हां गेला होतास ?

साळ०—समाज कुठला ?

तिर०—वेडतर खूप पांघरतो आहेस बुवा. तुला ठाऊक नाहीं वाटतं ?

साळ०—खरंच मला नाहीं माहीत.

तिर०—वा ? इथल्या रंगेल मंडळींनीं एक नवीन समाज स्थापन केला आहे त्याचं नांव **रंगेलसमाज.** तिथे नवीन गवई आला तर त्याचं गाणं व्हायचं, रोज संध्याकाळीं पत्ते व गंजिफा आन् लोकांच्या कुटाळक्या चालायच्या असं ठरलं आहे.

साळ०:-- पण ह्या समाजाचे अध्यक्ष कोण ?

तिर०:-- ते आहेत, असेच एक नखरे-

बाज गृहस्थ. त्यांचं नांव **धोंडोपंत बिनअकले.** दिवसाच्या चोवीस तासांपैकीं विचाऱ्याचे चार पांच तास पोषाख करण्यांत व नटण्यांत जातात. त्याच्यावर मी एक फटका केला आहे, तो ऐक. बाळा, ह्मण पाहूं. (बाळा म्हणतो.)

फटका.

डोइभर घेरा त्यावरि मारा तेलाचा तुह्मि सदा करा । सत्तर वर्षें झालीं तरिही अत्तर घेण्या नच विसरा । पोकळ सदरा भरजर पदरा, नखरा सारा परि न खरा । घालुनि पगडी, काळा दवडी, चिंता कवडीची न धरा । सुंदर जाकिट त्याला पाकिट घड्याळ किटकिट त्यांत करी । आली साठी बुद्धी नाटी रंगित काठी हातीं बरी । कलप मिशांला हवा कशाला ? पात्र हशाला कां होता ? । कृत्रिम दातां बसवुनि आतां व्यर्थचि बाता कां देतां ? ।

साळ०:– माझं तर असं मत आहे कीं, एखाद्या मनुष्यांत कांहीं व्यंग असलं तर तें झांकण्याकरितां त्यानं खोटे दांत बसवावे, केंसाचे टोप घालावे, कलप लावावा, वाटेल तें करावं. त्याचे केंस मोठे असतील तर त्यानं पेलेदार मोठा घेरा ठेवून आपल्या डोक्याची शोभा जास्त करावी; शरीर पिळदार असेल तर तें लोकांना तसं दिसेल असा पोषाख करून छाती काढून खबूतरासारखं ऐटींत चालावं. असे, ' एकनूर अदमी सो दसनूर कपडा ' अशी ह्मणच आहे.

तिर०:–हें सगळं त्यांनीं उघडपणें करावं असं तुझं ह्मणणं आहे कीं काय ?

साळ०:– तसं नाहीं. पण त्यांनीं तें करायला मात्र हरकत नाहीं. केंसाचा टोप घालतांना किंवा खोटे दांत बसवतांना हिडिस दिसतील, परंतु ते बसवल्यावर चांगले दिसलेच पाहिजेत. नाटकगृहांतील रंगण्याच्या खोलींत जर सर्व प्रेक्षकांना हजर असण्याची परवानगी दिली तर तेथील देखावा मोठा मनोहर दिसेल नाहीं बरं ? पण तींच पात्र आंतून रंगून सजून आलीं असतां किती छान दिसतात ? आपल्या मित्रांना किंवा चाकरांना देखील कोणी आपल्या पोषाखाच्या खोलींत येऊं देतां कामा नये.

तिर०:–हें अगदीं बरोबर आहे.

साळ०:– मी परवां आपल्या मित्राबरोबर एका वृद्ध गृहस्थाच्या घरीं गेलों होतों. त्याला अगोदर न कळूं देतां आह्मी एकदम त्याच्या खोलींत शिरलों. त्या सरशी त्यानं घाईनं जवळ पडलेला एक केंसाचा टोप आपल्या टक्कल पडलेल्या डोक्यावर ठेवला तो गडबडींत उलटाच बसला.

तिर०:-- वा ! मग काय झालं ?

साळ०:- व्हायचं आहे काय ? माझा मित्र मोठा खमंग होता. तो शांतपणानं त्या वृद्ध गृहस्थाच्या काळ्या कुळकुळित केसांची यथेच्छ स्तुति करीत होता. मी मात्र त्याच्या कृत्रिम शेंडीची गांठ कपाळावर पडलेली पाहून मनांत हांसत होतों.

तिर०:–मग तूं तरी आटपतं घ्यायचं होतंस कीं नाहीं ?

साळ०:–तें नाहीं घेतलं; तरी आपण हा विषय आटपतां घेऊं या. पण मघाशीं सांगत होतास तो धोंडोपंत हा कोण मनुष्य आहे मला सांग पाहूं अगोदर.

तिर०:–धोंडोपंत ना ? त्याला मनुष्य कां ह्मणावं हेंच मला समजत नाहीं. तो एक नुसता जंगमाच्या खांद्यावरचा आहे झालं.

साळ०:–तुझी अन् त्याची कुठली ओळख ?

तिर०:–हात्त्याच्या ! ओळखीलारे काय?

त्याला एखादा गोमाजी मंडईत जरी भेटला तरी तेवढ्यानं त्याची ओळख होते. त्याची ऐट मात्र बघून घ्यावी. बाकी अक्लेच्या नांवानं आंवळ्या एवढं. त्याला वाटतं आपण कोणीतरी बडे सरदार आहों. तो कचेरींत काम चाललं असतांना तिथें न्यायाधिशाला किंवा त्याच्यापुढें भाषण करणाऱ्या वकिलाला ऐटींत नमस्कार करतो. आज ह्याचं गाणं कर, उद्यां त्याला मेजवानी दे, हा प्रकार त्याच्या घरीं नेहमीं चाललेला असतो. आपल्या घराच्या खिडकींत उभा राहून नेहमीं रस्त्यानं जाणारा येणाराला वर बोलावतो. एवढ्यासाठीं भर राजमार्गावर त्यानं मुद्दाम एक नवीन घर भाड्यानं घेतलं आहे. जवळ जवळ पन्नाशी उलटली आहे तरी ऐट एखाद्या तरण्या बांडासारखी आहे.

साळ०—त्याचं लग्न वगैरे झालंच असेल ?

तिर०:—तो पुष्कळ लग्नं करील, पण अशा फाफाजीला द्यायला कुणाची मुलगी वर आली आहे ?

हुजऱ्या०:—खालीं धोंडोपंत ह्मणून कोणी गृहस्थ आले आहेत.

तिर०:—(साळसूदरावास) तो बहुतेक मला गाण्याला किंवा मेजवानीला बोलवायला आला असेल; (हुजऱ्यास) जा, त्यांना वर घेऊन ये. (हुजऱ्या जातो). आतां बघ त्याला मी त्याच्या सगळ्या कुळाचा इतिहास सांगायला लावतों. एकदां यंत्राला किल्ली द्यायचा अवकाश, कीं झालं सुरूं; तुला तो आपली सगळी कर्मकथा सांगेल. (**धोंडोपंत येतो**).

धोंडो०:—नमस्कार तिरशिंगराव; (साळसूदरावास) नमस्कार.

तिर०—नमस्कार ! या, असे या, आपली पायधूळ झाडून माझं घर आपण पवित्र केलंत याबद्दल मी आपला फार ऋणी आहें. (सर्व बसतात.)

धोंडो०—कसचं! कसचं! तुमचा वाडा खूप सुंदर आहे बुवा, अगदीं थेट माझ्या वाड्यासारखा.

तिर०—छे ! भलतंच !

धोंडो०—ह्मणजे राजमार्गावर असून जरा विस्तृत, उंच व नवा असतां तर तुमचा जरा आडरस्त्याला आन जुनाट व कोंदट आहे. बरं तिरशिंगराव, परवांच्या दिवशीं माझ्या घरीं कांहीं मंडळी मेजवानीला बोलावली आहे. तेव्हां तिथं आपली व आपल्या मित्रांची फार जरूर आहे.

तिर०:—काय ? आमची जरूर ? गांवांतले सगळे आचारी वाढपे मेले कीं काय ?

धोंडो०:—असं नव्हे हो. मंडळीच्या पंक्तीला आपल्यासारखे गृहस्थ अवश्य हवेत.

तिर०:—अस्सं ? मग ठीक आहे. पण तुमची ही मेजवानी व्हायची आहे कुठं ?

धोंडो०:—राजे बहाद्दरांच्या हवेलींत.

तिर०:—हे राजे बहाद्दर कोण ?

धोंडो०:—त्यांचं आणि माझं अगदीं जवळचं नातं आहे. त्यांची बायको ती माझ्या चुलतचुलत्याच्या भाच्याच्या मावशीची आते बहीण.

साळ०:—ह्मणजे अगदींच जवळचं नातं. हे राजे बहाद्दर ह्मणजे नसरापूरचे प्रसिद्ध सावकार असतील ?

धोंडो०:—छे ! कुसुमपूरचे राजे बहाद्दर.

तिर०:— (एकीकडे) हं ! आतां मिळाली यंत्राला किल्ली बरं का ?

धोंडो०:—बाकी त्यांचं आणि आमचं घराणं एकच, चंपावतीचे राजे बहाद्दर, रामनाथपूरचे राजे बहाद्दर, बह्मनाळचे राजे

बहादूर व आह्मी हे सगळे एका दर्शीतले. आमचं घराणं अत्यंत प्राचीन. आमचे खापर-निपणजे देवगडच्या रामदेवरावाचे दिवाण होते. आम्हांला अजून देखील तिकडे एक मोठी जहागीर आहे. हिंदूचं राज्यवैभव जाऊन मुसलमानांचा दक्षिणेवर अम्मल बसला त्यावेळीं आमच्या पूर्वजांनीं तरवार गाजविल्यामुळें आह्मांला दिल्लीपतींकडून ' तख्त–इ–मुलाजत ' असा बहुमानाचा किताब मिळाला. पुढें मुसलमानी रियासतीस उतरती कळा लागून मराठ्यांचा भगवा झेंडा हिंदुस्थानांत सर्वत्र फडकूं लागला, तेव्हां पेशवेसरकारनें आमच्या शौर्यावर खुष होऊन आह्मांस ' राजे बहादूर ' असा किताब दिला. ह्या दोन्ही किताबती अजूनही आमच्या घराण्यांत चालूं आहेत. पण हें सगळं सांगून आतां काय उपयोग ? हल्लीं त्या किताबांना व मानांला विचारतो कोण ? असो; परवांच्या मेजवानीला ग्वालेरचे एक प्रसिद्ध गवय्ये यायचे आहेत. त्यांचं नांव काय बरं ? हो; **घोगरे बुवा बदसुरे.** आवाज ह्मणजे काय आहे ? कांहीं विचारूं नका. ताना म्हणजे काय घेतात ? प्रतिगंधर्वच जसे. शिवाय चंदनपूरचे खासेराव, श्रीरंगचे सेनाधुरंधर, वगैरे बडी बडी मंडळी यायची आहे. मी लहानपणीं जरा उल्लूच होतों. नाचतमाशांत खूप पैसा उडवला आहे. पुढें आह्मांस मर्कटपूरची सुभेदारी मिळाली, आणि आमच्या वडील बंधूची त्याच वेळेस मरायची लहर लागल्यामुळें मी एकदम सरसुभा झालों. त्या वेळेस ऐसा भपकेदार पोषाख चढवून दिला होता कीं यंव ! ती तरवार, तो शिरपेंच, तो मंदील व ती आंगठ्यांची पलटणच्या पलटण. याच पोषाखानें गेलों आमच्या जहागिरीच्या गांवावर. आन काय ? तेथें जमिनीची तपासणी केली, कुळांकडून नवीन कबुलायती करून घेतल्या, वसूल जमा केला व येथें दरबारांत येऊन खूप चैन केली. पण त्याचं आतां काय ?

साळ०:—सध्यां आपण कोणच्या कामावर आहां ?

तिर०:—अरे, त्यांना दम लागला आहे, जरा विश्रांती तरी घेऊं देशील कीं नाहीं?

धोंडो:०—हें पहा, मला आणखी पांच दहा मित्रांना बोलावणीं करायाला जायचं आहे, तिथं ही बोलण्यांत बराच वेळ जाणार. तेव्हां आतां मी आपली रजा घेतों.

तिर०:—आह्मी अगदीं खास येतों. बिलकुल काळजी नको. (धोंडोपंत जातो).

साळ०:— ही म्हणजे एक वल्ली आहे बुवा !

तिर.—आढणी वरचा स्वार आहे झालं! बरं तूं आतां जा, आणि त्या चिटकंभटानं आपल्या कामाचं कुठपर्यंत आणलं आहे, याची चौकशी करून मला कळीव, म्हणजे पुढें काय करायाचं तें ठरवूं. (दोघे जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ०:—विक्षिप्तरावांचें घर.

विक्षिप्तराव व चिटकंभट बसले आहेत.

विक्षि०:—शाबास शास्त्रीबुवा ! माझ्या अगदीं मनाजोगतं स्थळ शोधून काढलंत. माझ्यावर तुमचे अत्यंत उपकार आहेत.

चिट०:—कसचे कसचे ! बाकी स्वतःची स्तुति करूं नये म्हणून नाहींतर मी खरोखरच आहें तसा हुषार.

विक्षि०:—पण कायहो तुह्मांला इतकी मितभाषिणी मुलगी इतक्या लवकर कशी सांपडली ?

चिट०:—कशी सांपडली ? उगीच नाहीं सांपडली. मेहनतच केली आहे तशी. ह्याच्या घरीं जा, त्याच्या घरीं जा, असं करतां करतां चार जोडे फाडले आन् पंध्रा उंबरठे झिजवले. (स्वगत) आतां बवा लेंकाला लग्नाच्या हर्षांत माझ्या बडबडीचा राग येतो आहे का ? नाहींतर, ' थोडक्यांत सांगा, हळू बोला, ' ह्मणून सारखा वस्स वस्स अंगावर यायचा. (उघड) तुह्मी माझ्या खटपटीबद्दल मला बक्षीस द्याल, मी तें घेईन, तें सर्व कांहीं होईल. मीं तें मागण्याचं मुळींच कारण नाहीं; पण ह्मटलं आपलं सुचवलेलं असावं. कां, खरं कीं नाहीं ? फार नाहीं; एक तोडा बस्स.

विक्षि०:—(स्वगत) जीभ तोडा गुलामाची ! तोंड आहे का तोबरा आहे, कोणाला ठाऊक ! (उघड) शास्त्रीबुवा, आमचा हा कायमचा लग्नाचा जोडा जमला कीं आहेच तुमचा तोडा. त्याची तुह्मी अगदीं काळजी सोडा. तुम्हांला रहायला एक बडा वाडा, बसायला एक उत्तम घोडा, खायला सुंदर विडा, ह्यांत कांहीं कमी पडायचं नाहीं. अहो, पण त्या साळसुद्याची आहेना पिडा ? तो घालील मधें मोडा; मग आह्मीं काय रडा ? म्हणून सांगतों, उद्यांचाच मुहूर्त पकडा. काढा, काढा पंचांग.

चिट०:—(खिसा चांचपून) छेः ! पंचाग नाहीं कामाचं. मुहूर्तचिंतामणींत वराच्या गुणांप्रमाणं व शरीराप्रमाणं विवाहास निरनिराळे मुहूर्त सांगितले आहेत. तेव्हां त्याच ग्रंथाच्या आधारानं विचार केला पाहिजे. (आठवलेंसें करून) काय बरं तो श्लोक ? पांचव्या सर्गांतला सहावा श्लोक आहे तो. हां ! आठवला. " प्रथमं वक्रतुंडंच "— ह्मणजे वराचं तोंड जर जरा वाकडं बिकडं असेल तर त्याला प्रथमं ह्मणजे प्रतिपदेचा मुहूर्त चांगला. ' एक दंष्ट्रं द्वितीयकम् " ह्याचा अर्थ, वराच्या वार्धक्यामुळं सर्व दाढा पडून जाऊन एकच उरली असेल तर त्याला चांगला मुहूर्त ह्मणजे द्वितीया. नवरामुलगा—नवरामुलगा कसला ? नवराबुवा जर ह्मातारा असेल तर त्यानं आपलं लग्न द्वितीयेस करावं. आतां पुढं " तृतीयं कृष्णपिंगाक्षं गजवक्त्रं चतुर्थकम् । लंबोदरं पंचमंच" —नवऱ्यामुलाचं पोट जर मोठं असलं तर त्याला पंचमीचा मुहूर्त मंगलकारक. उद्यां आहे पंचमी. आपल्या ह्या लठ्ठ पोटाला तो मुहूर्त बरा दिसतो. बाकी पुढेंही पुष्कळ मुहूर्त आणखी सांगितलेले आहेत; परंतु ते वराच्या अमूकच नावांविषयीं आहेत. ' एकादशं गणपतिम् ' नवऱ्यामुलाचं नांव गणपति असलं तर त्याला एकादशीचा मुहूर्त छान. तुमचं पाळण्यातलं नांव काय गजा होतं नाहीं का ?

विक्षि०:—बरं, मग ? त्याचा संबंध काय इथें ?

चिट०:—त्या नांवाला द्वादशीचा मुहूर्त निषिद्ध आहे.

विक्षि०:— तो कसा !

चिट०:— ' द्वादशंतु ' गजा ' ननः ' दोन 'न' घालून जोराचा निषेध व्यक्त केला आहे शास्त्रानं. आमच्या ज्योतिषशास्त्रांत सर्व प्रकारच्या वरांचा कीस काढून मुहूर्ताचा कसा बारकाईनें विचार केला आहे तो आला ध्यानांत ? एकंदरींत आमचे पूर्वज विचारी खरे. आतां, मुहूर्तमार्तंड, कौस्तुभ, विवाहचिंतामणी, त्रिभुवनचिंतामणी—

विक्षि०:—पुरे, पुरे, तुमचे ते विवाहचिंतामणी आन् त्रिभुवनचिंतामणी. तुमचीं हीं ग्रंथांचीं नांवं ऐकून मी घाबरून गेलों आहें आणि मला आतां त्रैलोक्यचिंतामणीची मात्रा घेण्याचा प्रसंग आला आहे. तें राहूं द्या सगळं बाजूला, आन् उद्यांचाच मुहूर्त

धरा कसा. लग्नाच्या वेळचे तुमचे मंत्र तंत्र कसे पांच मिनिटांत आटपले पाहिजेत बरं का ! एखादा चणचणीत भट तुमच्या मदतीला घ्या. उठा लागा तयारीला. मंगळाष्टकं बिकं कांहीं नको आं ! माझे कान जाग्यावर राहिले पाहिजेत हे लक्षांत ठेवा आणि आतां चालूं लागा.

चिट०:--(स्वगत) तुझे कान कुठें जाताहेत ? ते जरा आंखूड आहेत ते लांबच होतील. (उघड) पण लग्नाच्या सामानाची यादी व दक्षणेचं—

विक्षि०:—तें करा सगळं तुह्मी. काय लागतील ते पैसे देईन मी तुम्हांला. हं. उठा.

[चिटकंभट जातो.]

विक्षि०:–(स्वगत) जुळलं एकदाचं ! बरं आहे साळसुबा ! बघतों आतां तुझा तमाशा. माझ्या गांवांत कुटाळक्या करून मीं लग्न करूं नये ह्मणून मला भेवडावण्यासाठीं आपले मित्र माझ्याकडे पाठवतोस नाहीं का ! (हंसून) बायको पण काय छान मिळाली आहे ! आपण तर तिच्या नुसत्या नांवावरच खुष होऊन गेलों. आवाज तरी किती बारीक व मंजूळ. तिला बोलायलाही फारसं नको आहे, ही गोष्ट काय नामी आहे ! ती बडबडी आहे कीं काय याची परीक्षा करण्यासाठीं मीं तिला पांचपन्नास प्रश्न विचारले; पण एकाचं तरी उत्तर द्यायचं होतंन् ! ती लाजेनं किंवा पढवल्यामुळं बोलत नसेल अशी शंका येऊन तिच्या तोंडून उत्तरं काढण्यासाठीं जंगजंग पछाडले, किती क्लृप्त्या लढवल्या, पण नांव नाहीं.होय,नाहीं,ह्याशिवाय तिसरा शब्द नाहीं. ह्याला ह्मणावं बायको, आन् मर्यादा. नाहीं तर अलीकडच्या मुली ! जशा महादेवाच्या देवळांतल्या घंटा. तिनं पुरुषवेष घेतला होतान् तरी मूळचा बायकोपणा झांकणार कसा ! असेना तिचा पुरुषवेष असा ? आपल्याला काय करायचं आहे ? परवां त्या रानदांडग्यानं मला भीति घातलीन् कीं तुह्मीं लग्न केलंत तर तुमची बायको दागिने मागेल,शालू मागेल, अमूक हवं ह्मणेल, तमूक हवं ह्मणेल; त्याला म्हणावं घे आतां ! असो; इथपर्यंत तर ठीक जुळलं. आतां पुढच्या तयारीला लागलं पाहिजे. मुक्या ! ए मुक्या ! (मुक्या येतो.) मघाशीं लग्नाचा बेत ठरला तो ऐकलासना ? हां ! शास्त्रीबुवा सांगतील ती सर्व त्यांना तयारी करून दे. दर वेळेला माझ्याकडे शंख करीत विचारायला येऊं नकोस. काय समजलास ? हं ! हात वर कर.(मुक्या हात वर करतो.) ठीक आहे. (विक्षिप्तराव जातो.)

मुक्या :–(स्वगत) इचिभन त्या सास्तरबुवानं कितीबी वटा वटा वटा बडबड केली ती चालतीया. आन् म्या मातुर योक बी सबुद बोलून कामाचा न्हाई. कोन् ह्यो तरास ! उद्यां हात योक आवा येनार. आन् ती मुकी व्हनार म्हंता व्है ? हतून ततून समद्या आवा अक्शी बडबड्या ! ती दादल्याला बडबडूनशान घाबराघुबरा केल्याबिगार कंदीबी न्हाई व्हानार. मंग मासनी बी मजा कराया गवासनार ! ती बया एकदा का लागली बोलाया मंग ह्या पठ्याला अवसान येनार. मंग ह्यो मरद कशापाई मुका व्हानार ? आपुन्बी करनार बडबड आन् काय ? हात आल्यापासुनशिनी ह्यो जीव लई गंजलिया. तिला आतां इचिभन घासूनशिनी ठिवतो तय्यार. मंग काय ? चालली चुरचुर चुरचुर चुरचुर अक्शी लवंगी मिर्चीवानी ! (जातो.)

प्रवेश ४ था.

[स्थळ–रस्ता. तिरशिंगराव व गुलाब बोलत आहेत.]

गुलाब :–पण मी जातों आतां. असं रस्त्यांत उभं राहून मला सोय नाहीं. तुह्मी तरी इथें चिटकंभटाची किती वेळ वाट पहाणार ?

तिर० :–थांबरे जरा, ते येतील आतां. ते आले कीं लागलीच तूं जा. तोंपर्यंत आह्मांला विक्षिप्तरावांच्या एथली मजा सांगशील कीं नाहीं ? तूं ह्मणे त्या ह्यातान्यावर खूप छाप दिलीस ठेवून ! तूं त्याच्या इथें होतास तरी किती वेळ ?

गुलाब :–मी तिथें सुमार घटकाभर असेन. तितक्या वेळांत त्यानं मला खोद-खोदून पांचपन्नास प्रश्न विचारले असतील ! पण मी अगदीं मुखस्तंभासारखा खालीं मान घालून बसलों होतों. एवढ्यावरच तो खुष झालासा दिसला. नंतर माझ्याबरोबर एक माणूस देऊन त्यानं मला घरीं पोंचतं केलन्. पुढें ह्मणे त्याच्यान् चिटकंभटाच्या लग्नाच्या मुहूर्ताबद्दल खूप वाटाघाटी झाल्या, आन् शेवटीं उद्यांचा मुहूर्त ठरला. आन् हं काय ? हे पहा चिटकंभट आले. आतां मला जाऊं द्या.

तिर० :–बरं, तूं जा.

(गुलाब जातो व चिटकंभट प्रवेश करतो.)

चिटकं० :–तुमच्या गुलाबानं ऐशी बहार उडवून दिलीन् कीं यंव ! त्या ह्यातान्याला वाटलं कीं तो खरोखरच मुलगी आहे. आन् तो असा कांहीं खुष होऊन गेला आहे कीं मला ह्मणतो उद्यांच द्या बार उडवून. मला पहिल्यांदा वाटलं होतं कीं, तो लेंकाचा कांहीं शंका कुशंका काढील ह्मणून, पण कांहीं नाहीं. गुलाबाला पाहून गारच होऊन गेला. मीं त्या ह्यातान्याला सगळं सांगून अगोदर तयारी करून ठेविली होती ह्मणा.

तिर० :–शाबास शास्त्रीबोवा ! तुमच्या ह्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल तुह्मांला काय द्यावं आन् काय न द्यावं असं मला होऊन गेलं आहे.

चिट० :–'काय द्यावं' हें ठीक आहे, पण 'काय न द्यावं' हें काय बुवा ? ह्मणजे आह्मीं एवढी मेहनत करून शेवटीं नुसत्या कोरड्या शाबासकीवरच का आमची बोळवण करणार तुह्मी ?

तिर० :–कमाल झाली बुवा तुमची आतां. अहो 'उतावळा नवरा आन् गुडघ्याला बाशिंग' असं काय तुह्मी करतां ? हें लग्न तर पार पडूं द्या. मग तुमची बिदागी आहेच. ती कुठं जाते आहे ? अशी घाई कां ?

चिटकं० :–घाई असं नव्हे. झटलं सुचवलेलं असावं. कां, खरं कीं नाहीं ? तुह्मीच बोला. मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, एकदां आपलं काम झालं कीं मग त्याबद्दल कुणी बक्षीस मागायला आला ह्मणजे त्याला राग येतो. ह्यांत तुमचा दोष नाहीं. भगवंतानीं गीतेंत सांगितलं आहे, "कामात्क्रोधोऽभिजायते;" आपलं काम झालं कीं माणसाला क्रोध यायचाच. बाकी, तुह्मी तशांतले नाहींत, आन् मला तुमच्याविषयीं शंकाही पण नाहीं.

तिर० :–पण मुहूर्त ठरला का अगोदर ?

चिटकं० :–हो, हो ! उद्यां गोरजमुहूर्त. मी सध्यां त्या जुळवाजुळवीच्याच खटपटींत आहें. लग्न चालवायला आणखी एक ब्राह्मण हवाना ? तो बघतों आहें. आपल्या मनाजोगा पाहिजे. आमचा केशा आहे ह्मणा, पण आणखी एक हवा. आमच्या त्या रामभटाचा वडील मुलगा पलंभट बडा हुषार आहे. एका घटकेंत सगळं भाजून काढील. शिवाय, त्याचा बसला आहे थंडीनं आवाज. काय म्हणतो तें कुणाला ऐकायला जायला नको आन् कटकट नको. त्या विक्षिप्तरावाचं आवाजाचं एक तंत्र आहेना ? त्या पलंभटाला देतों उक्के दोन

रुपये, आन् सांगतों तेवढ्यांत सगळं यथासांग झालं पाहिजे.

तिर०:–दोन रुपये !

चिटकं०:–का, दोन रुपये थोडे झाले कीं काय ? बत्तीस आणे झाले बत्तीस. तेवढ्यावर तो खुष होईल. घरीं तरी माशा मारीतच बसणार कीं नाहीं ? (पाहून) ते पहा तुमचे साळसूदराव इकडेच येत आहेत. त्यांच्याशीं बोलायचं म्हणजे आणखी विनाकारण वेळ जाईल त्यांत. तेव्हां मला जाऊं द्या आतां. फिरून उद्यां गांठ पडेलच. (चिटकं० जातो व साळसूदराव प्रवेश करतो.)

तिर०:–दे टाळी ! टाळी दे अगोदर ! तुझ्या विक्षिप्तरावांचं लग्न ठरलं ! उद्यां बार उडणार !

साळ०:–खरंच का ?

तिर०:–खरं म्हणजे ? आतां चिटकंभटानंच खुद्द मला सांगितलंन, तेव्हां त्यांत शंका नको अगदीं.

साळ०:–असो;आतांपर्यंत तर ठीक जुळलं. पुढचंच काय होतं तें पाहिलं पाहिजे.

तिर०:–पुढचं पुढें पहातां येईल. सध्यां आपलं काम इतकंच कीं, तुझ्या काकाला त्रास देऊन सळो का पळो करायचं. तुझ्या छातीवर जें एवढं लग्न करण्याचा त्यानं घाट घातला आहे, तो फिसकटावून त्याला नरम आणायचा. एकदां आपल्याला शरण आला कीं मग काम झालंच. तूर्त ह्या नवरदेवाला खूप त्रास देण्याची एक सुंदर शक्कल माझ्या सुपीक डोक्यांत आली आहे. ती जर साधली तर काय बहार पण बहार होईल.

साळ०:–आह्मांला ऐकूं दे तर खरी तुझी शक्कल.

तिर०:–धोंडोपंतानं उद्यां जी मंडळी मेजवानीला बोलावली आहेन्, ती देतों सगळी विक्षिप्तरावाच्या घरीं लावून ! जणूं काय मेजवानी तिथेंच होणार आहे. त्या सगळ्यांच्या घरीं जाऊन सांगतों, तुह्मांला विक्षिप्तरावांनीं लग्नानीमित्त आपल्या घरीं मेजवानीला बोलावलं आहे ह्मणून. धोंडोपंतांची मंडळी ती. मारे गाणं बजावणं करायची तयारी ठेवतों, आन् बोंबाबोंब करून सोडतों विक्षिप्तरावाच्या घरांत. मग नवरदेवाची जी काय तारांबळ उडेल ती कांहीं विचारूं नकोस.

साळ०:–युक्ति आहे खरी; पण धोंडोपंत कसा होईल याला कबूल ?

तिर०:–हात्याच्या ! तें काम माझ्याकडे लागलं. (पडद्याकडे पाहून) हे पहा आपण बोलत बोलत त्यांच्या घराजवळ आलों. धोंडोपंतांची स्वारी खिडकींत आहेच. चल आंत, पहातोस काय ?

[धोंडो पंतांच्या घराचा पडदा उघडतो.]

तिर०:–(धोंडोपंत पुढें येतो, त्यास) नमस्कार धोंडोपंत.

धोंडो०:–नमस्कार ! नमस्कार ! कां, कुणीकडे झुकली स्वारी ?

तिर०:–आपल्याकडेच आलों होतों. माझं थोडंसं आपल्याकडे काम आहे आणि तें आपण केलंच पाहिजे.

धोंडो०:–माझ्याकडे ? आणि तुमचं काम ? काय सांगा तर खरं.

तिर०:–तुह्मी आह्मांला ज्या मेजवानीला बोलवायला आलां होतां, ती ठरल्याप्रमाणं राजेबहाद्दरांच्या वाड्यांत न करतां दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं केली तर ? त्याला तुमची कांहीं हरकत असण्याचं कारण दिसत नाहीं.

धोंडो०:–पण अगोदर, असं करण्याचं प्रयोजन काय ? मीं तिथें सगळी तयारी करून मंडळीही तिथेंच बोलावली आहे.

तिर०:—प्रयोजन तुम्हांला मागून कळेल व तुमच्या मंडळीला मेजवानीचं ठिकाण बदललं आहे ह्मणून कळवण्याचं मी आपल्यावर घेतों. तयारी संबंधानं म्हणाल तर त्याची सगळी जबाबदारी माझ्याकडे लागली. तुह्मी बिलकुल काळजी करूं नका.

धोंडो०:—पण दुसरं कोणतं ठिकाण तुह्मीं योजलं आहे ?

तिर०:—विक्षिप्तरावांचा वाडा.

धोंडो०:—असं असेल तर माझी स्वतःची मुळींच हरकत नाहीं; पण ते विक्षिप्तराव आहेत का अगोदर कबूल ? आमची पाहुणे मंडळी, गवई, गाणंबजावणं, हा धांगडधिंगा त्यांना कसा खपणार ?

तिर०:—त्यांचं असं आहे, त्याचं ठरलं आहे उद्यां लग्न. ह्या साळसूदरावाला आणि मला तिकडे अवश्य गेलंच पाहिजे. तुह्मीं जी दुसरी मंडळी बोलावली आहे, त्यांतली बहुतेक तिकडेच येणार आहेत असं मला पक्कं समजलं आहे. मग राजेबहाद्दरांच्या हवेलींत तुमच्या मेजवानीला कोण येतो ! तुमचा बेत फिसकटूं द्यायचा नाहीं म्हणून मीं ही युक्ति शोधून काढली आहे. आपण तुमच्या मेजवानीचा सगळा बेत विक्षिप्तरावांकडेच मुळीं करूं. तुह्मी आपल्या पाहुण्यांना तिथें घेऊन या. बाकीची सर्व व्यवस्था माझ्याकडे लागली.

धोंडो०:—तें सगळं खरं; परंतु—

तिर०:—परंतु कसला घेऊन बसलांत ? ह्मणा हो न् काय. तुह्मांला त्यांत काडीचाही त्रास पडायचा नाहीं. तुम्हीं आपल्या मेजवानीकरितां जें सामानसुमान आणलं आहे, तें सगळं माझ्या स्वाधीन करा. तुम्ही व्याह्यासारखे तिथें आयत्या वेळेला या ह्मणजे झालं. ह्या युक्तीनं दोन कामं साधतात. एक तर, तुमची मेजवानी होते, गाणंबजावणं होतं, सगळं कांहीं होतं. शिवाय विक्षिप्तरावांच्या लग्नालाही गेल्यासारखं होतं. 'एक पंथ दो काज.' (एकीकडे) हे दगडोपंत कबूल होतात कीं नाहीं कुणाला ठाऊक ?

धोंडो०:— तें सगळं कबूल; पण—

तिर०:—आला पुन्हां तुमचा पण आन् परंतु ! (स्वगत) ह्याला जरा आतां जरब देऊन पाहिली पाहिजे. (उघड) हें पहा धोंडोपंत, तुम्ही जर असे पण न परंतु करायला लागलांत, तर तुमच्या मेजवानीला आह्मी कोणीही साफ येणार नाहीं समजलांत ? तुमचे ते गवय्ये, बजवय्ये, आचारी, वाढपी, चट सारे आह्मीं तिकडे बोलावले आहेत. हे माझे मित्र साळसूदराव त्या विक्षिप्तरावांचे सख्खे पुतणे. तेव्हां त्यांच्या चुलत्यांच्या लग्नांत मदत करणं माझं मी कर्तव्य समजतों. आम्ही तुमच्या मेजवानीला येत नाहीं. तुम्ही नी तुमचे पाहुणे घाला खुशाल गोंधळ ! हें पहा, तुह्मी करा स्वयंपाक आन् सांगा तुमच्या पाहुण्यांना वाढायला. मनुष्याला नीट सांगितलं ह्मणजे समजायचंच नाहीं. होय कीं नाहीं साळसूदराव ?

साळ०:—हो तर काय ?

तिर०:—(स्वगत) आपली मात्रा थोडी लागू झाल्यासारखी दिसते. (उघड) कां ? आहे कबूल ?

धोंडो०:—हें पहा, असं नका करूं. मी-मी-

तिर०:—असं मी मी नाहीं मला खपत. काय होय कीं नाहीं तें स्पष्ट बोला.

धोंडो०:—बरं बुवा ! पण खरं सांगूं कां ? मला—

तिर०:—असं रडत राऊत घोड्यावर नको. मनापासून होय ह्मणा. पण मी तुह्मी कबूल आहांत असंच धरून चालणार. चला, आतां ह्या मेजवानीच्या कामांत एक अक्षर बोलूं नका. स्वस्थ असा. मेजवानीविषयीं बिलकुल काळजी करूं नका. विक्षि-

प्तरावांच्या इथें आपली पाहुणे मंडळी घेऊन अगदीं आयत्या वेळेला या. त्यांत मात्र चुकूं नका. बोलवायच्या मंडळीची याद तेवढी माझ्यापाशीं द्या, ह्मणजे त्यांना तिथें आणण्याची मी व्यवस्था करतों. आम्ही आतां येतों तर मग.

(धोंडोपंत जातो.)

साळसूदराव, कां, जुळलं कीं नाहीं ह्मटल्याप्रमाणं ! बरं, तूं आतां आपल्या कामाला जा. मी पुढल्या व्यवस्थेला लागतों.

(साळसूदराव जातो.)

तिर०:– (हंसून) हा ! हा ! हा ! नुसता सांभापुढचा आहे झालं. बेट्याला शिंगंच काय तीं कमी आहेत. जरा डोळे वटारण्याचा अवकाश कीं लागलीच आला नरम. एकंदरींत जगामध्यें अशा बावळट लोकांचाच भरणा फार. ह्यांना दुसऱ्यांनीं कांहीं केलं तरी आपलं ठाम झालेलं मत बदलायचं नाहीं असा जोर नसायचाच. असे लोक जगांत आहेत ह्मणून तर आह्मांला दुसऱ्यांवर आपली छाप ठेवतां येते. असो; आतां, धोंडोपंतानं मेजवानीला राजेबहादरांच्या हवेलींत बोलावलेल्या सर्व मंडळीला विक्षिप्तरावांकडे यायचं असं जाऊन सांगायचं. दुसरं, धोंडोपंतानं आणलेलं सगळं सामानसुमानही तिकडेच नेऊन टाकायचं. चिटकंभटापाशीं विक्षिप्तरावांच्या वाड्याच्या मागल्या दाराच्या किल्ल्या आहेतच. तिकडूनच सगळी मंडळी आंत सोडूं ह्मणजे झालं. हो ! धोंडोपंतांचे ते गवय्ये आणि बजवय्ये हेही तिकडे बोलवायचे आहेत नाहीं का ? त्यांच्याशिवाय काय गंमत आहे ? ते तर मुख्य पाहिजेत. तिकडेच जावं तर मग अगोदर. (जातो.)

प्रवेश ५ वा.

(स्थळ–विक्षिप्तरावाच्या वाड्यांतील दिवाणखाना. **विक्षिप्तराव** येतो.)

विक्षि०:– झाला, घात झाला ! करायला जावं एक आणि होतं दुसरंच असं ह्मणतात तें अक्षरशः खरं. पहिल्यांदा चिटकंभटानीं जेव्हां तिला दाखवायला ह्मणून आणली तेव्हां ती किती गरीब, नम्र आणि लाजरी दिसत होती, आन् तीच आतां लग्न होऊन दोन घटका झाल्या नाहींत तोंच त्राटिकेसारखी फडाफड उत्तरं कींहो द्यायला लागली ! मला ही लग्नाची अवदसा कुठून आठवली कुणाला ठाऊक ! त्या साळसुद्याची फजिती ह्मणून करायला गेलों तें सगळं माझ्याच अंगावर आलं. ' केलें तूस आन् झालें मस ' अशापैकींच प्रकार झाला ह्मणायचा. मला काय ह्मणते, माझ्याशीं लग्न लावून घेतलंत तें एखाद्या गारोड्याच्या ठकाइमावशीशीं कां नाहीं लावलंत ? ह्मणजे ती बाहुली तुमच्याशीं मुळींच बोलली नसती. कोण हा उद्धटपणा ! काय हा फाजीलपणा ! मला तिनं असं बोलावं अं ! आणि अजून लग्न होऊन एक दिवस देखील झाला नाहीं हो ! मला त्या चिटकंभटानं साफ बुडवलंन झालं.

(तिरशिंगराव येतो.)

तिर०:– (मोठ्यानें ओरडून) विक्षिप्तराव कुठें आहेत विक्षिप्तराव ?

विक्षि०:–(स्वगत) अरे राम ! हा चांडाळ आला वाटतं पुन्हां. आतां काय करतो आहे कुणाला ठाऊक !

तिर०:–(त्याच्याकडे पाहून) नमस्कार. फार छान झालं बुवा ! तुमचा जोडा मोठा नामी दिसतो. मला काय आनंद झाला आहे ह्मणून सांगूं ? आपल्या ह्या नव्या कुटुंबाच्या वडिलांचा मी एक मित्र आहें.

विक्षि०:–(स्वगत) हं ! तिच्या गोतावळ्याचं लटांबर यायला सुरुवात झाली वाटतं ? आज लग्न ह्मणून दरवाजा उघडा ठेवला मात्र, कीं लागलीच हे कावळे जमले इथें. आतां हा मला कुठला इथून हालूं द्यायला.

तिर०:–माझ्या मित्राची मुलगी फारच सुस्वरूप व सद्गुणी आहे. असलं स्त्रीरत्न आपल्याला लाधलं, याबद्दल मी तुमचं मनःपूर्वक अभिनंदन करतों. मी मागं एकदां लग्न करूं नका ह्मणून तुह्मांला उपदेश करण्यासाठीं इथें आलों होतों, तुह्मांला आठवतच असेल, तोच मी तुमचं हें कृत्य ऐकून आनंद प्रदर्शित करण्याकरितां आलों आहें.

विक्षि०:–माझं कसलं कृत्य ?

तिर०:–अहो, तुमचं लग्न ! तुह्मीं लग्न करूं नये म्हणून मागं मीं तुम्हांला हजारों अडचणी सांगितल्या, पण तुम्हीं त्यांना न जुमानतां आपला निश्चय ढळूं दिला नाहीं, याबद्दल तुमची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. यावरून तुम्ही सरळमार्गी, बाणेदार व निश्चयी आहांत हें उघड होत आहे.

विक्षि०:–पण काय हो, आमच्या गुणांची ही लांबलचक याद तुम्हांला कोणीं दिली ?

तिर०:–ह्मणजे ? चिटकंभटासारख्या वाचाळ भटाला तुह्मीं एखादी गोष्ट सांगितलीत ह्मणजे लागलीच ती सगळ्या गांवभर होणार हें तुम्हांला माहीत नव्हतं वाटतं ? अहो, चिटकंभट ह्मणजे नुसता दवंडीवाला आहे. तो एक चालती बोलती घंटाच आहे म्हणाना ! बरं; झालं तें झालं. आतां काय आहे त्याचं ? आतां तुह्मी आपल्या मित्रमंडळीशीं नीट बोला व आनंदांत रहा. तुमच्याकडे गांवांतली पांचपंचवीस शिष्ट मंडळी यायची आहेत, त्यांच्याबरोबर आणखी—–

विक्षि०:–(मध्येंच) अरे बापरे ! दरवाजे बंद करा अगोदर ! ए मुक्या ! मौन्या ! बहिऱ्या ! हे सगळे खाबू गेले कुठें ? आयत्या वेळीं कामाला एक मिळायचा नाहीं ! नुसते पंक्तिपठाण ! ए मुक्या ! (चाकर येतात.) गद्ध्यांनो, माझ्या तोंडाकडे काय नुसतें पहात उभे राहिलां ? दरवाजे बंद करा अगोदर !

मुक्या:–बाईसाहेब म्हंगाल्यात दरुज जर का बंद क्येल तर आक्शी टाळकच सडकीन. मास्नी पराण व्होवा का नग ? आतां हत त्येंच्या मावशी न कावशी, भाऊन बंद लइजन यायच हायती म्हन. आन त्यासनी तुमी कशापाई बंदी करनार ? आपुन शाप सांगतो आपल्या बाच्यान बी ह्ये काम व्हयाच न्हाई. (निघून जातो.)

विक्षि०:–अरे, घराबरोबर घराचे वांसेही फिरले ! काय चमत्कार आहे पहा ! माझं अन्न खाणारे माझेच चाकर मला अशीं उत्तरं द्यायला लागले ! ही बायको नव्हे बाबा, शूर्पणखा, हेडंबा, त्राटिका ! कोण उद्धटपणा हा !

तिर०:–तिचं ह्मणणं अगदीं रास्त आहे. अहो, नवऱ्यामुलीबरोबर तिची पाठ राखायला कोणी नको का ? दोन दिवस तिच्या माहेरची मंडळी येणारच.

विक्षिः०–अहो पंडित ! तुह्मी येथून चालते व्हा पाहूं ! माझ्यामागं तुमचा आपला ससेमिरा सारखा आहेच. चिटकंभट काय लबाड माणूस !

तिर०:–नीच, हरामखोर !

विक्षि०:–ही बायको कसली ? साडेसातीच ही ! त्या भटाचं निसंतान होवो. (धोंडोपंत व त्यांच्याबरोबर बरीच मंडळी येतात.)

धोंडो०:–असं इकडून यायचं.

विक्षि०: -अरे बापरे ! ह्या समुद्राच्या लाटांवर लाटा येऊं लागल्या, पूर आला ! झालं ! आतां हे मोठमोठ्यांदा शंख करूं लागले ह्मणजे माझ्या कानाचे पडदे पार फुटून जाणार. छे ! मला धरणीकंप झाल्यासारखं वाटूं लागलं आहे.

धोंडो०:–विक्षिप्तराव,आपल्या विवाहाबद्दल मला अत्यानंद झाला आहे. मी आपली ह्या माझ्या पाहुण्या मित्रांची ओळख करून देतों. हे......

विक्षि०:–अरे राम ! काय लचांड हें. तोंड दाबून बुक्क्यांचा मार आहे.

धोंडो:०-आपल्या कुटुंबाचं आणि ह्या खासेरावांचं अगदीं जवळचं नातं आहे, असं हे तिरशिंगराव म्हणतात.

विक्षि०:–झालं ! झालं ! तिच्या नातेवाइकांची आमच्या इथें गर्दी व्हायला सुरुवात झाली. (जाऊं लागतो.)

तिर०:-(त्याचा हात धरून) अहो नवरदेव, आपण चाललां कुठें ? ही मंडळी तुमच्याकडे भेटायला आली आहेतना ? त्यांना कांहीं या, बसा, म्हणाल कीं नाहीं ?

खासेराव:–काय विक्षिप्तराव, असं चोरून लग्न करून आपल्या मित्रांना त्याची बातमी देखील लागूं द्यायची नाहीं असा आपला बेत होता वाटतं ? आपल्या कुटुंबाचे नातेवाईक असल्यामुळें आह्मी आतां आपलेही संबंधी झालों.

विक्षि०:–आऊचा काऊ आन् तो ह्मणे माझा मावसभाऊ. (विक्षिप्तराव जरा बाजूस जातो व इतर मंडळी आपसांत कुजबुजतात.)

विक्षि०:–(स्वगत) हे चोर जर असेच आपापसांत कुजबुजत राहिले तर काय बहार होईल !

तिर०:– [एकीकडे] तुम्हांस आतां विक्षिप्तरावांची खोड काय आहे ती चांगली समजली आहे. त्यांस लग्नाविग्नाच्या गोष्टी विचारून चांगला त्रास द्या. धोंडोपंत, हूं ! आपल्या पाहुण्यांस सांगा जरा गंमत करायला. मी आहेंच तुमच्या मदतीला. इथून त्याला आतां सोडायचं ह्मणून नाहीं.

१ ला पाहुणा:--अहो नवरदेव ! आपण तिकडे कुठें चाललांत आम्हांला सोडून ?

विक्षि०:--छे ! हे यमदूत कुठले मला सोडायला !

२ रा पाहुणा:--आज इथें लग्नाच्या मेजवानीची कांहींच तयारी दिसत नाहीं ती ? हं, विक्षिप्तराव, चला आटपा. आह्मांला नवऱ्यामुलीला तर बघूं द्या जरा. एकमेकांला घांस बिस घाल कीं नाहीं ? असे लाजूं नका बुवा !

तिर०:-ह्या खासेरावांना तुम्हांला विडया तोडलेल्या बघण्याची फार इच्छा आहे.

विक्षि०:- मी विड्या ओढीत नाहीं, मग तोडूं कशाला ?

खासेराव:--अहो मेहेरबान, असं थट्टेवर घालवून चालायचं नाहीं अं ! तुह्मी किती झालं तरी दरबारांत वागलेले, राजाचे आश्रित. तुमच्यासारख्यांच्या घरीं हा सारा थाट व्हावयाचा नाहीं तर व्हायचा तरी कुठें ? तुह्मी सगळे बेत चोरून ठेवून वाजंत्री, नाच वगैरे गोष्टींस फांटा देऊं पहातां हें कांहीं ठीक नाहीं.

विक्षि०:– हें पहा,–

खासे०:– हें पहा नाहीं न तें पहा नाहीं. आम्ही तीं कांहीं एक लटपट चालूं द्यायचे नाहींत. नाच पाहिजे, गाणं पाहिजे, सर्व कांहीं व्यवस्थित झालं पाहिजे.

धोंडो०:– आमचे ते घोगरेबुवा खालीं आले असतील किंवा इतक्यांत

येतील. यांचं गाणं ह्याच दिवाणखान्यांत करूं ह्मणजे झालं. विक्षिप्तरावांनीं ह्या गोष्टी-ची अगोदर तयारी केली नाहीं म्हणून आपण त्यांचं कमी पडूं देऊन कसं चालेल?

खासे॰:—हं ! हं ! असं कांहीं तरी करा बुवा.

विक्षि॰:--अहो, माझं ऐका आधीं थोडंसं. तुह्मांला ह्या घरांतली एक स्वतंत्र खोली देतों. तुमचे ते गवय्ये, बजवय्ये, गार्णी, नाच, तमाशे, काय लागेल तो धिंगाणा त्या खोलींत घाला.

१ ला पाहुणा:--अशा तऱ्हेनं पाहु-ण्यांना बोलणं ह्मणजे त्यांचा अपमान करणं आहे.

तिर॰:--विक्षिप्तराव, ही गांवांतली शिष्ट मंडळी तुमच्या इथें तुमच्या लग्नासाठीं आलेली आहे, त्यांना अशा तऱ्हेनं बोलणं हें बरोबर नव्हे. बाकी, मंडळी आपलीच आहे.

विक्षि॰:— हे आले मोठे शहाणे मला उपदेश करायला ! कायहो, हे गृहस्थ माझ्या लग्नाकरितां इथें आले आहेत ह्मणून तुह्मी मला सांग-तां, ते ह्यांना इथें बोलावलं होतं कुणीं ? अगोदर बोलावल्याशिवाय दुसऱ्याच्या घरीं अगांतुकीला जायचं आणि म्हणायचं आमचा समाचार घ्या, आम्हांला हें हवं आन् तें हवं, ही कुठली सभ्यपणाची रीत ? मी अगोदर असं विचारतों, तुम्हांलाच मुळीं इथें कुणीं बोलावलं आहे ही तोंडपाटि-लकी करायला ?

खासे॰:—कोण ही अमर्यादा ! (कांहीं मंडळी तबला, तंबोरे वगैरे वाद्यें घेऊन येतात.) ओहो ! हे पहा गवईबुवा आलेच. या बुवा, असे या. आह्मी आपलीच वाट पहात आहों. (एकीकडे) हे नवीन गृह-स्थ कोण आणखी !

गवई:—(मुसलमान गवयास) आव मियाजी. (मंडळीस उद्देशून) हे अमृतस-रचे प्रसिद्ध गवई आहेत. यांचं नांव लड्डूखां. साऱ्या हिंदुस्थानांत यांच्या तोडीचा गवई मिळायचा नाहीं. आज सकाळीं हे इथें आल्याची मला बातमी लागली, तेव्हां ह्मटलं आजच्या जलशाला त्यांना ब-रोबर आणावं. दोन चिजा म्हणा म्हटलं तर मंडळीकरितां म्हणतील.

धोंडो॰:— बुवासाहेब, आपण आतां सुरुवात करतील. मागून मियाजींस विनंति करूं. (तंबोरे व पखवाज लावूं लागतात.)

विक्षि॰:— ही म्हणजे अगदीं पक्की अगांतु-कीं झाली म्हणायची. ह्यांनीं इथें ओरडाय-लान् बेंडबाजा वाजवायला सुरुवात केली. आतां आपली धडगत दिसत नाहीं. माझ्या कानाचे पडदे फाटून जाऊन त्यांच्या चिं-धाड्या उडणार. हे लड्डूखां न बड्डूखां गायलेले ऐकण्यापेक्षां पांचपन्नास गाढवं मोठ्यानं ओ-रडलेलीं ऐकणं काय वाईट? (जाऊं लागतो.)

तिर॰:—चाललां कुठें आपण ? दिवा-णखान्याच्या दारांना बाहेरून सगळीकडे कड्या आहेत.

विक्षि॰:—अरे बापरे ! (बोंब ठोकतो.) मेलों मेलों ! मला यांतून कुणी सोडवारे ! ह्यांचा हा कांहीं तरी कट दिसतो आहे. (गाणें सुरू होतें.)

खासे॰:—क्या बात है ! आवाज पण आवाज आहे बुवा !

१ ला पाहुणा:—खाशी !

विक्षि॰:— (कानास धोतर गुंडाळतो व दारास धक्के मारतो.) कान फुटले ! ओय ओय ! अरे मुक्या, दार उघड अगोदर ! कुणालाच कशी माझी कींव येत नाहीं ! अहो गवईबुवा !......

तिर॰:—ऐका, ऐका, खामोष !

खासे॰:—अच्छा ! हां !

२ रा पाहुणाः—चालूंद्या ! चालूंद्या! अहो विक्षिप्तराव, जरा गडबड कमी करा मेहेरबानी करून. आह्मांला गाणं तर ऐकूं द्याल कीं नाहीं? तुम्हांला नको असलं तर नका ऐकूं वाटलं तर. (विक्षिप्तराव कोंपऱ्यांत जाऊन दोन्ही हातांनीं कान दाबून धरून बसतो.)

घोगरेबुवाः- मी आणखी एक चीज ह्मणतों आन् मग मिय्याजींना सांगूं म्हणायला. (गातो.)

ठुंबरी.

राग खमाज—[ताल पंजाबी].

गुयासीमोरी बतियोंरे कहो कोयेजान ।
ज्यावोरे ज्यावोरे सुनायोरे ।। ध्रु० ॥
बंदि ऐसी गार्यिनाची मनहरालिनो ।
नहि नहि मनसब पायोरे ॥ १ ॥
रहे पाक दामनगरनाच गाके ।
नाहि नहि फबन दिखायोरे ॥ २ ॥

धोंडो०ः—बहार दिली उडवून बुवा ! मिय्याजी, एक दो चीज होना चाहीये.

लड्डूखांः—आच्छा. (गाऊं लागतो.)

विक्षि०ः— ह्या एका रेड्याचं ओरडणं पुरे झालं नाहीं ह्यांना असं दिसतं. हा बैल आतां डुरकण्या फोडणार.

राग भूप—(ताल त्रिवट).

तुदियान संगबन बोल पिहारुवा ।
बोल पिहारुवा बोलरे ॥ ध्रु० ॥
मोमंद साई सदा रंगेली तूतपिहारुवा
बोलरे ॥ १ ॥

तिर०ः—ओहो ! ओहो ! ह्यांनीं तर तानांचं अगदीं छप्पर केलं !

विक्षि०ः— काय लेकाचे गाण्याची तारीफ करताहेत पहा ! हा गातो आहे कसला ? तरटच फाडतो आहे झालं !

धोंडो०ः—खासेराव, ही दुगण बरं का.

विक्षि०ः—त्या बैलाला ह्मणावं दुगण करण्यापेक्षां दुगाण्या झाड थोड्याशा. ह्मणजे माझ्या कानांची कर्मकटकट तरी चुकेल एकदांची.

तिर०ः—मंडळींनीं आतां पाय धुवायला उठायचं. पानं वाढून तयार आहेत. विक्षिप्तराव, पाहिलंत का आपल्या पुतण्यानं किती उत्तम व्यवस्था ठेवली आहे ती ? तुह्मीं केली नाहींत ह्मणून मेजवानी केल्याशिवाय तुमच्या साळसूदरावाला रहावेल का ?

विक्षि०ः—झाला, नाश झाला ! सगळ्या घरादाराचं वाटोळं झालं ! कानांचा चक्काचूर उडाला. छे ! छे ! मी जर आतां इथें उभा राहिलों तर जिवाची आशा सोडलीच पाहिजे. (धांवत निघून जातो.)

तिर०ः- (मंडळीस) आपण चला तिकडे दिवाणखान्यांत जेवायला. मी जरा यजमान रागावले आहेत त्यांना शांत करून येतों.

(सर्व जातात.)

अंक दुसरा समाप्त.

अंक ३ रा.

प्रवेश पहिला.

(**तिरशिंगराव** व **गुलाब** प्रवेश करतात.)

तिर०ः—का गुलाब ? कसं काय ठीक चाललं आहेना ?

गुलाबः—आहे तें सारं ठीकच आहे, पण तुह्मी मला ह्या यमपुरींतून सोडवणार तरी कधीं ? मला तर ह्या घराचान् त्या विक्षिप्तरावाचा कसा अगदीं वीट येऊन गेला आहे !

तिर०ः—अरे, एका दिवसांतच का एवढा कंटाळलास ?

गुलाब:–तें ठीक आहे ! ह्मणतातना, परदुःख शीतळ असतं. माझं हें तोंड कातड्याचंच आहे म्हणून टिकलं आहे. तुह्मीं मला पूर्वीं सांगितल्याबरहुकूम काल संध्याकाळपासून ह्या घटकेपर्यंत माझ्या जिभेला विश्रांति कशी ती मुळींच ठाऊक नाहीं, रात्रंदिवस माझी टकळी सारखी चालू आहे. विक्षिप्तरावाला मीं कसं सळो का पळो करून सोडलं आहे. तो बिचारा माझ्या वाऱ्याला दिखील उभा रहात नाहीं. साऱ्या दिवस तिसऱ्या मजल्याच्या कोंपऱ्यांतल्या खोलींत बसून आहे. जेवणखाण, निजणं, बसणं, उठणं सगळं तिथें. आतांपर्यंत तुमचं काम मीं कसं चोख केलं आहे. आतां मला कसंही करून इथून एकदांचा सोडवा बुवा !

तिर०:–असा अगदीं गयावया काय करतोस? तुझ्या सुटण्याचीच तजवीज चालली आहे. एकदोन दिवस दम खा. एकदोन दिवसांत आमचं कारस्थान फत्ते झालं कीं मग तुला इथें राहून काय करायचं आहे ? साळसूदरावाकडून तुला एक फक्कडसं घर देववतों, आन् तुझ्या पोटापाण्याची उत्तम व्यवस्था करवतों. मग तुझ्या जन्माची ददात चुकेल.

गुलाब:– हें मनोराज्य सगळं ठीक आहे; पण तुह्मी ह्मणतां तसं सगळं जुळून येईल तेव्हां.

तिर०:– सर्व जुळतं आहे. जरा दमादमानं घे.

गुलाब:–तो ह्मातारा तिकडे आल्यासारखा वाटतो. मी जातों तर आतां. (जातो).

तिर०:– (स्वगत) हं ! इथपर्यंत तर ठीक जमलं. आतां पुढें काय ? तो विक्षिप्तराव साळसूदरावाशीं चांगला नरम आल्यासारखा दिसतो आहे. एका दिवसांत त्याच्या वर्तनांत केवढा फरक पडला आहे ! आपल्या पुतण्यासंबंधानं आजपर्यंत त्याच्या मनांत जो संशय होता, तो आतां पार उडून जाऊन तो उलट त्यालाच सल्लामसलत विचारायला लागला आहे. करतो काय ? नाक दाबल्यावांचून तोंड उघडत नाहीं ह्मणतात तें असं. सगळं जगच जिथें उलटलं, तिथें पुतण्याशिवाय त्याला राहिलं आहे कोण ? बिचाऱ्याचं लग्न होऊन एक दिवस झाला नाहीं तोंच काडी मोडून द्यायला दिखील तयार झाला आहे; पण एवढं सगळं होऊन त्यांत आह्मांला काय फायदा ? आज सकाळीं ह्मणे विक्षिप्तरावानं काडी मोडण्यासंबंधानं सल्ला घेण्यासाठीं कोणाशा वकिलाला बोलावलं होतं. त्याचं काय झालं कुणाला ठाऊक ? हा पहा, साळसूदराव इकडेच येतो आहे. त्याला ठाऊक असेल ह्यांतलं कांहीं तरी. [साळसूदराव येतो.] कायरे साळसूदराव, तुझे काका ह्मणे सकाळीं इथें वकिलाशीं कायसं खलबत करीत बराच वेळ बसले होते. त्या वकिलानं काय सल्ला दिली तुला कळली का ? आतां गुलाब इकडे आला होता त्याला विचारायचं विसरलों.

साळ०:–वकील सल्ला देणार आन् आमचे काका ती ऐकणार ! मग झालंच कीं.

तिर०:–तें कां ?

साळ०:–वकिलांना अगोदरच बोलायला नको. त्यांतून गांठ पडली आमच्या काकासाहेबांशीं. मग काय ! त्या वकिलाचीं तीं कायद्याचीं कलमं, आन् आधार न् जी बडबड सुरू झाली, ती ऐकून त्यांचं डोकंच फिरलं. ते म्हणाले, वकीलसाहेब, तुमच्या इथवर येण्याच्या मेहनतीबद्दल व तुम्हीं आतांपर्यंत दिलेल्या सल्ल्याबद्दल हे पन्नास रुपये घ्या आन् मेहेरबानी करून इथून चला कसे.

तिर०:– मग वकील काय म्हणाले ?

साळ०:–ह्मणतात काय ? त्यांनीं मु-

काटयानं रुपये खिशांत टाकले न् वरचा रस्ता धरला. फुकटाफुकटी पन्नास रुपये मिळाले, त्यांत त्यांचं काय वाईट झालं ?

तिर०:–बरं, आतां पुढें तूं काय करायचं योजलं आहेस ?

साळ०:–आमचे काका आतां अगदीं माझ्या मुठींत आले आहेत. माझ्या सल्ल्यावांचून एक पाऊलही टाकीत नाहींत. मीं ही अशी बतावणी केली कीं, कांहीं बिचारूं नको. त्यांना म्हटलं, अहो, ही लग्नाची गोष्ट जर मला तुम्हीं जरा अगोदर कळविली असतीत, तर ही भानगड इतक्या थराला आलीच नसती. चिटकंभटाला तर मीं शिव्यांची लाखोली वाहिली. त्यांना सांगितलं, आतां तुमची धडगत नाहीं. हें ऐकून म्हातारा तर अगदींच भेदरून गेला आन् गयावयां करूं लागला. कसं तरी करून मला ह्या पेंचांतून सोडीव म्हणून माझी सारखी त्यांनीं विनवणी चालविली आहे.

तिर०:– हें फार उत्तम झालं आहे. त्या बैलोबाची वेसण आतां आपल्या हातांत सांपडली आहे, तेव्हां लागेल तसा त्याला वांकवायला आपल्याला हरकत नाहीं. मला असं वाटतं कीं आतां आपण फार ताणून उपयोग नाहीं. नाहीं तर सगळंच तुटून जायचं. तूर्त त्याला जरा चुचकारून चुचकारून घेतला पाहिजे. मग आतां पुढें काय करायचं ?

साळ०:–मीं त्यांना असं सांगितलं आहे कीं, वकिलाच्या वगैरे फंदांत न पडतां दोन मितभाषी, धिम्मे व विद्वान् असे शास्त्री आपल्या इथें बोलावून त्यांना शास्त्रार्थ विचारा, आन् ते जसं सांगतील तसं करा. आमच्या काकांचा शास्त्रावर फार विश्वास आहे; तेव्हां शास्त्र्यांनीं कांहीं सांगितलं तरी त्यांना तें पटेल.

तिर०:–पण शास्त्री कोण आणणार तूं ? चिटकंभट तर आतां उपयोगी नाहीं.

साळ०:–मी असं ह्मणतों, एवीतेवी चिटकंभटावर आमचे काका रागावलेच आहेत. त्यांनाच काशीचे एक विद्वान् शास्त्री बनवावं. तो भट जर नाहीं होय करायला लागला तर त्याला द्यावी धमकी कीं तूं विक्षिप्तरावाला फसवलं आहेस, तुझ्यावर आतां फिर्याद करतों. नाहीं तर हो मुकाटयानं कबूल ! त्याला शास्त्रांतले आधार ह्मणजे कांहींच नाहीं. त्याला एक भली मोठी बोकडासारखी पांढरी दाढी द्यावी लावून आन् सजवावा काशीकर शास्त्री. मी सांगतों तो त्या सोंगाची अशी बतावणी करील कीं यंव ! ही एका शास्त्र्याची व्यवस्था लागली. पण दुसरा कुठला पैदा करावा ?

तिर०:–दोन करायचे आहेत काय ? असेना एकच ?

साळ०:–आंहां ! दोन पाहिजेत. त्याशिवाय वाद कसा होणार ? तें तर मुख्य झालंच पाहिजे.

तिर०:–तुला मी सांगूं का एक योग्य माणूस ? त्याची जरा मूठ दाबली कीं आपलं काम चोख करील !

साळ०:–कोण सांग पाहूं ?

तिर०:–आपल्या कोंपऱ्यावरल्या व्यंकोबाच्या देवळांतला तात्या पंतोजी आहे तो ? तो बरा आहे दीर्घ चावट. त्याला बनवावा दुसरा शास्त्री. त्याला कबूल करायला लावण्याचं काम माझ्याकडे लागलं. चिटकंभटाचं मात्र तूं पहा.

साळ०:–ठीक आहे. ह्या दोघांनाही असं सांगयचं कीं, शास्त्रांतले मारे आधारांवर आधार काढून त्यांचा खूप खल करा आन् म्हाताऱ्याला सतावून सोडा, तो जस-

जसा अधिक त्रासेल तसतसा माझ्या मुठींत जास्त येणार. एकदां का पक्का तावडींत सांपडला म्हणजे काय करायचं तें मीं ठेवलं आहे ठरवून ! त्याचं घरदार, शेतवाडी, पैसाअडका चट सारं उपटतों आन् त्याला भिकारी बनवून सोडतों. असा त्याचा सूड उगवतों कीं बघतच रहा ! काय ? आहे कीं नाहीं मजा ?

तिर०:—पण हें होणार कसं ?

साळ०:—त्याला मी लख्ख सांगणार कीं तुझ्या पश्चात् तुझी सगळी मालमत्ता आणि जिवंतपणीं महिना हजार रुपये देईन असा ताबडतोब जर कागद करून देत असशील, तर तुला ह्या जाचांतून सोडवतों, नाहीं तर बैस असाच हांका मारीत ! तुला खरं सांगू का ? आपण दिलेल्या त्रासानं तो इतका पिसाळून गेला आहे, कीं मला वाटतं त्याला वेड देखील लागेल. एवढंच नाहीं; तर तो एखाद वेळ जीव देखील द्यायचा ! यावरून मला वाटतं तो कागद काय तेव्हांच करून देईल.

तिर०:—शाबास ! मी इतके दिवस स्वतःलाच हुषार व धोरणी समजत होतों; पण तूं तर माझ्यावरही ताण केलीस बुवा ! बरं मी जाऊं आतां त्या तात्या पंतोजीकडे ? त्याला थोडं पैशाचं आमिष लावून पढवून ठेवतों. तूं चिटकंभटाकडे जा.

साळ०:—मला वाटतं, त्या दोघांनाही एकदां आपल्या घरीं बोलावून कसं कसं बोलायचं हें अगोदर ठरवून ठेवलं तर नाहींका बरं पडणार ?

तिर०:—हो, हो. मला वाटतं असंच करावं. मी तात्या पंतोजीला जाऊन लागलीच घेऊन येतों. तूंही चिटकंभटाला पुढें घालून आण. तो आहे बारा पिंपळावरचा मुंजा. येतों येतों म्हणतां म्हणतां मधें दहा ठिकाणीं जाऊन यायचा. आन् आपल्या कामाला तर दिरंगाई बिलकुल कामाची नाहीं.

साळ०:— ठीक आहे. (जातात.)

प्रवेश दुसरा.

(स्थळः—गांवठी शाळा. मुलें तरटावर बसलीं आहेत, असा पडदा उघडतो.)

नाऱ्या:—आजचा भूगोल बुवा फार अवघड आहे. घोक घोक घोकला पण लक्षांतच रहात नाहीं. (घोकतो.). पुणें जिल्ह्याचा आकार नांगरखुंटासारखा आहे, पुणें जिल्ह्याचा आकार नांगरखुंटासारखा आहे; सारखा आहे, सारखा आहे, आहे, आहे, आहे, अ ! शंभूमहादेवाचा डोंगर—आमच्या मास्तरांच्या डोक्यावर आहे असं लिहिलं असतं, तरी चाललं असतं; कारण त्यांचा रुमाल तसाच असून ते हुषारींत खुद्द शंभूमहादेवच आहेत.

लखू:—कायरे, मास्तरांना काय ह्मणतोस ?

नारा०:—मी कशाला ह्मणूं ? आमच्या वाड्यांतला विन्याच नक्कल करीत होता त्यांची. त्यानं मला सांगितलंन.

लखू:—आन हें व्याकर्ण काय कमी अवघड आहे ? (घोकतो.) सविस्तर विचार माझ्या मोठ्या व्याकर्णांत पहा, सविस्तर विचार माझ्या मोठ्या व्याकर्णांत पहा; पहा, पहा आ !

नारा०:—आज गणितं दिलीं होतीं कारे करायला ?

लखू:—तें अ ब क चं उदाहरण नाहींका दिलं ?

नारा०:—हो, खरंच. हें अ ब क चं काम कधीं संपायचं नाहीं बिचाऱ्यांचं ! त्यांचं काम आन् आमच्यामागें विनाकारण त्रास ! त्यांतला अ आजारी पडतो

तसे सगळेच का एकदम पडत नाहींत आजारी ? म्हणजे आम्हांला त्यांच्या कामाचा आन् दिवसांचा रिकामा हिशेब करायला तरी नको !

लखू:—अरे ए, मास्तर आले, गप्प ! (पंतोजी येतात व सर्व मुलें गप्प बसतात.)

पंतो०:—कायरे विशा, फी आणलीस का ? आज कितवी तारीख ?

विशा:—तें नाहीं मला माहीत. आई म्हणाली आवस झाली म्हणजे फी देऊं.

पंतो०:—बरं, मीं तुम्हां सर्वांना एक घोड्यावर निबंध लिहून आणायला सांगितला होता तो आणलांत का ?

सर्व:—आम्हीं नाहीं आणला.

पंतो०:—कायरे विशा, तूं कां नाहीं आणलास लिहून ?

विशा:—आमच्या इथें मुळीं घोडाच नाहीं, मग त्याच्यावर कसा लिहूं निबंध ?

पंतो०:—हा मूर्खा ! घरीं घोडा नसला तर नसला. तूं घोडा कधीं पाहिला नाहींस वाटतं ? गाढव कुठला ! त्याचं वर्णन, रंग, रूप, राहण्याचं ठिकाण, उत्पत्तिस्थान, भक्ष्य वगैरे वगैरे लिहून आणायचं. ह्याला घरीं घोडा काय करायचा ?

पंतो०:—तूंरे कां नाहीं आणलास निबंध लिहून नारायण ?

नारा०:—असला मूर्खपणाचा निबंध लिहून आणायला सांगितल्याबद्दल माझे बाबा तुमच्यावर फार रागावले आहेत. ह्या असल्या निबंधाच्यापायीं माझे हातपाय मात्र काल चांगलेच मोडले असते !

पंतो०:—म्हणजे ?

नारा०:—म्हणजे तुम्हीं घोड्यावर निबंध लिहायला सांगितला म्हणून दौत, टांक, कागद, पुष्टिपत्र वगैरे सगळं सामान घेऊन मी आमच्या खंड्या घोड्यावर कसा तरी बसलों. एक ओळ लिहितों आहे नाहीं तोंच खंडोजीरावांना काय लहर आली कुणाला ठाऊक ? त्यांनीं जोरानं आपली मान हालवली. मान हालवल्याबरोबर आमची स्वारी ताड्कन खालीं आली ! थोडक्यांत बचावलं, नाहीं तर जिवावरच बेतली होती !

पंतो०:—नारायण, तूं म्हणजे शुद्ध गाढवच दिसतोस मला. घोड्यावर निबंध लिहून आणा म्हणून सांगितलं म्हणजे घोड्यावर चढून का कुठें निबंध लिहायचा असतो ? शतमूर्ख कुठला ! अशा बेअकली मुलांपुढें मास्तरानं हंसावं का रडावं, कुणाला माहीत ?

लखू:—तात्या, मला एक गणित अडलं आहे; विचारूं का ?

पंतो०:—विचार पाहूं.

लखू:—एक काम **अ** १० दिवसांत करतो, **ब** तेंच काम १५ दिवसांत करतो. दोघांनीं मिळून तें काम ८ दिवस केलं. पुढें **अ** आजारी पडला तर त्याला औषध काय द्यावं ?

पंतो०:—(संतापून) थांब, तुलाच औषध देतों अगोदर चांगलं. विशा, ती खुंटीवरची छडी आण पाहूं इकडे ! (खिडकींतून तंबाखूची पिचकारी मारून) तुला चांगलं चवदावं रत्न दाखवलं पाहिजे. त्याशिवाय वठणीवर नाहीं यायचास ! चल कर हात पुढें. नाहीं तर त्या घोडीवर उलटा टांगतों तुला गुलामा.

लखू:—(रडल्यासारखें करून) पुन्हां नाहीं असं करायचा तात्या. तात्या नाहीं करायचा पुन्हां. आं ! आं ! काल मला एकानं हें गणित विचारलं होतं व तें मला सुटेना म्हणून तुम्हांला विचारलं, ह्यांत मीं काय अपराध केला ? अं ! अं ! अं !

पंतो०:—काय कांगावखोर आहे गुलाम! मारायच्या अगोदरच रडतो आहे. तें कांहीं

नाहीं.दहा छड्या दिल्याशिवाय तुला नाहीं सोडायचा. तुला चांगलं समजलं पाहिजे, मास्तरांच्या खोड्या केल्या ह्मणजे काय होतं तें ! चल, कर हात पुढें !

लखू:—पण उद्यां माझ्या आईनं तुह्मांला जेवायला—

पंतो०:—(मध्येंच) बरं, बरं,जा आपल्या जाग्यावर जाऊन बैस पाहूं. आईचं काय सांगत होतासरे ?

लखू:—उद्यां माझ्या आईनं तुह्मांला जेवायला बोलावण्याचा बेत केला होतान् पण मागून ह्मणाली कीं पुढें पाहूं एकदां केव्हां तरी. ह्मणून बेत रहित झाला.

पंतो०:—(स्वगत) काय लुच्चा आहे बेटा ! शिक्षा काय खुबीनं वांचविलीन् ?

लखू:— मास्तर, काल दिलेली कविता पाठ ह्मणून घ्यायची आहे.

विशा:— (एकीकडे) आयते मास्तर विसरले होते, तुला कुणीरे मध्यें चोंबडेपणा करायला सांगितला होता लख्या ? तरी बरं, मधाशीं चांगली कंबक्तीची वेळ आली होती ह्मणून.

पंतो०:— कायरे विशा, तिथें बोलतो आहेस काय ? कविता पाठ केली नाहींस आन् दुसरं काय ? ह्मण पाहूं; तूंच अगोदर ह्मण.

विशा:— अजून पाठ नाहीं झाली.

पंतो०:— जशी येईल तशीच ह्मण.

विशा:— येत नाहीं मला पाठ ह्मणायला.

पंतो०:— कां नाहीं पाठ केलीस ?

विशा:— माझा थोरला भाऊ ह्मणाला पाठ नको करूं ह्मणून.

पंतो०:— गाढवा, खोटं बोलतो आहेस. भाऊ असं कसं सांगेल ?

विशा:— खरंच सांगितलंन् कीं पाठ करूं नको ह्मणून त्यानं.

पंतो०:—अगदीं लबाड आहेस. विचारूं तुझ्या भावाला ?

विशा:—खुशाल विचारा. शाळेला यायला निघतांना मी कविता ह्मणायला लागलों, तेव्हां तो ह्मणाला ही वेळ आहे का पाठ करायची ? शाळेला उशीर होतो; नीघ अगोदर.

पंतो०:—याचा अर्थ कविता मुळींच पाठ करूं नको असा करायचा वाटतं ? चोर कुठला ! नारायण, तूं ह्मणरे.

नारा०:—माझा बाप ह्मणाला, अर्थ समजल्याशिवाय कविता पाठ करायच्या नाहींत.

पंतो०:—मग, अर्थ न समजायला ती कविता अवघड आहे वाटतं ?

नारा०:—पण बाबा ह्मणाले तुझा अर्थ चुकला.

पंतो०:—तूं काय अर्थ केलास?

नारा०:—'जनामधिं बरें ह्मणुनि घेई॥ बरें ह्मणुनि घेई, जनामधिं बरें ह्मणुनि घेई॥ ह्याप्रमाणें आमच्या शेजारच्या विष्णूची छान जरीची टोपी बरी ह्मणून मीं सर्व लोकांच्या देखत घेतली, तर त्याच्या भावानं मला मारलं. मी बाबांच्याकडे रडत गेलों; ते दिखील ह्मणाले माझा अर्थ चुकला ह्मणून. त्यांनीं मला सांगितलं अर्थ समजल्यावांचून कविता पाठ करूं नको ह्मणून.

पंतो०:—मूर्खा,'जनामधिं बरें ह्मणुन घेई' याचा अर्थ लोकांच्या जिनसा चांगल्या ह्मणून त्या घ्याव्या असा का करायचा ? लोकांनीं आपल्याला बरं ह्मणावं असं वर्तन कर; असं जगांत वाग, असा नाहीं का त्याचा

सरळ अर्थ ? तो सोडून तूं जर अर्थाचा अनर्थ करूं लागलास, तर तिथें मास्तरांनीं का आपलं डोकं फोडावं कीं काय ? मला नव्हतं ठाऊक कीं तूं असा विचित्र अर्थ करण्याइतका विद्वान असशील ह्मणून !

(तिरशिंगराव येतो.)

तिरः०—नमस्कार, मास्तरसाहेब !

पंतो०ः—(चंची गुंडाळून ठेवून) नमस्कार ! काय काम आहे ?

तिर०ः—तुमच्याकडेच काम आहे थोडं. खाजगी काम आहे माझं; पण अत्यंत जरूरीचं आहे.

पंतो०ः—मी मुलांना शिकवितों आहें, हें तुह्मी पहातच आहां. मी लोकांचे पैसे घेतों त्याबद्दल त्यांस योग्य मोबदला मला दिलाच पाहिजे व हें माझें कर्तव्यच आहे. 'स्वाध्यायप्रवचनाभ्यां मा प्रमदः' असं श्रुतिवचन आहे. खाजगी कामासाठीं शिक्षणाचा पवित्र वेळ घेणं मला रास्त वाटत नाहीं. माझ्या घरीं या ह्मणजे काय असेल त्याचा विचार करूं.

तिर०ः—तुमच्या फायद्याची गोष्ट आहे. (जवळ जाऊन कानांत कुजबुजतो).

पंतो०ः—असं बोला. आतां ठीक आहे. शिक्षणाचं काम पवित्र आहे, तथापि अडचणींत पडलेल्या माणसास मदत करण्याचं काम त्याहीपेक्षां अधिक पवित्र आहे. ह्मटलंच आहे 'परोपकाराय सतां विभूतयः' माझ्या फायद्यासाठीं म्हणून मीं हें काम सोडलं नसतं, तुह्मी ह्मणतां तुमचं अगदीं जरूरीचं काम आहे म्हणूनच केवळ मी क्षणैक स्वकर्तव्यपराङ्मुख होत आहें.

तिर०ः—आपली परहिततत्परता प्रसिद्धच आहे. चला तर मग.

पंतो०ः—मुलांनो, तुह्मी आज आपले अभ्यास घरून नीट करून आलां नाहीं ह्मणून तुह्मांला अभ्यासासाठींच केवळ सुटी देतों, समजलांत ना ? मला काम आहे म्हणून नाहीं. तर तुम्हांला आपले धडे नीट करायला वेळ मिळावा म्हणून. उद्यां तो घोड्यावर निबंध लिहून आणाच; पण आणखी एक गाढवावरही लिहून आणा, समजलांतना ? काय, विशा, नाऱ्या, उद्यां निबंध लिहून आणायला विसरायचं नाहीं बरं का ? विसरलांत तर आजच्याप्रमाणें क्षमा नाहीं व्हायची. लख्या, आज सुट्टी कशाकरितां दिली म्हणून घरीं सांगशील ?

लख्याः—मी सांगीन कीं मास्तरांच्याकडे कोणसा एक बुवा आला होता, आन् त्यांच्या फायद्याचं कायसं काम होतं ह्मणून ते घरीं गेले.

पंतो०ः—हा गाढवा !

(मुलें पळून जातात.)

तिर०ः—चला, आतां उशीर नका लावूं.

(दोघे जातात).

प्रवेश तिसरा.

(विक्षिप्तराव व साळसूदराव बोलत येतात.)

विक्षि०ः—मी जेव्हां त्याला ह्या गोष्टीबद्दल रुकार दिला तेव्हां माझ्या तोंडांत मारायला कुणी नव्हतं.

साळ०ः—कसला रुकार आणि कोणाला?

विक्षि०ः—त्या पाजी, हरामखोर भटाला.

साळ०ः—हें पहा, आतां होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल पश्चात्ताप करून काय उपयोग ? माझ्यावर जर तुमचा थोडा तरी विश्वास असता आणि मला ह्या लग्नाविषयीं एवढीशी जरी बातमी तुह्मीं लागूं दिली असती तर किती चांगलं झालं असतं ! चिटकंभटासारख्या लबाड व थापाड्या माणसाच्या नादानं तुह्मी वागलांत हें कांहीं नीट झालं नाहीं. पण आतां काय त्याचं ?

विक्षि०:—चूक होऊं नये झाली. पण झालेल्या चुकीबद्दल मी वाटेल तें प्रायश्चित्त घेण्यास तयार आहें. कितीही नुकसान झालं तरी बेहेत्तर; पण ह्या पेंचांतून कसं तरी मोकळं झालंच पाहिजे. मला जर कुणी ह्या बायकोच्या साडेसातींतून सोडवील, तर त्याला मी तो मागेल तें बक्षिस देईन. आतां कुठें तरी रानावनांत जाऊन तपश्चर्या करावी, किंवा बैरागी बनून काशीरामेश्वर करीत हिंडावं, किंवा संन्यास घ्यावा असं मला झालं आहे. त्या सटवीनं आपल्या बडबडीनं मला असं सतावून सोडलं आहे, कीं एकदां वाटतं विहिरींत उडी टाकून जीव द्यावा.

साळ०:—इं! हं! हं! काकासाहेब, हें काय बोलतां तुह्मी? लग्न होऊन एक दिवस झाला नाहीं तों आपल्या जिवावर इतके उदार झालां? जरा धीर धरा.

विक्षि०:—एक दिवस काय, आन् दोन दिवस काय, मला ठाऊक आहे हें रोज असंच चालायचं. पुढं काय होणार आहे तें मला कसं स्पष्ट दिसतं आहे. गडबड, बडबड आणि माझ्या उराशीं धडधड हा आह्मांला लग्नांत हुंडाच मिळाला आहे!

तिर०:—(एकदम प्रवेश करून) हें मीं तुह्मांला केव्हांच सांगितलं होतं; पण तुम्हांला कुठलं तें पटायला? सोनारानं कान टोंचले ह्मणजे तें बरं असतं.

विक्षि०:—तिरशिंगराव, आतां मागच्या गोष्टी उकरून काढून आणखी दुःखावर डागण्या नका देऊं. मीं तुमचं त्या वेळीं न ऐकतां आपलाच हेका चालविला हा अगदीं मूर्खपणा केला. पण त्याबद्दल आतां नुसतं दुःख करून काय उपयोग?

धोंडो०:—(एकदम प्रवेश करून) विक्षिप्तराव, तुमचा चेहरा आज कांहीं ठीक दिसत नाहीं. तुह्मी अगदीं एखाद्या खंगलेल्या आजाऱ्यासारखे दिसतां. तुह्मांला कांहीं होत बीत तर नाहीं ना?

विक्षि०:—अरे राम! हा कोण उद्धटपणा! अहो, हे दोघे होते इथें. ह्यांच्यावर काम नसतं का भागलं? तुम्ही आणखी कशाला मधें लुडबुडायला आलांत?

धोंडो०:—तसं नाहीं हो. मी तुमचा मित्र आहें म्हणून मला तुमच्याविषयीं फार काळजी वाटते आहे. दुसरं कांहीं नाहीं. गांवांत मीं ऐकलं कीं, तुमचं डोकं फिरलं आहे. येवढ्यासाठीं मी वैद्याला बोलावणं पाठवून तडक इकडे निघून आलों.

विक्षि०:—काय चमत्कार आहे! जो येतो तो आपला माझा मित्रच! एकूण जगांत मला कुणी शत्रु म्हणून उरलाच नाहीं. (धोंडोपंतास) अहो मित्र, तुम्ही आलांत ते आलांत, आणखी त्या वैद्याला कशाला बोलावणं पाठवलंत आणखी?

धोंडो०:—तुम्हांला खरंच सांगतों, तुमचा चेहरा कसा कावरा बावरा दिसतो. लोक म्हणतात त्यांत कांहीं तरी तथ्य असावं.

विक्षि०:—काय? मला, अन् वेड? तिरशिंगराव, तुम्हांला कांहीं दिसतात काहो वेडाचीं चिन्हं माझ्या तोंडावर?

तिर०:—हो अगदीं स्पष्ट दिसतात. हीं पहा तुमच्या डोळ्यांचीं बुबुळं कशीं इकडे तिकडे हालताहेत तीं! तुमच्या कपाळावर तर आठ्यांचं जाळंच बनलं आहे.

धोंडो०:—छे बुवा. ह्यांच्याकडे पाहिलं कीं मला फार कींव येते.

विक्षि०:—ह्यांनीं बोलून बोलून मला तर खरोखर वेडा बनवायचा प्रसंग आणला आहे.

तिर०:—धोंडोपंत, तुमचे वैद्यबुवा येणार तरी केव्हां? वेळेला उपाय झाला तर ठीक; नाहीं तर दुखणं भलत्याच थराला जायचं! ह्मणून ह्मणतों.

विक्षि०:—ह्मणजे मला विष बिष घाला-

यचा बेत केला आहेत वाटतं? मी मेलों ह्मणजे गुलामांनो तुमचं चांगलंच पिकलं! माझ्या पैशावर वाटेल तशी चैन करा! पण मी तुह्मांला साफ सांगतों मला मुळींच वेड लागलेले नाहीं किंवा दुसरा कोणचाही विकार झालेला नाहीं. माझी प्रकृति अगदीं उत्तम आहे. (वैद्यबोवा येतात.)

तिर०:—वैद्यबोवा, विक्षिप्तरावांच्या चेहऱ्यावरून तुह्मांला त्यांना कांहीं तरी विलक्षण रोग झाला आहे असं नाहीं का वाटत? सांगा पाहूं हा काय रोग आहे तो.

विक्षि०:—तुम्हीं मांडलं आहे तरी काय?

वैद्य०:—वाग्भटांत ह्या रोगाला राजयक्ष्मा असं म्हटलं आहे. शुश्रुतांत त्याच रोगाला ज्वरांतर्गत परिणामशूल असं नांव आहे. चरककार ह्यालाच अंतर्गळ अशी संज्ञा देतात.

धोंडो०:—पण असा रोग उद्भवण्याला कारणं काय?

वैद्य०:—" शैत्यंहियत्साप्रकृतिर्जलस्य." जलाच्या म्हणजे पाण्याच्या योगानं प्रकृतीला शैत्य झालं कीं असला रोग उद्भवतो.

तिर०:—पण हे साऱ्या दिवस लग्न झाल्याबद्दल शोक करीत असतात व स्वतःला विनाकारण ताप करून घेतात, हें सगळं ह्या रोगानंच होतं, असं तुमचं म्हणणं कीं काय?

वैद्य०:—मी कशाला उगीच ह्मणूं? वैद्यशास्त्रानेंच त्याचा निकाल केला आहे. ' रोगशोकपरीतापमंधनव्यसनानिच! ' ह्या रोगानं शोक व्हायचा, ताप व्हायचा; आणखी सांगून ठेवतों, पुढें रोगी व्यसनांनीं अगदीं बांधला जायचा. निघंटूमधें ह्या विकाराला ' स्मृतिविभ्रम ' असं नामाभिधान आहे. ' संमोहात् स्मृतिविभ्रमः ' वैद्यकतरंगिणींत—

विक्षि०:—बस, बस, तुमचं वैद्यकावर तर एक व्याख्यानच सुरू झालं!

धोंडो०:—हीं सगळीं रोगांचीं नांवें झालीं. पण त्यावर उपाय काय सांगितला आहे?

वैद्य०:—तें पुढचं कांहीं विचारूं नका. पण आतां विचारलंत ह्मणून सांगतों. 'यस्यज्ञान दयासिंधो रोगाधस्यानवा गुणाः' वैद्यकशास्त्रावर भास्कराचार्यांचा नलचंपू ह्मणून अत्यंत प्राचीन व प्रसिद्ध ग्रंथ आहे, त्यांतला हा श्लोक आहे. त्याचा अर्थः—सदरहु रोगाचे अनेक गुण ऊर्फ चिन्हं आहेत. ' यस्यज्ञान दयासिंधो ' ज्यांचं ज्ञान झालं कीं पहाणाऱ्याच्या मनांत दयेचा सिंधु ऊर्फ पूर उत्पन्न होतो. ह्यावर जें औषध पुढं सांगितलं आहे तें ग्रंथकार म्हणतात, ' सेव्यताम् अक्षयोधीराः ' अक्षयो म्हणजे ज्यांना क्षयरोग नसेल त्यांनीं धीराः म्हणजे धीरानं सेव्यताम् ह्मणजे सेवन करावं. हा रोग एकदां जडला ह्मणजे इतका दुःसाध्य आहे कीं, वैद्यराज पुढं सांगतात, 'सश्रिये चामृतायच' औषध घेतलं असतां 'सश्रिये' त्याला श्रेय ह्मणजे यश मिळेल किंवा 'मृतायच' रोगी मरून तरी जाईल. तिसरी गोष्ट होणं शक्यच नाहीं. आमच्या प्राचीन ऋषींच्या पुढं लटपट नाहीं. त्यांचे सिद्धांत नेहमीं ठाम असायचे!

विक्षि०:—मला येथून जाऊंद्या कसे!

तिर०:—चाललां कुठें? एवढे विद्वान् वैद्य आणवून जी आम्हीं खटपट चालविली आहे, ती का आमच्यासाठीं कीं काय? तुमच्या रोगाचं निदान करून त्याला कांहीं चांगलं औषध शोधून काढलं पाहिजेना?

विक्षि०:—माझा रोग मला माहीत आहे आन् त्याच्यावर एक रामबाण उपायही मला ठाऊक आहे. मला औषध देण्यापेक्षां

माझ्या बायकोला थोडी अफूबिफू या म्हणजे तिला झोंप लागून तिची बडबड तरी थोडी कमी होईल.

तिर०:—छे! छे! तुम्हांला तर कांहींच माहीत नाहींसं दिसतं. अहो, ती झोंपेंत ह्यापेक्षां दसपटीनं अधिक बडबडते.

विक्षि०:—अरे बापरे!

तिर०:—आन् ती इतक्या जोरानं बोरते आणखी बरळते कीं सगळं घर डोक्यावर येतं.

विक्षि०:—सच्चिदानंद! देवा, या त्रासांतून एकदांचा सोडीवरे सोडीव. कायरे साळसूदराव, कोणच्या कोणच्या कारणांनीं बायकोला काडी मोडून देतां येते?

साळ०:—आपल्याला नाहीं बुवा माहीत.

तिर०:—ही माहिती तुम्हांला शास्त्र्यांकडून मिळविली पाहिजे.

विक्षि०:—ही माहिती काढल्यावांचून आपल्याला आतां एक क्षणभरदेखील चैन नाहीं पडायचं. साळसूदराव, मेहेरबानी करून मला ह्या कामीं तूं मदत कर. चल; त्याच कामाला आपण अगोदर लागूं. (दोघे जातात.)

धोंडो०:—काय बिचाऱ्याला तुम्हीं सतावून सोडला आहेत! त्याला घटकाभर विश्रांति तरी घेऊं द्या! तो अशानं खराच वेडा होईल. द्या त्याला थोडी विश्रांति.

तिर०:—त्याला आणि विश्रांति? गोष्ट होणं नाहीं. आमचं काम फत्ते होईपर्यंत त्याच्या मागें आमचं हें शुक्लकाष्ट सारखं असायचंच. गुलाबाला सांगून ठेवलं आहे, चार पैशांची खडीसाखर आणून खा; पण तोंड सारखं चालू ठेव. शिवाय आमचा ससेमिरा सारखा आहेच. बाहेर पडण्याची तर त्याची आतां मुळींच सोय नाहीं. कसा पण रंगणावर धरला आहे! अहो, नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं. बाकी, वैद्यबोवांनीं आतां आपलं काम खूप मजेनं केलं. असे तुमच्यासारखे मित्र आम्हांला मदत करायला तयार असले म्हणजे आम्हांला काय कमी आहे?

धोंडो०:—तें असो. आपल्या मित्रांना मदत करणं हें प्रत्येकाचं कर्तव्यच आहे. त्यांत आम्हीं कांहीं विशेष केलं आहे असं नाहीं. पण तुमचं हें काम जुळलं कीं एक फक्कडशी मेजवानी उडाली पाहिजे अं!

तिर०:—(स्वगत) ह्या लेकाची मेजवानी आली! (उघड) मेजवान्यांना काय तोटा हो! एक सोडून चार द्या. बरं चला, जाऊं आतां.

धोंडो०:—नाहीं म्हटलं, म्हैसूरचे एक तम्मण्णा म्हणून प्रसिद्ध बीन वाजविणारे थोड्याच दिवसांत येथें यायचे आहेत, त्यांना बोलवूं जलशाला, आन् दुसरं काय?

तिर०:—हो, हो! त्याला काय हरकत आहे?

प्रवेश ४ था.

स्थळ:—विक्षिप्तरावाचें घर.

(चिटकंभट प्रवेश करतो.)

चिट०:—(दाढीला हात लावून) काय लांब दाढी ही! मला वाटतं माझ्या डोक्यावर हें जड पागोट्याचं चाक आहे म्हणून बरं, नाहीं तर ह्या दाढीच्या वजनानं मी अकदीं वांकून गेलों असतों. पागोट्यानं मागें सावरून धरलं आहे मला. बाकी तिरशिंगरावानं ही दाढीची न् शालजोडीची मोठी नामी युक्ति शोधून काढलीन् मला आतां चिटकंभट म्हणून कोण म्हणेल? आतां आमची स्वारी काशीचे प्रसिद्ध शास्त्री, पंडित शास्त्ररत्नाकर, विद्वन्मुकुटमणी, सरस्वतीकंठाभरण वाचस्पति बनली आहे. (तिरशिंगराव व तात्या पंतोजी येतात.)

तिर०:—शास्त्रीबोवा, मास्तरसाहेब ! आपापलीं कामं ठरल्याप्रमाणं अशीं चोख करतां कीं यंव. तुमचे पेहराव इतके उत्तम साधले आहेत कीं, मला वाटतं तुह्मीं आरशांत पाहिलंत तर तुमची तुह्मांलाच ओळख पटायची मारामार पडेल. वाद करतांना कांहीं अडलं किंवा चुकलं तर घोटाळून जाऊं नका किंवा नुसते एकमेकांकडे पहात बसूं नका. तुमचा मोठमोठ्यानं ओरडण्याचा सपाटा सारखा सुरू ठेवा. मारे आडवे तिडवे हातवारे करा. आपली शास्त्राची भाषा विसरूं नका. वाटेल तिकडे बहावत गेल। तरी हरकत नाहीं. पहिल्यांदा मात्र चेहेरे गंभीर असूं द्या. वाद चालू असतां ह्मातारा जर कांहीं गडबड करू लागला तर मी आहेंच. त्याची तुह्मांला काळजी नको. आपलीं नवीन धारण केलेलीं नांवं विसरूं नका. मीं साळसूदरावाला आपल्या काकाला इकडे घेऊन येण्यासाठीं पाठविला आहे. हं ! हे पहा ते आलेच. (विक्षिप्तराव व साळसूदराव येतात.)

विक्षि०:—हेच का ते शास्त्रीं ?

तिर०:—होय. त्यांना नमस्कार करा.

विक्षि०:—काय ? त्यांना नमस्कार करूं ? असा नमस्कार चमत्कारांत विनाकारण वेळ घालविणारा मी नाहीं समजलांत ? कोणी गृहस्थ आला कीं, ‘ या, बसा, नमस्कार, बरे आलांत ’ इत्यादि कोरडे व औपचारिक प्रकार कोणच्या शहाण्यानं सुरू केले असतील ते असोत. आपण ज्याचा मनापासून तिटकारा करतों असा मनुष्य जरी आपल्या घरीं आला तरी ‘ आपल्या येण्यानं मला फार आनंद झाला आहे, ’ असं म्हणण्याचा दांभिकपणा शिकवणारी ही चाल कुठली ? आपण तर असल्या नमस्कार चमत्कारांना अजीबाद फांटा देणार. आपण मोठ्या फिकिरीत किंवा दुःखांत असावं व रस्त्यांत एखादा ओळखीचा गृहस्थ भेटावा. त्याला पाहून हंसून दांत बाहेर काढलेच पाहिजेत. ही हस्तिदंतीची पद्धति आपल्याला अगदीं जुलुमाची व रानटी वाटते.

तिर०:—तुमचं ह्मणणं अगदीं रास्त आहे. तेव्हां आपण आपल्या कामालाच लागूं या. (विक्षिप्तरावास) हे काशीचे एक अतिविद्वान् शास्त्री आहेत. यांचं नांव पंडित शास्त्ररत्नाकर, विद्वन्मुकुटमणी, सरस्वतीकंठाभरण वाचस्पति असं आहे.

विक्षि०:—ओय ! ओय ! हे काशीचे शास्त्री दिसत आहेत खरे. ह्यांचं नांवच जर काशीपासून आडवं पसरलं तर सहज रामेश्वरापर्यंत पुरेल. बरं, हे दुसरे शास्त्री कुठले राहणारे ? ह्यांना मीं कुठं पाहिल्यासारखं वाटतं आहे.

चिट०:— मला भीति होती कीं, लेंकाचा मला ओळखतो आहे कीं काय ? पण नाहीं.

तिर०:— हे पूर्वीं एकदां आपल्या शहरीं आले होते. पांच वर्षांपूर्वीं इथें उपस्थित झालेलं प्रसिद्ध गवळीप्रकरण तुमच्या लक्षांत असेलच. एका गवळ्यानं एका ब्राह्मणाला फसवून आपल्या हातचं अन्न खावयाला घातलं. म्हणून येथील ब्रह्मवृंदानं त्या ब्राह्मणाला वाळींत टाकलं व त्या गवळ्याला जबर दंड सांगितला. तो दंड देईना. तो ह्मणालाः— दररोज जें पाणी मिसळून मी ह्या ब्राम्हणाला दूध घालीत असतों, त्याच पाण्यांत शिजविलेलं अन्न त्याला खावयाला काय हरकत आहे ? ह्यानंतर ही तक्रार दक्षिणेंतील प्रसिद्ध धर्मपीठ जें यमनकल्याण, तेथील स्वामींच्याकडे गेली. सदरहु स्वामींनीं ह्या प्रकरणाच्या दोन्ही बाजू ऐकून घेऊन निकाल देण्यासाठीं ह्या शास्त्रीबोवांस इथें

पाठविलं होतं. त्यांचं नांव सहदेवाचार्य चिटगुप्पि. यांच्या शास्त्रपारंगततेबद्दल त्यांना नुकतीच धर्मशास्त्र सहस्ररश्मि अशी पदवी मिळाली आहे.

विक्षि०:– ठीक आहे.

तिर०:– शास्त्रीबोवा, ज्या कामासंबंधानं शास्त्रार्थ विचारण्यासाठीं आपणांस इथें बोलावलं आहे, त्याची सविस्तर हकीकत मीं ह्यापूर्वींच आपणांस सांगितली आहे. तेव्हां त्यासंबंधानं पुन्हां चर्वितचर्वण करण्याची कांहीं अवश्यकता आहे असं मला वाटत नाहीं. ज्यांना तुमची सल्ला पाहिजे आहे ते हे गृहस्थ. तेव्हां आतां करा आरंभ.

२ रे शास्त्री०:–शास्त्रीबोवा, आपण काशीचे पंडित. शास्त्रांत आपली पहिल्या प्रतीची बुद्धि. तेव्हां आपण श्रीगणेशाय नमः करावा हें उत्तम.

१ ले शा०:– छे ! छे ! प्रथम प्रतीची माझी बुद्धि अशी माझी तुह्मी स्तुति करतां, तर शास्त्राप्रमाणं मीं आरंभ करतां कामा नये; कारण असं श्रुतिवाक्यच आहे. ' अनारंभो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम्. ' तेव्हां आपणच आरंभ करावा हें उत्तम.

२ रे शा०:–असं शास्त्र असलं तथापि पहिलेपणाचा मान काशीक्षेत्राकडे असल्यामुळं रूढीप्रमाणं पाहिलं तर आपणच सुरुवात करावी हें रास्त आहे. कारण ह्मटलंच आहे:– ' शास्त्राद्रूढिर्बलीयसी. '

विक्षि०:– हें पहा, निदान सुरुवातीला तरी असं भांडूं नका. तुह्मांला जो काय निकाल द्यावयाचा असेल तो थोडक्यांत व लवकर द्या. तुमचा शब्दच्छल, वितंडवाद आणि शास्त्रांचा कीस मला नको आहे. माझ्या वडिलांनीं लहानपणापासून मला असं शिकवलं आहे कीं, मनुष्यानं आपली बुद्धि व काळ नेहमीं एखाद्या महत्त्वाच्या कामांत खर्च करीत असावं. शुष्कवाद व बडबड ह्यांचा आश्रय कधींही करूं नये. थोडक्यांत सांगायचं ह्मणजे मनुष्याची वृत्ति शांत व गंभीर असावी, आणि त्याचा स्वभाव गडबडचा व बडबडचा असूं नये. म्हणूनच माझा स्वभाव असा अगदीं शांत बनून गेलेला आहे. ह्याच कारणासाठीं मी तुमच्या कथा, पुराणं, सभा, कचेऱ्या, देवळं ह्यांच्याकडे ढुंकून दिखील बघत नाहीं. ह्या गोष्टी मला समजत नाहींत किंवा मला त्यांची गोडी नाहीं, अशांतला मुळींच प्रकार नाहीं; परंतु वाचाळ कथेकरी, बाष्कळ पुराणिक, बडबडे वकील, ह्यांचा मला अत्यंत तिटकारा आलेला आहे. त्यांच्या मी वाऱ्याला दिखील उभा रहात नाहीं. तरी माझ्या कमनशिबानं व मूर्खपणानं जो आवाज व जी बडबड मला आवडत नाहीं, त्यांच्यांतच घेरलों गेलों आहें. ह्यासंबंधाची सर्व कच्ची हकीकत आपणांस आतां कळून चुकलीच आहे. ह्या त्रासांतून मुक्त होण्याचा कांहीं शास्त्रविहित उपाय तुम्हांला विचारावा म्हणून आपणांस इथें येण्याची मीं तसदी दिली आहे. काल सारादिवसन् रात्र माझे काय हाल झाले, त्याची तुम्हांस कल्पना दिखील करतां येणार नाहीं. माझं घर ह्मणजे एक शुद्ध बाजार झाला आहे. मी जणूं काय एखाद्या मंडईत, गिरणींत किंवा कारखान्यांत रहातों आहें असं मला वाटायला लागलं आहे.

तिर०:–बरं मग, शास्त्रीबोवा, तुह्मीच करा श्रीगणेशाय नमः आन् काय !

१ ले शा०:–ठीक आहे.

२ रे शा०:–हें उत्तम झालं.

१ ले शा०:—तुमचा प्रश्न काय कीं, जेहेत्ते शास्त्रानं घटस्फोट करण्यास कोणचीं कारणं सांगितलीं आहेत. तेव्हां प्रथमतः घटस्फोट शब्दाचा अर्थ व त्याची व्याप्ति हीं लक्षांत घेतलीं पाहिजेत. घट म्हणजे कुंभ. कारण—

विक्षि०:—शास्त्रीबोवा, मेहेरबानी करून शब्दांचा विनाकारण कीस काढूं नका. मुख्य मुद्यालाच आरंभ करा कसा.

१ ले शा०:—बरं आहे. आमचं काय? मानवधर्मशास्त्राप्रमाणं किंवा धर्मसिंधूप्रमाणं पाहिलं असतां घटस्फोटाला फारच थोडीं कारणं आहेत. ह्मटलंच आहे, " घटस्फोटोहि नारीणां क्रियते पुरुषकुंजरैः " ह्मणजे पुरुषांनीं स्त्रीचा घटस्फोट करावा. त्याचीं कारणं—

विक्षि०:—अहो, तुमच्या संस्कृत श्लोकाचा अर्थ माझ्या ध्यानांत आला. त्याचा आणखी मराठींत विविध ज्ञानविस्तार कशाला करतां ?

२ रे शा०:—नाहीं. इतकं स्पष्ट सांगणं जरूर आहे. नाहीं तर अर्थापत्ती होण्याचा संभव आहे, ह्मणजे अर्थ समजण्यास मारामार पडेल.

विक्षि०:—हं !

तिर०:—विक्षिप्तराव, ह्यांचा वाद चालूं द्या. त्यांना तुह्मी जरा बोलण्याची मोकळीक द्या. असं नाहीं केलं तर निकाल नीट कसा लागेल ? हं. शास्त्रीबुवा चालूं द्या तुमचीं कारणं.

१ ले शा०:—ठीक आहे. कारणं पाहिलीं तर, " अनृतं साहसं माया । " अनृतम्—

२ रे शा०:—अनृतम् ह्मणजे खोटं. अगोदर एक मुलगी दाखवून लग्नाच्या वेळीं दुसरीच पुढं केली तर. किंवा खोटंनाटं सांगितल्यामुळं भलत्याच मुलीशीं विवाह झाला तर.

१ ले शा०:—' साहसम् '.

२ रे शा०:—' सा ' ह्मणजे ' ती ' आणि ' हसम् ' ह्मणजे ' हंसणारी '. ती फार हांसरी असली तर.

१ ले शा०:—' माया '.

२ रे शा०:—' माया ' ह्याचा अर्थ, तिची आपल्या नवऱ्यावर माया नसतां माहेरच्या माणसांवरच असेल तर.

विक्षि०:—हीं सगळीं कारणं शास्त्रविहित आहेत का ? पण मेहेरबानी करून दोघे एकदम बोलूं नका. एकेकाचं काय तें होऊं द्या.

१ ले शा०:—" कारणेभ्यो हि एतेभ्यो घटस्फोटो विधीयते ".

२ रे शा०:—शास्त्रीबोवांचं म्हणणं अगदीं बरोबर आहे.

१ ले शा०:— व्यवहारमयूखाच्या ह्मणण्याप्रमाणं पाहिलं असतां जेहेत्ते शूद्र स्त्री अथवा दासी इच्याशीं विवाह झाला असतां पतीला त्या दासीचा घटस्फोट करतां येतो.

२ रे शा०:—हें मात्र तुमचं ह्मणणं अगदीं चुकीचं आहे; कारण नाहीं तर पतीच्या घरीं दासीनं रहावं, अशी शास्त्रानं कशी संमति दिली असती ? वामनस्मृतींत " पतिकुले तव दास्यमपि क्षमम् " असं चरचरित वचन आहे. शिवाय ह्या प्रांतांत व्यवहारमयूख मनूइतका प्रमाण मानीत नाहींत.

विक्षि०:—आतां काय करावं ! हा वाद तर पेटला आतां !

१ ले शा०:—व्यवहारमयूख जरी घटकाभर बाजूला ठेवला तरी विज्ञानेश्वर, याज्ञवल्क्य, पाराशर, भवभूति, शूद्रक ह्या स्मृतिकारांना तरी तुह्मी प्रमाण मानतां कीं

नाहीं ? नीलकंठानं आपल्या षड्दर्शन-चिंतनिकेंत घटस्फोट सात कारणांनीं करतां येतो असं स्पष्ट झटलं आहे. तो लख्ख झणतो, " सुरापी व्याधिता धूर्ता वंध्याऽर्थघ्न्यप्रियंवदा । स्त्रीप्रसूश्चाधिवेतव्या पुरुषद्वेषिणी तथा ॥ " अधिवेदनं नाम भार्यांतरकरणम् ।

२ रे शा०:–अहो, पण हीं कारणं कलिवर्ज्यांत येतात. कलीमध्यें हें तुमचं वचन मुळींच लागू पडत नाहीं.

विक्षि०:–(स्वगत) मला वाटतं, ह्या दोघांनाच अगोदर कलीची बाधा होऊन तो मंथरेसारखा यांच्या अंगांत संचार करूं लागला आहे ! (उघड) शास्त्रीबोवा, तुमचं सगळं हें मला एरंडाचंच गुऱ्हाळ दिसतं आहे. रसाची निष्पत्ति मुळींच होत नाहीं.

तिर०:–विक्षिप्तराव, त्यांचा जरा वाद होऊंद्या. त्याशिवाय खरा शास्त्रार्थ कसा बाहेर येईल ? " वादे वादे जायते तत्त्वबोधः"

१ ले शा०:–तुम्ही झणतां त्याप्रमाणं ह्या गोष्टी कलिवर्ज्यांत येत नाहींत. ह्यास प्रमाण त्या वचनाखालीं मल्लिनाथानं स्पष्ट शेरा मारला आहे, " न चैवं घटस्फोट विधिः कलौ व्यर्थ इतिवाच्यम् । "

विक्षि०:–गृहस्थहो, ह्या मुद्यासंबंधानं असे भांडूं नका. तो जाऊं द्या. दुसरा घ्या.

१ ले शा०:– ठीक आहे. पुढं. " समान कुलगोत्राणां विवाहो नैव युज्यते । कृतश्चैव कलौ अस्मिन् घटस्फोटेन वार्यते ॥" झगजे नवरा आणि बायको, आलं का लक्षांत ? नवरा आणि बायको एकाच गोत्रांतील किंवा कुटुंबांतील असतील तर विवाहनिराकरण खुशाल करावं.

तिर०:–विक्षिप्तराव, तुह्मी नवराबायको सगोत्र, सपिंड वगैरे कांहीं आहां कीं काय ?

विक्षि०:–आह्मी सगोत्र नाहीं, सपिंड नाहीं, दसिंपड नाहीं न सस्पिंडही नाहीं.

१ ले शा०:—ह्या वचनावर कुमारिल भट्टांनीं एक चतुःसूत्री केली आहे. त्यांत त्यांनीं असं झटलं आहे कीं, नवराबायको विवाह होण्यापूर्वीं जरी मानलेल्या भाऊबहिणी असल्या तरी जेहैत्ते विवाह मोडण्यास योग्य आहे.

२ रे शा०:–हें तुमचं म्हणणं अगदीं चुकीचं आहे; कारण, तसं पहायला गेलं तर जगांत आपण सगळेच भाऊबहिणी आहों. म्हटलंच आहे, " उदार चरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् "

विक्षि०:–अहो, हें आतां तुमचं संपायचं कधीं ? आपलं मारुतीचं शेंपूट वाढतं आहे लांब, लांब.

तिर०:–आतांशी कुठें सुरुवात झाली आहे. हं ! चालू द्या पुढं. विक्षिप्तराव, जरा दम धरा तर खरें. तुमची साऱ्या दिवस घाई, लग्न करतांना घाई, मोडतांना घाई, आहे काय हें ?

१ ले शा०:–आणखी एक कारणं. जबरीनं, तुमच्या इच्छेविरुद्ध विवाह झाला असेल तर.

विक्षि०:–नाहीं हो, तसं नाहीं. अगदीं खुषीनं, हौसेनं लग्न केलं बाबा.

१ ले शा०:–पूर्वीं दुसऱ्या एखाद्या वधूशीं वाङ्निश्चय झाला असेल तर.

विक्षि०:–तसंही कांहीं नाहीं. (स्वगत) यांच्या ह्या पांचपन्नास कारणांत आम्हांला जुळेलसं एकही दिसत नाहीं.

१ ले शा०:–बरं तें राहिलं. आणखी, " नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ । पंचस्वापत्सुनारीणां पतिरन्यो विधीयते ॥ " ह्या पांच कारणांनीं स्त्रीला पहिला पति सोडून दुसऱ्या नवऱ्याशीं लग्न करण्याचा शास्त्रानं अधिकार दिला आहे.

२ रे शा०:–इथें तुम्ही ' पति ' शब्दाचा अर्थ अगदीं भलता करतां. ह्या

लेखांत पति म्हणजे नवरा नाहीं समजायचा. " पतिस्तु पालको ज्ञेयः " असं हलधरानं एका वार्तिकांत म्हटलं आहे. पति म्हणजे स्त्रीचं पालन करणारा, रक्षिता इतकंच. " पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने " इत्यादि स्मृतिवचनावरून माझाच अर्थ खरा आहे.

१ ले शा०:– " नष्टे मृते प्रव्राजिते " ह्यामध्यें मागचा पुढचा संदर्भ वगैरे कांहीं लक्षांत आणाल कीं नाहीं? का 'पति' शब्दाच्या अर्थाबद्दल उगीच वितंड वाद घालतां? संदर्भावरून पति म्हणजे नवरा हाच अर्थ स्पष्ट आहे.

तिर०:–(एकीकडे) आतां कुठें वादाला रंग चढायला लागला आहे!

विक्षि०:–(स्वगत) आतां हें आटपायचं केव्हां हें कुणाला ठाऊक!

२ रे शा०:–मी तुम्हांला दुसरं प्रमाण देतों. मी असं विचारतों, शंकराला रुद्रामध्यें "स्तेनानां पतये नमः" असं जें म्हटलं आहे, तिथें शंकर स्तेनांचा म्हणजे चोरांचा नवरा होता, असं का तुमचं म्हणणं?

१ ले शा०:–मग ' स्तेनानां पतिः ' म्हणजे शंकर दरवडेखोरांचा पालक, पुढारी असं तुम्ही म्हणणार कीं काय? हा अर्थ अगदींच मूर्खपणाचा.

२ रे शा०:–मूर्ख कुणाला म्हणतां? तुमचा अर्थ शतमूर्खपणाचा.

(एकमेकांवर काठ्या उगारतात.)

विक्षि०:– अरे हे तर अगदीं हातघाईवर आले! ह्यांच्या तंटयांत मधल्यामधें आमचंच चंदन उडायचं! शास्त्रीबुवा, मी असं करतों, जरा आंत जाऊन येतों. तुमचा वाद होऊन निकाल लागतो आहे तों मी आलोंच.

तिर०:– वा! तुम्ही इथें नाहीं मग काय? आम्हांला का शास्त्रार्थ हवा आहे?

विक्षि०:– ह्यांनीं शास्त्रं सोडून एकमेकांवर जर शस्त्रं उपसलीं, तर इथें बसून काय करूं?

२ रे शास्त्री०:–बरं, तुमचा अर्थ कबूल केला क्षणभर, तर काय ठरतं आहे?

१ ले शा०:– 'नष्टे मृते' पैकीं विक्षिप्तरावांना जर एखादी गोष्ट लागू पडेल असं केलं, तर त्यांची बायको त्यांना सोडून दुसरा पति करील.

विक्षि०:– जुळतं आहेसं दिसतं कांहीं तरी.

२ रे शास्त्री०:– कबूल.

तिर०:– हा निकाल ठरला तर तुमचा?

२ रे शास्त्री०:– ठरला. शास्त्रीबुवांचं ह्मणणं कांहीं अगदींच निराधार नाहीं. मीं आपली दुसरी बाजू पुढं मांडली. बाकी, पति ह्याचा अर्थ नवरा असाही होतो. विक्षिप्तराव, तुम्ही आतां संन्यास घेतां का धर्मांतर करतां?

विक्षि०:–संन्यास घेऊन काय करूं? त्यापेक्षां धर्मांतर केलेलं काय वाईट? मी आपला मुसलमान होतों. शास्त्रीबुवा, तुमचीच दाढी यानात मला काढून, ह्मणजे आपला बनतों दाढीदीक्षित.

१ ले शा०:–(स्वगत) लेंकानं माझी खोटी लावलेली दाढी ओळखलीन् कीं काय? काढून मागतो आहे ती?

तिर०:–पण नांव काय घ्याल?

विक्षि०:–काय वाटेल तें. ' हुसेनभट तांबोळी ' का होईना?

प्रवेश ५ वा.

(**धोंडोपंत, खासेराव** वगैरे गृहस्थ येतात.)

खासेराव:–अहो नवरदेव, हें तुम्हीं मांडलं आहे तरी काय? काल कुठें लग्न झालं नाहीं तोंच आज काडी मोडून दे-

ण्याचा विचार ! तुह्मांला म्हणावं तरी काय ? (शास्त्र्यांकडे पाहून) आणि हे टोळभैरव इथें कोण ? तुमच्यांत जर कांहीं माणुसकी असेल, तर नवराबायकोमध्यें असं वितुष्ट आणण्याच्या दुष्ट कामांत तुह्मी यत्किंचितही मदत करूं नका. माझ्या पोरीच्या जन्माचं मातेरं करण्याचा बेत मांडला आहेन् या थेरड्यानं, आणखी तुह्मी त्याला शास्त्रार्थ सांगतां ?

विक्षिः– अरे, हें काय आणखी विघ्न आलं मधेंच !

धोंडोः– बघतां काय ? गचांड्या मारून हांकून द्या ह्या चोरांना घरांतून !

१ ला गृहः– थांबा मी शिपायांना बोलवायला जातों.

२ रा गृहः– अगोदर त्या नवरदेवाला पकडा गुलामाला. लग्न करतांना बरं वाटलं अन् आतां कां बाबा असं ?

विक्षिः– झालं ! नशीब फिरलं ! मुक्या, अरे मुक्या !

साळसूः– सद्गृहस्थहो, माझ्याकरितां जरा शांत व्हा.

सर्वः– ठीक आहे. साळसूदराव काय ह्मणताहेत तें ऐकून घ्या.

तिरः– (विक्षिप्तरावास) विक्षिप्तराव, तुह्मीच काय तें ह्या मंडळीस थोडक्यांत सांगा ह्मणजे झालं.

विक्षिः– काय सांगूं मी आपलं कर्म ? बरं तर ऐका. मीं दुष्टबुद्धीनं आपल्या पुतण्याचं नुकसान करावं ह्या हेतूनं, खरोखर मनापासून नको असतांही, मागचा पुढचा कांहीं विचार न करतां, या लग्नाच्या भानगडींत पडून ही कर्कशा गळ्यांत बांधून घेतली–

१ ला गृः– हं ! तोंड संभाळून बोला. कुणाला कर्कशा ह्मणतां ? मुलीची परीक्षा केलीत त्या वेळेला तुमच्या हातावर कुणीं गूळ खोबरं दिलं होतं कीं काय ?

२ रा गृः–आपण मूर्खपणा करून, दुसऱ्याला नांव ठेवायला तुह्मांला लाज नाहीं वाटत ?

तिरः–ऐका, ऐका. विक्षिप्तरावांना तर पुढं बोलूं द्या.

विक्षिः–पण आतां मी केलेल्या गोष्टीबद्दल पस्तावलों असून सर्वांची क्षमा मागण्यास कबूल आहें. या शास्त्रीबोवांनीं असा शास्त्रार्थ सांगितला आहे कीं, मीं जर धर्मांतर केलं, तर माझ्या बायकोला दुसरं लग्न करण्यास हरकत नाहीं. अशानं माझी संकटांतून मुक्तता होऊन माझ्या बायकोचंही त्यांत काडीचं नुकसान नाहीं.

१ ला गृः–तुह्मी मुसलमान झालां तरी माझ्या मुलीला चालेल. तिला दुसरं लग्न करण्याची जरूर नाहीं.

विक्षिः–अरे राम ! हें काय आणखी लचांड ! अहो शास्त्रीबुवा, ती मला नाहीं सोडीत !

२ रे गृः–कायहो शास्त्री, मुलीनं जर आपली संमत्ति दिली नाहीं तर घटस्फोटच यथाविधि होत नाहीं असं नाहीं कां शास्त्र अगोदर ? असंच आहे. मला माहीत आहे.

विक्षिः–आतां मात्र आपली धडगत दिसत नाहीं. अहो, मी मुसलमान बनलों तर तिला आणखी कशाला मुसलमान करतां ?

१. ला गृः–तुह्मी मुसलमान झालां तरी माझ्या मुलीला पत्करेल, तुम्हांला कां त्याची काळजी ?

विक्षिः–आतां काय करावं ? ही मोठी पिडाच झाली. अरे साळसूदराव, तूं तरी ह्या मंडळींना चार शब्द सांग.

साळसूः–(सर्वांस) मेहेरबानी कु-

रून तुह्मी येथून आतां जा. मी ह्या सर्व गोष्टींचा काकासाहेबांच्या सल्ल्यानें समाधानकारक निकाल लावून तुम्हांला कळवतों. निदान माझ्याकरितां तरी घटकाभर तुह्मी इथून जा, आणि मला ह्यांच्याशीं जरा एकांतांत बोलूं द्या.

खासे०:—तुमच्यासाठीं ह्मणून आह्मी घटकाभर दम धरतों; परंतु आह्मांला निकाल मात्र लवकर कळला पाहिजे. नाहीं तर फौजदाराला वर्दी द्यायला बरं. (सर्व जातात.)

साळसु०:—काकासाहेब—

विक्षि०:—आतां माझ्याशीं कोणीही एक अक्षरसुद्धां बोलूं नका. मला स्वस्थपणें मरूं द्या.

साळ०:—काय हें भलतंच बोलतां ? इतके दिवस तुम्ही मला दुष्ट समजून माझ्याविषयीं वाटेल तें वाईट बोललां आहां; पण माझं तुमच्यावर किती प्रेम आहे हें तुम्हांला लवकरच दिसेल. वाचाळपणा करून तुह्मांला त्रास देण्यासाठीं मी हें बोलत नाहीं. हें पहा, मीं जर तुह्मांला इतक्याही भानगडींमध्यें तुमच्या नव्या बायकोच्या जाचांतून तावडतोब आन् कायमचं मोकळं केलं तर—

विक्षि०:—तें कसलं होतं आहे रे ! तिची आंत चाललेली टकळी सारखी माझ्या कानांवर आदळती आहे.

साळ०:—तें कांहीं असो. ह्या घटकेपासून तुमच्या बायकोकडून तुह्मांला यत्किंचितही त्रास न होईल अशी जर व्यवस्था केली तर तुम्ही काय द्याल मला ?

विक्षि०:—काय मागशील तें देईन.

साळ०:—पहा बरं ! तुमचं माझ्यावर पूर्ण प्रेम राहील ?

विक्षि०:—अरे प्रेमसं काय ? वाटेल तें ह्या वेळेला माग. माझी सगळी दौलत तुझी आहे. तूं मालक आणि मी तुझा नोकर. झालं आतां ?

साळ०:—अं हं ! छे. छे. असं कसं होईल भलतं ? आज कित्येक दिवस झाले मीं एक कागद करून ठेवला आहे आन् त्याच्यावर सही करा म्हणून मीं तुम्हांला किती वेळां तरी ह्मटलं असेल. त्यावर तेवढी सही करतां कां आज ? माझ्या म्हणण्याप्रमाणं जर झालं नाहीं, तर मी जन्मभर तुमचा बंदा गुलाम होऊन राहीन, असंही एक कलम त्या कागदांत घातलं आहे.

विक्षि०:—आण कुठें आहे तो कागद ? आत्तां सही करतों. माझी पक्की खात्री आहे तूं हरशील. आपला नीट विचार कर.

साळ०:—मला काय विचार करायचा आहे ? मी तुमच्या पायाचा चाकर आहें कांहीं झालं तरी. (कागद पुढें करतो.) हा घ्या. (स्वगत) लेंकाचा वाचून पहातो आहे कीं काय ?

विक्षि०:—ही केली सही. एखाद्या कोऱ्या कागदावर लागेल तर देतों सही करून तुला. मी इतका वैतागून गेलों आहें.

साळ०:—छे ! भलतंच ! (स्वगत) जुळलं. (गुलाब प्रवेश करतो.) काकासाहेब, ही पहा तुमची सुटका केली. हा पहा माझा मित्र गुलाब. तो स्त्री नसून तुमच्या माझ्यासारखा पुरुष आहे. तुमची खोड मोडून तुमची सगळी संपत्ति लुबाडावी ह्मणून ह्याला दोन दिवस तुमची लटकीच बायको हो ह्मणून सांगितलं होतं. त्यानं आपलं काम किती बेमालूम व चोख केलं, हें आतां तुम्हांला सांगायला नकोच. ही पहा आमच्या नाटकांतील एक एक पात्रं यायला लागलीं. हे दाढीवाले शास्त्री, तुम्हीं ओळखलेत कां कोण ते ! हे आपले चिटकंभट.

तिरशिंगरावांची व तुमची तर पूर्ण ओळख आहेच. तुम्ही आतां वाटेल तिकडे जा. तुम्हांला आतां कोणी त्रास द्यायचा नाहीं.

विक्षि०:—आतां आंत माझं काय आहे ? झालं ! साफ बुडालों. पैशापरी पैशानं बुडालों, वर गेलं, दार गेलं, अब्रू गेली. जगांत तोंड कसं दाखवूं ? आतां हें शहर सोडून दूर कुठें तरी जाऊन बैरागी बनावं. माझ्या विक्षिप्तपणाचं मला चांगलंच बक्षिस मिळालं. (जातो.)

चिटकं०:—बरं आमचं बक्षिस ? कां आम्हांला विक्षिप्तरावांसारखंच देणार बक्षिस?

साळ०:—हें काय बोलतां ? तुम्हांला लागेल तें बक्षिस मागा. मुक्या, अरे मुक्या !

मुक्याः—जीअ !

साळ०:—हं बोलूं नको. काय तें खुणांनीं उत्तर दे. आतां मी कसा काय दिसतों ? (तिरशिंगराव येतो.)

तिर०:—अगदींच बावळट !

साळ०:—ह्या गुलाबाचा तर मी अत्यंत ऋणी आहें. तिरशिंगराव, आपल्या ह्या कपटनाटकांत ज्या ज्या पात्रांनीं भूमिका घेतल्या आहेत, त्या सर्वांना त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणं व कामगिरीप्रमाणं बक्षिसं देण्याचं काम मी तुझ्यावर सोंपवतों. मुक्या, हं ! खुणांनीं उत्तरं दे. जा, धोंडोपंत, तात्यापंतोजी, खासेराव वगैरे आपल्या सर्व मित्रमंडळीस बोलावून घेऊन ये. तिरशिंगराव, शास्त्रीबोवांचा ‘ तोडा ’ विसरूं नकाहो ! धोंडोपंताची मेजवानी आन् गाणंही झालंच पाहिजे. पण अगोदर ज्या जगच्चालक प्रभूनं हें आपलं कपटनाटक सुरळीतपणानं पार पाडण्याची आपणास शक्ति व बुद्धि दिली, त्याची प्रार्थना श्रीमहेश्वराचें देवळांत करून मग आपआपल्या पुढल्या कामाला लागूं. (सर्व जातात.)

समाप्त.

B/95